म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

# मराठी ग्रंथसंग्रहालय

## ठाणें.

नाटक

३६

कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपाल
यांनीं पसंत करून बक्षीस दिलेलें.

# गुणोत्कर्ष नाटक.

हें पुस्तक

## वासुदेव वामन शास्त्री खरे,

मिरज्-हायस्कुलांतील संस्कृत भाषेचे शिक्षक, व 'समुद्र' आणि 'यशवंतराय' या काव्याचे कर्ते, यांनीं रचिलें.

त्याची ही तिसरी आवृत्ति

किताबखान्याचे व्यवस्थापक,

यांनीं

'जगद्धितेच्छु' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

शके १८१०—सन १८८९.

किंमत ८ आणे.

# प्रस्तावना.

या नाटकांतील नायक जिवाजीपंत हा असून मुख्य रस वीर व करुण हे आहेत. या जिवाजीपंतावर बहुत संकटें आलीं असतां शेवटीं त्या संकटांचा परिहार होऊन त्यास सुख व ऐश्वर्य हीं प्राप्त झालीं आहेत. इतकीच कथा नाटकरूपानें मुख्यत्वें वर्णन करण्याची असून त्यांतच शिवाजीची गोष्ट गोंविली आहे.

जिवाजीपंत हें मुख्य पात्र असून त्यापेक्षां शिवाजीकडेच वाचकांचें लक्ष्य विशेष लागेल. परंतु हा उणेपणा, ज्या नाटककारांनीं किंवा कल्पित कथा लिहिणारांनीं प्रसिद्ध ऐतिहासिक व काल्पनिक पुरुषांच्या कथांचें आपल्या ग्रंथांत मिश्रण केलें आहे, तेथें हरहमेशा दृष्टीस पडणारा आहे.

नाटकाचा प्रयोग तीन तासांत झाला पाहिजे अशी या नाटकाबद्दल एक अट असल्यानें व नाटक लिहिण्याचा हा माझा प्रथम प्रयत्न असल्यानें, कथेमधील निरनिराळे भाग दाखविण्यांत नाटककारापेक्षां कादंबरीकाराचीच पद्धति अनुसरणें मला योग्य वाटलें. त्यामुळें जिवाजीपंत हें नाटकांतील प्रधान पात्र असून त्यास प्रथम अंकांत रंगभूमीवर आणण्यास अवसर झाला नाहीं. कृष्णराव व राधाबाई हीं पात्रेंही बऱ्याच महत्वाचीं असून तीं चवथ्या व पांचव्या अंकांत आणिलीं आहेत त्याचें कारण तरी तेंच आहे.

नाटकांतील भाषेच्या संबंधानेंही येथें थोडें लिहिलें

पाहिजे. शिवाजी, संभाजी, हिरोजी फर्जंद व बहिर्जी, हीं पात्रें मराठे जातीचीं असून त्यांच्या भाषणांत शुद्ध मराठी भाषेचा उपयोग केला आहे. तेणेंकरून वाचकांस प्रथमदर्शनीं आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. मला वाटतें कीं, असल्या पात्रांच्या भाषणांत शूद्रभाषेचा उपयोग करणें तो सारासारविचार पाहूनच केला पाहिजे. हल्लींही आपण जे मोठमोठे मराठे सरदार पहातों त्यांची भाषा शुद्ध असते. श्रीमान् मराठे लोकांच्या घरांतून लहान मुलांस चारचौघांत बसून प्रतिष्ठित रीतीनें व शुद्ध भाषण करितां यावें ह्मणून शिक्षकांची योजना केलेली असते. ही जर स्थिति सध्यांची आहे, तर ज्या वेळीं हे मराठे लोक छत्रपति व त्यांचे मुख्य सरदार यांसारख्या उच्च पदवीप्रत पावले होते, व ज्यांच्या असपास रात्रंदिवस ब्राह्मण लोक रहात होते, ते केवळ कुणबटासारखेंच भाषण करीत असतील हें कसें संभवतें?

ऐतिहासिक काव्यें, नाटकें, कादंबऱ्या वगैरे ग्रंथ आपल्या देशांत जसे व्हावे तसे अजून झाले नाहींत. नुकतें ग्रंथकारांचें तिकडे लक्ष्य जाऊं लागलें आहे. सुदैवानें असे ग्रंथ जर तयार होऊं लागले तर मीं अंगीकारिलेल्या मार्गाची ग्रंथकारांस अवश्यकता दिसेल. शूद्रांच्या भाषणांत ग्राम्य भाषेचा उपयोग व्हावा ही गोष्ट व्यवहाररीत्या ठीक आहे: परंतु सर्व पुस्तकभर कुणबी भाषेचा उपयोग करूं लागलें तर ग्रंथास मोठें सौंदर्य येईल असें माझ्या अल्प मतीस वाटत नाहीं.

## नाटकांतील पात्रें.

शिवाजी—महाराष्ट्र देशाचा राजा.

संभाजी—शिवाजीचा पुत्र.

मोरोपंत—शिवाजीचा मुख्य प्रधान.

प्रल्हाद निराजी—शिवाजीचा मित्र.

हिरोजी फर्जंद—शिवाजीचा मित्र.

बहिर्जी—शिवाजीचा मुख्य जासूद.

गणपतराव—पन्हाळ्याचा किल्लेदार.

रघूजी—पन्हाळ्याचा हवालदार.

जिवाजीपंत—वडगांवचा देशपांड्या.

कृष्णराव—जिवाजीपंताचा मुलगा.

राधाबाई—जिवाजीपंताची सून.

भीमराव—जिवाजीपंताचा कारकून.

गोविंदपंत—जिवाजीपंताचा कारकून.

## स्थळें.

पन्हाळा, वडगांव वगैरे.

Presented by the "Arya-Mitra Samaj of Thana to the Library of Marathi Books, Thana.

Thana
30th June 1893.

[illegible]
Secy., Arya Mitra Samaj

Received with compliments.

[illegible]
Secy, Library

नं० २
ग्रंथ सन १८०
अं. ना. ८९९

# गुणोत्कर्ष नाटक.

## अंक पहिला.

### मंगलाचरण.

#### श्लोक.

नेऊं देत्यां लयातें परिहरण करूं भक्तदुःखांस देव ।
कौसल्यादेवकींच्या उदरिं जनन घे अद्वितीयप्रभाव ॥
ज्या ज्या मर्त्यांस साधारण घडति दशा हर्षशोकादि त्यांतें॥
दावी स्वाभाविकत्वें अवनकर असो नाटकी तो तुह्मांतें॥ १॥

(अशी नांदी झाल्यावर सूत्रधार पडद्याबाहेर येतो.)

सू०—आज श्रीमहालक्ष्मीच्या नवरात्रमहोत्सवांत येथें जमलेल्या विद्वान् व रासिक लोकांसमोर एका नवीन नाटकाचा प्रयोग करून दाखवावा, अशी आमचे महाराज शिवकुलालंकार बालभूपाल शाहू छत्रपति यांची मला आज्ञा झाली आहे. तर कोणच्या नाटकाच्या प्रयोगानें प्रेक्षकांचें मनोरंजन होईल, या विवंचनेंत मी पडलों आहें. (क्षणभर स्वस्थ राहून व सुचल्यासारखें करून.) हो, असें एक नाटक मजजवळ आहे; पण त्याची रचना नवीन प्रकारची असल्यानें तें लोकांस कितपत रुचेल हें मला कळत नाहीं. बरें, माझा मित्र विदूषक आज येथें दिसत नाहीं. त्यास हांक मारून त्याची या कामांत मदत घेतली पाहिजे. (पडद्याकडे पाहून) अरे विदूषका, इकडे ये.

वि०—( प्रवेश करून ) नमस्कार! अहो रावसाहेब, सूत्रधारसाहेब, नमस्कार! नमस्कार!

सू०—वाः! का आज नमस्कारांची फारशी गर्दी उडविली आहे! बरें तें असो. विदूषका, तुला मीं येथें कां निमंत्रण केलें हें कळलें?

वि०—होहो! कळलेंच पाहिजे! विदूषकाला बोलावणें कशाकरितां होणार? जेवणाकरितां! पण सूत्रधारपंत, केवढीहो तुमची ब्राह्मणांच्याठायीं भक्ति! केवढी तुमची दानशूरता! तुमची औदार्यनदी अशी अपरंपार भरून चालली आहे कीं, जींत शेंकडों याचक बुडून मरण पावतात!

सू०—व हवा! कल्पना तर मोठी सरस केलीस बुवा! पण विदूषका, मीं तुला जेवणाकरितां बोलाविलें नाहीं!

वि०—( नाक मुरडून ) अं? तर मग आह्मांला कशाकरितां बोलाविलेंत हो?

सू०—तुझें मला साहाय्य पाहिजे आहे.

वि०—( डौलानें ) मित्रास साहाय्य करण्याचा आमचा धर्मच आहे! दुसऱ्यावर उपकार करण्याविषयीं आह्मी तर केवळ कर्ण! नाहीं—कर्णाहूनही मोठे महाकर्ण—अतिकर्ण लंबकर्ण—काय ह्मणाल तें ह्मणा!

सू०—या रंगभूमिवर एक नाटक करून दाखवावें असें माझ्या मनांत आहे याकरितां—

वि०—( त्रासून ) नकोतरे बाबा मला तीं तुझीं नाटक! सूत्रधारा, खरेंच सांगतों, तुझ्या नाटकांस कंटाळून मी आतां संन्यास घेतों आणि काशीस जाण्याची तयारी करितों!

सू०—कांहो विदूषकराव, असे त्रासला कां? संन्यास घेऊन काशीस जाण्यासारखें आमच्या नाटकांनीं तुमचें काय केलें?

वि०—बाबारे, परदुःख शीतल ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं! मला काय काय क्लेश झाले आहेत ते तुला सांगून काय उपयोग?

सू०—सांगा सांगा तर खरें! ऐकूं द्या आह्माला.

वि०—बाबारे, तूं नाटकें करूं लागलास ह्मणजे होतात देवदैत्यांच्या मारामाऱ्या, आणि रंगभूमीवरच्या लढाईत पडलेल्या मंडळीस उचलून पडद्यांत न्यावें लागतें मला! एकदां असाच त्या रामराक्षसांच्या मारामारींत मी सांपडलों आणि एका राक्षसानें मजवर केला तरवारीचा वार. त्या वारासरसें त्या लेकानें माझें डोकें कापून कोणीकडे उडविलें न कळे! मग डोक्याशिवाय कित्येक दिवस काम करीत होतों! हल्लीं डोकें आहे हें माझें नव्हे. हें एका डाक्टरानें मोठ्या कुशलतेनें माकडाचें डोकें माझ्या धडावर बसविलें आहे! (मान हलवून) तो डाक्टर मोठा हूशार खरा बुवा!

सू०—आणि तुमचें डोकेंही माकडाचें खरेंच. बरें मग?

वि०—मग काय तुझें कपाळ? ह्मणून ह्मणतों हीं तुझीं नाटकें मला नकोत; मी आपला जातों कसा!

सू०—अरे मित्रा, जाऊं नको ऐक. आज जें मी नाटक करणार आहें त्यांत पौराणिक विषय नाहीं. त्यांत व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टींचें निरूपण केलें आहे. विशेषेंकरून दुर्जन, मैत्रीच्या मिषानें भोळ्या लोकांस कसे फशीं पाडतात, चांगल्या स्वभावाचा

मनुष्यही प्रसंगीं दुष्ट लोकांच्या संगतीस लागून कुमार्गास कसा प्रवृत्त होतो, कशींही संकटें आलीं असतां सद्गुणी स्त्रियांचें पातिव्रत्य कसें स्थिर रहातें, इत्यादि गोष्टी प्रेक्षकांच्या नजरेस आणण्याचा नाटककर्त्यानें यत्न केला आहे. मराठी राज्याचे स्थापक जे शिवाजी महाराज त्यांचें चरित्र या नाटकांत वर्णिलें आहे.) विदूषका, असें नाटक केलें असतां तुझें साहाय्य मला मिळेल कीं नाहीं ?

वि०—हो, असें कांहीं बोलशील तर तें मी ऐकेन; आणि तुझें हें नाटक लोकांसही पसंत पडेल असें मला वाटतें.

सू०—मलाही असेंच वाटतें. कारण कीं, त्या राजर्षि शिंवाजीचें चरित्र भारतभागवताप्रमाणें लोक भक्तिपुरःसर वाचतात.

वि०—हो, हो. रायगडचा बादशहा जो नादिरशहा व विजापुरचा बादशहा जो औरंगजेब त्यांच्याशीं विजयानगरच्या मुसलमानांचें साहाय्य घेऊन शिवाजीनें लाहोराहून येऊन लढाई केली; त्या वेळेस त्याचा चुलता राघोबादादा व उदेपुरचा टिपु सुलतान यांनीं मोठी मर्दुमकी करून गाणगापुरच्या खाडींतून वसईचा किल्ला घेतला; या गोष्टी कोणास माहीत नाहींत!

सू०—वाहवा वाहवा ! ! विदूषका, तुझें इतिहासाचें व भूगोलाचें ज्ञान तर अगाध आहे बाबा !

वि०—अगाध ह्मणजे विचारणें काय? आज बारा वर्षेंपर्यंत त्या विषयांचा व्यासंग मीं केला आहे !

सू०—विदूषका, आपणास शिवछत्रपतीचें चरि-

त्र दाखविणें आहे. त्याकरितां दोनशें वर्षांपूर्वींच्या काळांतील आपण माणसें आहों असें आपणांस कल्पिलें पाहिजे. तर मजबरोबर पन्हाळगडाखालच्या रानांत चल, ह्मणजे तुला तेथें काय काय चमत्कार होतील ते दिसतील.

वि०—भटक्या मारीत फिरावयाचें खरें, मग रानांत कां? दिल्लीसारख्या एकाद्या मोठ्या शहरांत कां न जावें?

सू०—त्याचें कारण असें कीं, शिवाजी महाराज कर्नाटकांतून स्वदेशास परत येत असतां तोरगल मुक्कामीं एकदम गुप्त झाले. तेथून ते वेषांतर करून बातमी काढण्याकरितां स्वतः या रानांत आले आहेत. तर आतां डोळे मीट, ह्मणजे एका क्षणांत त्या स्थळीं तुला प्रविष्ट करितों.

वि०—( डोळे मिटून व उघडून ) अरे वाः! सूत्रधारा, आपण पन्हाळगडाखालींच येऊन पोहोंचलों! चल तर आतां शिवाजी महाराजांस शोधून काढूं. ते मोठे उदार आहेत असें मी ऐकतों. तूं आपल्या तुणतुण्याची तार चढवून एक पोवाडा ह्मणूं लाग आणि मी तुला सूर देऊन "जी जी" ओढतों; ह्मणजे आपणांस कांहीं तरी इनाम मिळेल. मग हा नाटकाचा धंदा सोडून अग्निहोत्र घेऊं!

सू०—अरे, महाराजांचा शोध करण्यास दूर जावयास नको. ते पहा स्वतःच इकडे येत आहेत त्यांबरोबर आणखी दोन असामी असून त्या सर्वांनीं कुणब्याचे वेष घेतले आहेत. ते बोलण्याच्या नादांत अगदीं चूर झाले आहेत. याकरितां येथें त्यांस अडवड

करणें हें आपणांस श्रेयस्कर होणार नाहीं. तर चला जाऊं आपण एकीकडे.

[ सूत्रधार व विदूषक जातात. ]

[ नंतर शिवाजी राजा हा हिरोजी फर्जंद व प्रल्हाद निराजी यांसहवर्तमान प्रवेश करितो. ]

शि०—प्रल्हादपंत, आपण येथपर्यंत तर सुखरूप आलों. ( आसपास पाहून ) अहाहा! काय हें सृष्टिवैभव! येथें झाडी इतकी गर्द आहे कीं, तींतून सूर्यकिरणांचाही प्रवेश होत नाहीं. नुकत्याच प्रफुल्लित झालेल्या वन्य पुष्पांचा सुगंध जिकडे तिकडे सुटला आहे. चित्रविचित्र रंगाचे पक्षी आनंदानें शब्द करीत या झाडावरून त्या झाडावर उडत आहेत. इकडे पहावें तों डोंगरांतून स्वच्छ पाण्याचे ओढे उद्दामपणानें खालीं उड्या टाकीत येतांना दृष्टीस पडतात. तिकडे वेलींचीं भलीं मोठालीं जाळीं माजून तीं कड्यावरून खालीं लोंबत आहेत. त्यांच्या हिरव्यागार पानांवर सकाळीं पडलेले दंवाचे बिंदु उन्हांत चकाकत आहेत. वाऱ्याच्या झुळकेसरसें हें दाट पसरलेलें धुकें हालत आहे व तेणेंकरून त्याखालीं लपलेल्या भयंकर दरी दृष्टिगोचर होत आहेत. तो पहा पन्हाळगडचा डोंगर आपणाकडे जणूं काय टवकारून पहात आहे! दक्षिणेकडे व पश्चिमेकडे जों जों दृष्टि लावावी तों तों एकामागून एक उठणाऱ्या पर्वतांच्या रांगा दृष्टीस पडतात. माझें सर्व आयुष्य असल्याच प्रदेशांत गेलें असल्यानें हीं स्थळें मला फार आवडतात. तशांतून त्या रखरखीत, रांकट, निःसत्व व निर्जल अशा कर्नाटकांतून मी दीड वर्षानें परत आलों आणि हा रम्य

प्रदेश माझ्या दृष्टीस पडला; तेणेंकरून माझ्या मनाला फारच समाधान झालें आहे. बरें, बहिर्जी करविरास गेला आहे, त्याचा व आपला कोणत्या ठिकाणीं भेटण्याचा संकेत झाला आहे?

प्र०—तें ठिकाण येथून सुमारें दीड कोसावर आहे. तेथें एक देवीचें जुनें देऊळ आहे. त्या ठिकाणीं बहिर्जी आपणांस करविराहून येऊन मोंगलांकडील बातमी सांगेल. त्यापूर्वी आपण किल्ल्यावर जाऊन तेथील स्थिति कशी काय आहे याची चौकशी केली पाहिजे.

शि०—पन्हाळ्यावरील किल्लेदार इमानास जागून सरकारची चाकरी बजावीत असेल तर मोंगलांनीं जरी करवीर घेऊन प्रांतांत दंगा माजविला आहे, तरी त्यापासून विशेष भीति बाळगणें नको. त्यास पाहिजे तेव्हां येथून घालवून देता येईल. परंतु जर का हाच किल्लेदार दगलबाजीनें पन्हाळा मोंगलांच्या स्वाधीन करणार असेल, तर रांगण्यापासून विजापूरच्या सरहद्दीपर्यंत मधला सर्व मुलूख मोंगल त्वरेनें काबीज करितील; कारण, करविरास आलेला मोंगलांचा सरदार रणमस्तखान हा मोठा शूर असून त्याजवळ फौजेची तयारी दिवसेंदिवस चांगली होत आहे.

शि०—मला वाटतें कीं या किल्लेदाराच्या फितुराबद्दल ही केवळ बाजारबातमीच असेल. जर किल्लेदार फितूर असला तर आह्मी कर्नाटकांत व पेशवे कोंकणांत असतांच तो मोंगलांस पन्हाळ्याचा किल्ला देता.

प्र०—कदाचित् ती खरीही असेल. त्यां किल्लेदारास गडकरी अजून अनुकूळ झाले नसतील किंवा

संभाजी महाराज हल्लीं येथें आहेत, त्यांच्या धास्तीनें तो उद्योग सध्या बंद पडला असेल.

शि०—मला चमत्कार ह्मणून एवढाच वाटतो कीं, प्रत्यक्ष माझा मुलगा किल्ल्यावर असून त्यानें मोंगलांचें बंड इतकें कसें बळावूं दिलें, तो कांहीं आतां लहान नाहीं. त्याला या सर्व गोष्टी कळाव्या. आतां लवकर फौज आणवून मोंगलांस करवीर प्रांतांतून हांकून लाविलें पाहिजे. प्रल्हादपंत, पेशवे हल्लीं कोणीकडे आहेत व ते इकडे केव्हां येतील हें तुह्मांस माहीत आहे?

प्र०—सरकार, मोरोपंत पेशवे कोंकणांतून निघून पारघांटानें वर चढून मजल दरमजल इकडेच येत आहेत. त्यांबरोबर नऊ हजार सडी फौज असून त्या फौजेचा मुक्काम आज संध्याकाळीं कऱ्हाडाच्या आलीकडे चार कोसांवर व्हावयाचा होता.

शि०–ते जितके लवकर येतील तितकें बरेंच आहे. (समोर पाहून)हा घोड्यावर बसून तिकडून कोणी मनुष्य येत आहे.याचा घोडा उमदा असून हा शिपाईबाण्याचा मनुष्य दिसतो.हा कोणी किल्ल्यावरला मोठा अधिकारी असेल. याची आपण थोडी विचारपूस करूं (घोडेस्वार जवळ आलासें पाहून त्यास) राम राम रावसाब!

घोडे०–कोणरे तुह्मीं हरामखोरांनो ? कोणीकडून आलेत ? चाललां कोणीकडं ?

प्र०—हमी महाराज आलों तकडून वारशी वैरागाकडून. अन् हामी चाललों या कोकणामंदी रावसाबांच्या पायांचे चाकूर हाओं हामी गरीब कनबी.

शि०–गडावर ह्योच रस्ता जातुया व्हय रावसाब?

घोडे०—तुह्मांला रस्ता विचारण्यास मीच तेवढा मनुष्य भेटलों वाटतें! आपले बरोबरीचा मनुष्य पाहून विचारावयाचें होतें. बैलांनो! तुह्मी कोणाशीं बोलत आहां हें तुम्हांला माहीत आहे?

शि०—(आपल्याशीं) भल्या गृहस्था, तूं कोणाशीं बोलत आहेत हें तुला तरी माहीत आहे? (मोठ्यानें) असं कसं व्हईल रावसाब! आपुन कोन् म्होटं सरदार गडी असत्याल. ह्ये हमी कुनबी झालों म्हनूनशानी अमास्नी उमगत नाहीं. आपणाला काय म्हणत्यात् रावसाब?

घोडे०—तुह्मी मोठे लबाड मनुष्य दिसतां. मी कोण, मला काय ह्मणतात ही चौकशी तुह्माला कशाला पाहिजे?

शि०—(आपल्याशीं) हा मनुष्य कावेबाज दिसतो. हा कोण, कुठला, हें तर कळलेंच पाहिजे. (मोठ्यानें) धनीसाबांचा वारुबी लइ उमदा दिसतो. त्याच्या आंगांतून चामबी आक्शी दरदरूनशानी चाललाया. जनावर पन जनावर. हामा गरीबांस्नी असलं बगायबी गवसायच न्हइ.

घोडे०—(डौलानें) अरे, किंमतच तशी पडली आहे. या घोड्याला विजापुरी होन शंभर मोजले आहेत. इतकें सोनें तुझ्या वाडवडिलांनीं कधीं पाहिलेंही नसेल! (घोड्याची मान थोपटून) गडी असा बहादर आहे कीं एका मजलेंत साताऱ्यास जायचा. आज कोंबडा आरवल्याबरोबर गडावरून निघालों तों गेलों करविरास अरुणोदयाला. तेथें चार घटका बसून पुनः निघालों तो हा आतां गडावर चाललों. (घोडेस्वार म-

ध्येत्र हिरोजीस निरखून पहातो व घाबरून ) अंहः मी करविरास नव्हतों गेलों महाराज !

शि०–( चपापून ) महाराजे कोणाला ह्मनूताव धनीसाव ?

( घाडेस्वार कांहीं उत्तर न देतां पळून जातो. )

शि०–काय चमत्कारिक मनुष्य हा ! यानें नुकतीच कोठें जीभ सैल सोडिली होती इतक्यांत याला काय आठवलें न कळे ! एकदम पांखरूं उडून गेल्याप्रमाणें निघून गेला ! ( सचिंत ) हा जर किल्ल्यावरील अधिकारी असला तर हा करविरास कशाकरितां गेला असेल बरें ?

हि०–( संतापून ) मला ठाऊक आहे तो कशाकरितां करविरास गेला होता तें महाराज, गणपतराव किल्लेदार ह्मणतात तो हाच. भला गुलाम दगलबाज पाजी मनुष्य. तो माझ्या पूर्ण माहितीचा आहे. माणकोजी दुतोंड्याच्या हाताखालीं तो आणि मी कांहीं दिवस जमादार होतों.

शि०–( हिरोजीकडे वळून ) हा गृहस्थ तुझ्या ओळखीचा होता तर तूं मला पूर्वी सांगावयाचें होतेंस. आह्मी त्याच्या दृष्टीसच पडलों नसतों. आतां त्यानें आह्मांस ओळखलें असलें तर कसें होईल ?

हि०–ही गोष्ट मी आपणांस सुचविणार होतों. परंतु मला अवकाशच सांपडला नाहीं तो एकदम आला आणि आपण त्याजबरोबर बोलूं लागलां. मग निघून जावें तर संशय उत्पन्न होणार, ह्मणून मी उगीच राहिलों. त्यानें आपणांस ओळखिलें असेल हें संभवत नाहीं. कारण, त्याची व माझी संगत सुटून अ-

करा वर्षे झालीं. त्यांतून आपले वेष या तऱ्हेचे आहेत; तेव्हां तो आपणांस कसें ओळखील?

प्र०—जर त्यानें आपणांस ओळखिलें नाहीं तर पळून कां गेला व " महाराज " हीं अक्षरें त्याच्या मुखांतून कां निघालीं?

हि०—दोहोंचेंही कारण एकच गोष्ट आहे, ती हीच कीं, आपल्या घोड्याची फुशारकी सांगतां सांगतां हा घोड्यावर बसलेला गाढव मी महाराजांचा नोकर असून करविरास मोंगलाकडे गेलों होतों हें परक्या लोकांसमोर आपोआप बोलून गेला, मग फटकर आपण भलतेंच बोलून गेलों याची त्याला शरम वाटून त्यानें पळ काढला, तो पळाला म्हणूनच बचावला; नाहीं तर आज त्याला मी एव्हांना जमिनीवर लोळविलें असतें!

शि०—कसेंही झालें तरी त्याच्या विश्वासघाताबद्दल आतां संशय राहिला नाहीं चला आपण त्या देवळाकडे जाऊं व बहिर्जी करविराहून काय बातमी आणतो तें पाहूं.

हि०—चला. [ जातात.

[ नंतर भरधांव घोडा टाकीत गणपतराव किल्लेदार येतांना दृष्टीस पडतो. ]

---

## प्रवेश दुसरा.

ग०—( आपल्याशीं ) काय माझें पूर्वजन्मीचें पुण्य होतें न कळे! आज वाघाच्या जबड्यांत सांपडून जिवंत सुटलों किहो? ( भीतीनें अंगावर शहारे आल्यासारखें दाखवून ) होय. शिवाजीच तो. हिरोजीफर्ज-

द हिरोजीफर्जंद. त्याला वाटलें असेल मीं त्याला ओळखलें नाहीं ह्मणून. मी-मी त्याला विसरेन? तिसरा कोण तो? तो प्रल्हादपंत असेल. कारण, तोरंगलाहून हे तिघेच गुप्त झाले अशी बातमी मला जासुदांनीं कळविली आहे. मी पळत असतां पाठीमागून शिवाजीनें भवानीचा एखादा फटकारा नाहींना मारला? मीं घोड्यास टांच मारिली तेव्हां बंदुकीचा बार ऐकिल्यासारखा वाटतो. माझ्या अंगाला एखादी गोळी नाहींना लागली? ( आंग चांचपून ) छे. कांहीं नाहीं. ता उगीच भ्रम. ( त्रासून ) काय करावें आतां? आग लागो या माझ्या तोंडाला, मीं आपणास आतां किती तरी शिव्या घेऊं, अरे सर्व जगाला ठकवूं पाहणारा मी गणपतराव, आणि मीं असें बावरल्यासारखें भलतेंच बोलून जावें? आणि तेंही शिवाजीपुढें. माझी जिव्हा गळून कां नाहीं पडली? आतां मी शिवाजीच्या तावडीस सांपडलों तर मरणाशिवाय मला दुसरी गति नाहीं! शिवाजीच्या दरबारांत विश्वासघात करणावर दया नाहीं. खंडोजी काकड्याची जी स्थिति झाली तीच माझी होणार! बरें, या लचांडांतून सुटण्याची कांहीं तोड निघेल कीं, नाहीं हें पाहिलें पाहिजे. ( विचार करीत असतां कांहीं सुचल्यासारखें दाखवून ) अहो! झालें काम आतां अशी एक युक्ति काढिली आहे कीं, सगळें जग माझ्या शहाणपणाची तारीफ करीत राहील! बघा हीं आतां किती बस्तानें बांधलीं आहेत तीं! संभाजीला मोंगलांचे स्वाधीन करून देऊन त्यांच्या फौजेंतला मी मनसबदार होणार. वडगांवचा देशपांड्या जिवाजीपंत याची सून संभाजीनें

गडावर अडकावून ठेविली आहे; तिच्या नवऱ्याला मारून शेवटीं तिला मी उपटणार. संभाजीचा डोळा तिच्यावर आहे खरा, पण तो मोंगलाकडे गेला ह्मणजे जिवंत कशाला राहतो? पण आतां जी मला युक्ति सुचली आहे ती सगळ्याहून विशेष. अहो, संभाजीला पकडून मोंगलांकडे नेल्याबद्दल जर दोन हजार स्वारांची मनसबदारी मिळते, तर प्रत्यक्ष शिवाजीलाच धरून दिल्यावर एकादी मोठी जहागीर कां न मिळावी ? बापाची गादी बळकवावी व आपण राज्य करावें हा संभाजीचा हेतु. त्यासाठींच मोंगलाकडे जाण्यास तो तयार झाला आहे. त्याला मी भर देतों कीं तुझा बाप एकटा या रानांत हिंडत आहे त्याला धर, आणि राज्य मिळीव; माझी मसलत तो ऐकेलच. मग मी संभाजीचे वतीनें शिवाजीस धरण्यास जाईन. माझ्या सुदैवानें शिवाजी सांपडला तर फारच उत्तम. त्यांत इतकें तरी होईल कीं शिवाजीचें व संभाजीचें अगदीं वितुष्ट पडेल. मग संभाजी कोठें जातो? तो आपला जीव बचावण्याकरितां मोंगलांकडे पळेल आणि माझें कार्य होईल! (हर्षानें) वाहवा! शिवाजी कपटी तर मी सात कपटी! त्याच्याच तंगड्या त्याच्याच गळ्यांत घालणार मी! (मोठ्यानें हंसून) आतां मी किल्ल्याच्या माचीवर येऊन पोंचलों. (मागें पाहून) तो तपकिरी रंगाचें पागोटें घालून पोटाचें ढेर हालवीत हालवीत जलदीजलदीनें कोण येत आहे बरें? हां हां, तो जिवाजीपंत देशपांड्या. त्याच्या मुलग्याला आणि सुनेला प्रतिबंधांत ठेविल्याबद्दल रडगाणें गाण्याकरितां तो संभाजीकडे येत असेल. पण याची आणि संभाजी-

ची गांठ पडूं देऊन उपयोगी नाहीं. हा लुच्चा थेरडा वेदांताच्या लांब लांब गोष्टी सांगून त्याचें मन कदाचित् वळवील. छे:, तें उपयोगीं नाहीं. ( तो दरवाज्यांत जातो आणि पहारेकरी त्यास रामराम करितात. तो रामराम घेत पहारेकऱ्यांस ह्मणतो. ) अरे, रघूजी हवलदार कोठें आहे?

र०–( पुढें होऊन ) जी.

ग०–हवलदार, वडगांवचे जिवाजीपंत देशपांडे अर्ध्या घटकेनें येथें येतील, त्यांस किल्ल्यांत येऊं देऊं नका, समजलां?

र०–जी हुकूम.

ग०–संभाजी महाराज आतां काय करीत आहेत हें तुह्माला माहीत आहे?

र०–ह्मराज बंगल्यामंदी एकलच बसल्याती.

ग०–ठीक आहे. मी आतां त्यांच्याच भेटीस जातों.

[ जातात.

---

## प्रवेश तिसरा.

[ गणपतराव व संभाजी येतात. ]

सं०–एकून खान ह्मणतो कीं मी आतांच त्याच्या छावणींत निघून यावें; ह्मणजे तो दिल्लीहून फौज आणवून मराठी राज्य जिंकणार आणि तें माझ्या स्वाधीन करणार. गणपतराव, हें खानाचें बोलणें दिसण्यांत सरळ दिसतें खरें, परंतु त्याच्या खरेपणाबद्दल मला वारंवार संशय येतो.

ग०–कां बरें?

सं०–मोंगलांची जात ह्मणजे प्रथमपासून दगलबा-

ज. त्यांचा धर्म निराळा व जात निराळी. ते आजकाल प्रबल असून आह्मां हिंदूंस तुच्छ लेखितात. तेव्हां त्यांस मराठी राज्य बुडविण्याची इच्छा कां नसेल? कोणच्या तरी रीतीनें मला पकडून दगा करावा अशी तर मसलत नसेल ना!

ग०.—छे छे! महाराज, ही शंका मलाही पूर्वी आली नसेलसें आपणांस वाटतें? मी आपल्या सेवेस माझें तनमन अर्पण केलें आहे. माझ्या जिवापेक्षां आपल्या जिवाच्या संरक्षणार्थ मला दसपट अधिक जपावें लागतें. मीं पूर्ण चौकशी केली आहे, आणि आपणांस मी खात्रीनें सांगतों कीं खानाच्या मसलतींत कपट मुळींच नाहीं. मोंगलांचें वैर आहे; मराठे लोकांशीं नाहीं; शिवाजी महाराजांशीं त्याचें वैर आहे; कारण ते वारंवार तह व ठराव मोडून मोंगलांच्या मुलखांत शिरतात; व लुटालूट करून प्रजेस फार क्लेश देतात. मोंगलांशीं मैत्रीनें वागणारा व आपल्या प्रजेचें यथान्यायेंकरून पालन करणारा व आपल्या लुटारू शिपाई लोकांस जबरेंत ठेवणारा असा राजा रायगडच्या गादीवर बसेल तर ती गोष्ट मोंगलांस इष्टच आहे.

सं०—पण माझ्या कुळांतील पुरुषांनीं आजपर्यंत मोंगलांशीं वैरच केलें, सख्य केलें नाहीं. मोंगलांनीं बुडविलेली निजामशाही पुनः स्थापित करण्याकरितां माझा आजा दिल्लीपतीबरोबर कित्येक वर्षे झगडत होता. माझ्या बापानें आपल्या प्रतापानें मोंगलांस जर्जर केलें आहे. त्याचा पुत्र मी संभाजी, आपल्या कुळाचे व देशाचे हाडवैरी जे मोंगल त्यांच्याबरोबर कसें सख्य करूं?

ग०-संभाजी महाराज, आपल्या आजोबांनीं व वडिलांनीं मोंगलांबरोबर युद्ध करीत असतां विशेष पराक्रम केले ही गोष्ट खरी आहे. परंतु ते दिवस आतां गेले. अलमगीर बादशहाच्या पुण्यानें व प्रतापानें मोंगल प्रबळ होत चालले आहेत. त्यांनीं हिंदुस्थानांतील सर्व राज्यें बुडविलीं. आपल्या दक्षिण देशांत तरी निजामशाही ठार बुडविली. मोंगलांनीं विजापूर हाताखालीं घातलेंच आहे. कुतुबशाहीची हळूहळू तीच दशा होणार. मग आपलें एवढेंसें मराठी राज्य या दिल्लीपतीच्या सेनासमुद्रापुढें कसें टिकेल? बरें तें टिकलें असें आपण समजूं. त्यांत आपणांस लाभ कोणता? महाराजांचा मनोदय आपल्यामागें कनिष्ठ पुत्रानें राज्य करावें असा आहे. आपल्या मातुश्री परलोकास गेल्या. आपली सावत्र आई तर आपणांस पाण्यांत पहाते. दरबारी लोक आपला द्वेष करितात. मग आपणांस राज्य लाभाची आशा कोठें राहिली? याकरितां मी ह्मणतों कीं, मोंगलांशीं सख्य करून आपलें कल्याण करून घ्यावें. त्यांतून म्लेंच्छांचा आश्रय करण्यांत आपल्या मनास फारच खंत वाटत असेल, तर मी आपणांस दुसरी युक्ति सांगतों. तेणेंकरून मोंगलांचें साहाय्य घेतल्याशिवाय अल्प श्रमानें आपलें काम होणार आहे. आपली इच्छा असली ह्मणजे झालें. एकाच दिवसांत आपण "श्रीमन्महाराजाधिराज शंभु छत्रपति" असें नांव पावाल.

सं०-कोणची युक्ति? सांगा पाहूं.

ग०-शिवाजी महाराजांस धरून प्रतिबंधांत ठेवा, आणि आपण गादीवर बसून आपले नांवाची द्वाही फिरवा.

सं०-कां गणपतराव, आज सकाळींच कोठें भांग

प्यायला सांपडली ? का अकस्मात् तुमचें माथें फिरलें ?

ग०—( गंभीरपणानें ) मी भांग प्यालों नाहीं आणि सुदैवानें मला वेडही लागलें नाहीं. माझी बुद्धि इतर मनुष्यांप्रमाणें चांगली शाबूद आहे !

सं०—मग मघां काय बरळत होतास तें ? तूं मला वाऱ्याची मोट बांधूं पहाणाराच गडी दिसतोस !

ग०—शिवाजी राजाला जिवंत धरणें आणि वाऱ्याची मोट बांधूं जाणें या दोनही गोष्टी सारख्याच अशक्य आहेत हें मींही जाणतों; पण आपलें प्राक्तन असें बलवत्तर आहे कीं, तशीही गोष्ट घडून येण्याचा संभव आज आहे. ऐका—दचकूं नका—शिवाजी महाराज या क्षणीं तुमच्या अगदीं समीप आहेत !

सं०—( घाबरून ) काय ह्मणतोस ? गणपतराव, बाबा येथें आले आहेत? कोठें आहेत ते? बोल लवकर!

ग०—ते या वेळीं येथून अर्ध कोसावर रानांत फिरत आहेत. मी प्रत्यक्ष त्यांस डोळ्यानीं पाहिलें !

सं०—(अतिशय घाबरून) आतां काय करणाररे? आपला सर्वस्वी नाश झाला !

ग०—छे ! घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. त्यांजबरोबर फौजफांटा कांहीं नाहीं. फक्त दोन मनुष्य आहेत.

सं०—ते कोण बरें ?

ग०—त्यांपैकीं एक तर हिरोजी फर्जंद माझ्या ओळखीचा आहे. दुसरा प्रल्हादपंत असावासें वाटतें. महाराजांस तरी मीं धोरणानें ओळखलें. त्यांनीं जरी केवळ कुणब्याचा वेष घेतला आहे, तरी त्याखालीं त्यांचें तेज झांकत नाहीं !

सं०–ते इकडे कशाला बरें आले असावे?

ग०–या प्रांतांत मोंगल शिरले आहेत, तेव्हां त्यांची बातमी काढण्याकरितां ते आले असावे. त्यांस आह्मांबद्दल अजून संशय आला नसेल. जरी त्यांस संशय आला असला, तरी त्यांजपासून आह्मांस सध्या कांहीं भीति बाळगावयास नको!

सं०–मग आतां मीं काय करावें ह्मणतोस?

ग०–करायचें काय, महाराजांस एकदम धरून आपण गादीवर बसावें. आपल्या शौर्याबद्दल, चातुर्याबद्दल व स्वधर्माभिमानाबद्दल जिकडे तिकडे कीर्ति पसरलीच आहे. लोक आपणांस सहज वश होतील. मग सोयराबाईसाहेब व प्रधान मंडळी रडत बसतील तर बसेनात!

सं०–माझ्या हातून ही गोष्ट कधींही घडणें नाहीं. दगा करून राज्य मिळवावें अशी माझी इच्छा नाहीं! त्यापेक्षां वडिलांबरोबरच कां होईना, पण रणामध्यें तलवारीचे दोन हात करून राज्यलाभाचा यत्न करणें हें योग्य होय. मग त्यांत जय झाला तर राज्य मिळेल; धारातीर्थी मरण आल्यास स्वर्गप्राप्ती होईल!

ग०––संभाजी महाराज, आपल्या शौर्याबद्दल कोणासही संशय नाहीं. लोक ह्मणतात कीं, धैर्य, साहस, आणि युद्धचातुर्य या गुणांत बापापेक्षां मुलगा कांकणभर चढच!

सं०––असें जर आहे तर शूर पुरुषाच्या चरित्रास कलंक लावण्यासारखी गोष्ट तूं मला कशी सांगतोस!

ग०–एाचें कारण आपले शौर्याचा या प्रसंगीं कांहीं उपयोग नाहीं ह्मणून. 'नुसत्या शौर्यानें कधींही

कामें होत नसतात! शौर्यास मुख्यत्वेंकरून कपटाचें साहाय्य पाहिजे. द्रोणासारख्या प्रबल शत्रूशीं लढत असतां प्रत्यक्ष धर्मराजानेंही कपटाचा अंगीकार केला, मग आपली ती कथा काय! कपटानें जें काम एका क्षणांत होईल तें शौर्यानें दहा वर्षांत देखील होणार नाहीं! तस्मात् युक्तीच्या मार्गानें अल्पकाळांत व अल्पश्रमांत जर आपले मनोरथ सिद्धीस जाण्याजोगे असतील, तर शौर्यापेक्षां युक्तीचें अवलंबन सुज्ञ पुरुषांनीं अवश्य करावें. जर कोणी या युक्तीस 'लुच्चेगिरी' 'हरामखोरी' 'दगलबाजी' अशीं निंदाद्योतक नांवें देतील तर खुशाल देवोत! परंतु इतकें खचीत आहे कीं, कपटाचें अवलंबन केल्याशिवाय आजपर्यंत कोणीही वैभवास चढला नाहीं. फार कशाला, आपल्या वडिलांनीं जें एवढें राज्य स्थापिलें तें कशानें? कपटानेंच ना! ते जर आपल्याप्रमाणें तरवारीच्या जोरावर राज्य स्थापूं असें ह्मणते, तर चार बादशहांशीं दावा लावण्यांत त्यांचा टिकाव कसा लागता? आतां पुत्रानें पित्यास धरून कैदेंत ठेवणें हें थोडें वाईट तर खरेंच; परंतु त्यास दुसरी तोड नाहीं. आपला नाश करण्याकरितां आपल्या सापत्न मातुश्री व दरबारी लोक टपले आहेत. त्यांनीं महाराजांचें मन कनिष्ठ पुत्रास राज्य देण्याबद्दल वळविलें आहे. जर त्यांचे मनोरथ सफळ झाले, तर आपण राज्यास मुकाल इतकेंच नव्हे, तर कदाचित् प्राणासही मुकाल! याकरितां आपले प्राण राखण्यासाठीं आपणांस महाराष्ट्र देशाचें राज्य मिळविलें पाहिजे. राज्य मिळविण्याकरितां महाराजांस प्रतिबंधांत ठेविलें पाहिजे. आज जी संधि आली आहे

ती पुनः कधींही येणार नाहीं. ती फुकट दवडणें ह्मणजे शुद्ध वेडेपणा आहे !

सं०–(मनांत)काय करावें? हा किल्लेदार ह्मणेल तसतसें माझें मन वळतें. हा बोलतो तें सर्व मला खरें वाटूं लागतें ! ( मोठ्यानें ) गणपतराव, तूं ह्मणतोस ती गोष्ट करण्याचें जरी मीं मनांत आणलें, तरी ती सिद्धीस जाणें दुर्घट दिसतें. महाराजांस धरण्याचें काम सुलभ नाहीं ! त्याला शेंपन्नास माणसांचें साहाय्य पाहिजे, तें आपल्याजवळ कोठें आहे ? मी रायगडाहून निघालों तेव्हां पेशव्यानें माझ्या तैनातीस ह्मणून दोनशें मावळे दिले आहेत, पण त्यांजवळ जर आपण ही गोष्ट बोललों तर ते आपणांस जागच्याजागींच तोडून टाकतील असें ते करडे शिपाई आहेत! तुझे गडकरीही त्याच मासल्याचे लोक आहेत, हें तुला ठाऊकच आहे!

ग०––( आपल्याशीं ) मला हेंच पाहिजे होतें.(मोठ्यानें ) आपली इच्छा असली ह्मणजे पुरे आहे. दोन दिवसांत शिवाजी राजास धरून आपल्यापुढें आणतों. त्यांस धरल्यावर हेच गडकरी आपणांस अनुकूळ होतील. माणसें या कामाला पाहिजेत खरीं, पण त्याची तजवीज मीं योजिली आहे. करविरास जाऊन मोंगलांचे कांहीं लोक बरोबर घेतों, आणि शोधास लागतों. प्रयत्न होईल तितका करून पहातों. पुढें फळ येणें हें दैवाधीन आहे !

सं०–(भीतीनें)गणपतराव, ही बातमी मोंगलांस कळून देखील उपयोगी नाहीं. मोंगलांचें आणि महाराजांचें वैर कोणच्या तऱ्हेचें आहे हें तुला माहीतच आहे. जर महाराज त्यांच्या हातांत सांपडेल तर ते त्यांचा प्राण घेतल्याशिवाय स्वस्थ राहणार नाहींत. तीर्थरूपास धरून कैदेंत

टाकण्याचें निष्ठुर व नीच कर्म करण्यास मी प्रवृत्त झालोंच आहें, आणखी पित्याच्या प्राणनाशास कारणीभूत होऊन म्यां पुत्रानें कसें जगावें ?

ग०—भलतेंच नाहीं तें ! शिवाजी महाराजांचा जीव घेऊन तुह्मांला, मला, किंवा मोंगलांना तरी काय नफा आहे? आपण चिंता किमपि करूं नये. त्यांच्या जिवास धक्का पोंचेल तर त्याचा जामीन मी !

सं०—तूं करशील तें माझ्या मनाप्रमाणेंच असेल यांत संशय नाहीं. परंतु आणखी एकदां विचार कर. ज्याला केवळ हत्तीचें बळ अशा अफजुलखानासही ज्यानें यमलोकास पाठविलें; ज्याचें नांव ऐकून मोठेमोठे मोंगल सरदार कांपतात; त्या शिवाजी राजाशीं गांठ आहे, भलत्यासलत्याशीं नाहीं ! सर्पाच्या शेंपटीवर पाय देण्यापूर्वींच एकदां विचार करावा ह्मणजे बरें !

ग०—विचार करण्याची ही वेळ नव्हे सर्पाच्या शेंपटीवर पाय देऊन आह्मी चुकलोंच आहों! आतां सर्पाचे दांत काढून घेऊन त्यास पोतडींत घालून ठेवण्याकरितां आपणांस गारोडी बनलें पाहिजे! आपल्या फितुरीबद्दल महाराजांस जरी अजून संशय आला नसला, तरी ती गोष्ट फार वेळ गुप्त राहील असें नाहीं. तो जिवाजीपंत आज गडावर येणार होता, परंतु तो आंत न येईल अशी तजवीज मीं केली आहे. तो ह्मातारा केवळ आग्यावेताळ आहे ! त्याला आमच्या कृत्यांबद्दल कांहीं बातमी कळली आहे.

सं०—बरें, तीच गोष्ट काढलीस ह्मणून बोलतों. ती राधा मोठी हट्टी दिसते. ती कोणाशीं बोलत नाहीं. तिनें अन्नपाणी वर्ज केलें आहे. ती सारा दिवस रडून रडून

दुःखांत घालवते. तिची ही स्थिति पाहून माझा जीव तिळतिळ तुटतो. असें हें स्वर्गींच्या अप्सरेसारखें सुंदर रूप आणि त्याची हीदशा! तिचें या बागेंत जेव्हां दर्शन झालें, तेव्हांपासून माझ्या मनाला वेड लागल्यासारखें झालें आहे! जेवतांखातां, उठतांबसतां, तिची ती गोजिरवाणी सुंदर मूर्ति डोळ्यांसमोर दिसते! ती मला कोणच्या रीतीनें वश होईल या चिंतेंत झोंप येत नाहीं. झोंप लागली तर कधीं मौल्यवान् वस्त्रालंकार धारण करून मजपुढें हसतमुख उभी राहिलेली, कधीं मलिन वस्त्रें धारण करून शोकानें दीन होत्साती मजकडे पाहून माझी निंदा करणारी, कधीं क्रोधानें आपले काळे गरगरीत डोळे लाल करून खालचा ओंठ थरथरत असतां मला शाप देणारी, कधीं रुसलेली, कधीं शृंगारचेष्टा करणारी, कधीं पाठीस लागलों असतां वेगानें पळून अकस्मात् अदृश्य होणारी अशी ती राधा नानाप्रकारचे आविर्भाव करून स्वप्नामध्यें माझा छळ करिते. येथें काय करावें! मला वाटतें, तिजकडे जाऊन प्रांजलपणानें तिला आपला अभिप्राय कळवावा. ती वश झाली तर बरेंच नाहीं तर तिला सोडून द्यावी.

ग०—(मनांत) हा संभ्या जर त्या सुंदरीकडे जाऊन तिला मिथ्या मिथ्या बाता सांगूं लागेल, तर न जाणो कदाचित् ती याला वळेल! स्त्रियांचें चित्त चंचल असतें. तशांत यांचें नांव मोठें, हा शिवाजी राजाचा पुत्र, हा स्वरूपानें देखणा, वयानें तरुण व मोठा गुणी आहे. स्त्रियांचें अंतःकरण वेधून घेण्याची कला याच्या अंगीं मूळचीच भरली आहे! पण ती यास वश झाली असतां आमचें बस्तान बिघडेल; याकरितां आतां अ-

सें बोलूं. ( उघडपणें ) तिला सोडून देण्याबद्दल जें आपण मनांत आणिलें आहे तें फारच वाईट. अहो, असलें मासुक पांखरूं हातांत सांपडलेलें सोडून देण्याची वांछा धरितां तेव्हां आपणांस काय ह्मणावें? या गजगामिनीस चार दिवस पातिव्रत्याचे ढंग माजवावेसे वाटत असतील तर तसेंच चालूं द्या! ती अन्न घेणार नाहीं, बोलणार नाहीं, ती रडेल, ओरडेल, शिव्या देईल, अर्जवें करील, तिकडे लक्ष्यच देऊं नका; नंतर कांहीं दिवसांनीं तिच्या खोलींत डोकावून तिला हंसत हंसत विचारा कीं, 'कां राधाबाई, कसें काय? मग तिनें धांवत येऊन जर तुमच्या गळ्याला मिठी मारली नाहीं तर माझें नांव गणपतरावच नव्हे! अंमळ धीर धरा. असे उतावीळ होऊं नका!

सं०—तर सध्यां ठरलेल्या बेताप्रमाणें तूं केव्हां कामास लागणार?

ग०—हा मी जेवण आटोपून करविरास जाण्याकरितां आतांच निघतों. आपणांस सिंहासनावर आरूढ झालेले पाहिल्याशिवाय माझ्या जिवाला स्वस्थपणा मिळणार नाहीं!

सं०—ठीक आहे. जा तूं; मीही आतां स्नानास जातों.

[ दोघे जातात. ]

पहिला अंक समाप्त.

# अंक दुसरा.

## स्थळः—पन्हाळ्यावरून वडगांवाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील एक मोडकें देऊळ.

[ कुणब्याचा वेष घेतलेले शिवाजी, हिरोजी फर्जंद व प्रल्हाद निराजी हे दृष्टीस पडतात. ]

शि०—(दुःखाचा सुस्कारा टाकून) हरहर!! ज्या महाराष्ट्र देशाच्या राज्यरूपी वृक्षाचें बीजरोपण करून त्यास आज चाळीस वर्षें सतत मेहनत घेऊन मीं पाणी घातलें, तो राज्यवृक्ष अकस्मात् तुटून पडण्याचा समय आला आहे! आणि त्यास तोडणारा तरी कोण—तर प्रत्यक्ष माझा मुलगा! ज्या मुसलमानांनीं आमच्या धर्माचा छल केला ह्मणून त्यांच्याशीं मीं लहानपणापासून वैर बांधिलें, ज्यांनीं आमच्या डोक्यावर पाय देऊन आह्मांस गुलाम बनविलें ह्मणून त्यांच्याशीं झगडण्याकरितां मी हातांत तरवार धरिली,त्या यवनांशीं हा माझा शहाणा पोर मैत्री करून राज्य मिळवूं पहातो! (आकाशाकडे पाहून) शंभु! शंभु! असा कसारे तूं कुलांगार कार्टा निपजलास! माझ्याच उदरीं जन्म पावलास त्या तुला दुसरी कोठें जागा नव्हती? तूं जन्मलास तेव्हांच कां मेला नाहींस? ह्मणजे हे खेळ पहाणें तरी माझ्या नशिबीं आलें नसतें! तुला एवढा राज्यलोभ होता तरी माझ्या हाडवैऱ्यांचें साहाय्य घेऊन मला धरण्याचा प्रयत्न तूं करावयाचा नव्हतास! माझें आतां उतारवय होत चाललें; शक्ति क्षीण झाली; दिवसेंदिवस राज्य कारभाराची दगदग व काळजी माझ्यानें झेंपत नाहींशी झाली आहे. आतां मी फार दिवस वांचत नाहीं हें

उघड आहे. याकरितां माझे डोळे मिटत तोंपर्यंत तरी वाट पहावयाची होती! मुला, फार चांगलें कृत्य केलेंस! श्लाघ्य कृत्यानें माझ्या कुळास तूं मोठें भूषण आणिलेंस! आपल्या वृद्ध पित्याला फार सुख दिलेंस! (प्रल्हादपंतास) पंत, हे पुत्र बरें पुत्र! यांच्या प्राप्तीसाठीं दुस्तर तपश्चर्या करावी, याना जीव कां प्राण करून बाळपणापासून वाढवावें, हे ह्मातारपणीं सुख देतील ह्मणून आशा ठेवावी; आणि शेवटीं या पुत्रांनीं आमचे अशा रीतीनें उपकार फेडावे!!

प्र०—महाराज त्याबद्दल आतां शोक करून काय उपयोग! सांप्रत आपण ज्या संकटावस्थेंत पडलों आहों तींतून पार पडण्याची तजवीज आधीं शोधून काढून नंतर राजपुत्रास ताळ्यावर आणण्याचा कांहीं तरी उपाय पाहिला पाहिजे.

शि०—(निराशेनें) आतां कसचा उपाय! त्या पोराचें कपाळ काय आहे तें मला कळालें! पोरगा पुनः शुद्धीवर येण्याची आतां मला आशा नाहीं! तो पुढें मागें केव्हां तरी मराठी राज्य बुडवून तुमच्या माना मुसलमानांच्या हातीं देणार हें खचीत. मराठे लोकांचें स्वातंत्र्य स्थापण्यासाठीं आजपर्यंत मीं व्यर्थ श्रम केले! काळ आणि द्रव्य यांची व्यर्थ नासाडी झाली; लक्षावधि माणसांचे फुकट बळी पडले; ज्या शूर पुरुषांनीं स्वधर्माची सेवा करण्याकरितां माझी संगत धरिली, मोंगलाशीं वैर चालविण्यांत आपले जीव खर्ची घातले, त्यांच्या शौर्याचें व एकनिष्ठेचें आतां काय चीज होणार? तो भीमसेनाप्रमाणें बलवान् बाजीराव फसलकर, तो सिंहासारखा शूर बाजी परभू, तो कर्णाप्रमाणें अ-

द्वितीय योद्धा सूर्यराव कांकडा, हे आतां कोठें आहेत? जे मला आपल्या जीवितापेक्षां अधिक प्रिय मानीत होते, ज्यांनीं मला प्रसन्न करण्यासाठीं ऐहिक सुखाचा त्याग केला, ज्यांनीं असंख्य पराक्रम करून माझें प्रिय केलें, जे माझे बाळपणापासून जिवलग स्नेही, ते येसाजी कंक, प्रतापराव गुजर व तान्हाजी मालुसरे, आज मला सोडून कोणीकडे गेले! त्या बिचाऱ्यांनीं धारातीर्थीं मरण पावून सद्गति मिळविली. मी अभागी मात्र हा दिवस पाहण्यास मागें राहिलें आहें!

प्र०—सरकारांनीं असें निराश होऊं नये. मी विनंति करितों ही लक्षांत घेतली पाहिजे. सांप्रत संभाजी महाराजांची वर्तणूक जरी अशा रीतीची आहे, तरी तिजपासून ते परावृत्त न होतील असें नाहीं. त्यांचा स्वभाव थोडा उतावीळ व अविचारी आहे. त्यांतून त्यांचें वय लहान व बुद्धि अपक्व. तेव्हां दुर्जनाच्या संगतीनें त्यांच्या हातून हा अविचार घडला यांत आश्चर्य नाहीं. पुढें त्यांस जसा जसा जगाचा अनुभव येत जाईल, तशी तशी त्यांची वृत्ति सुधारत जाईल.

हि०—महाराज, प्रल्हादपंत ह्मणतात ही गोष्ट खरी आहे. संभाजी महाराजांचा स्वभाव इतका दुष्ट नाहीं. त्या दगलबाज किल्लेदाराचेंच हें कृत्य दिसतें. त्यानेंच संभाजी महाराजांस भर दिली असावी.

प्र०—महाराज, आज जी वेळ येऊन गुजरली आहे ती कठीण तर खरीच. परंतु यापेक्षांही महाराजांवर कठीण प्रसंग आलेले आहेत. त्या वेळीं महाराजांनीं धैर्य सोडिलें नाहीं; आणि आतां जर महाराज निराश झाले तर लोक काय ह्मणतील?

शि०–( विचार करून शांतपणानें ) खरें ह्मणतां प्रल्हादपंत, तुमचें भाषण योग्य आहे. शिवाजी मोठमोठ्या आणीबाणीच्या प्रसंगीं डगमगला नाहीं, आणि या वेळीं मात्र तो घाबरला असें मी दुनियेला कधीं ह्मणूं देणार नाहीं! त्यांतून माझा पितृधर्म आहे. पुत्रानें कितीही अनर्थ केले तरी ते पोटांत घालून त्याच्या कल्याणासाठीं त्यास बुद्धिवाद सांगणें हें माझें कर्तव्यकर्म आहे. तें मला बजाविलें पाहिजे.

हि०–आतां मात्र महाराजांनीं यथायोग्य भाषण केलें. महाराज असा उत्साह धरा. आशा सोडूं नका; आणि प्रयत्नांत शिथिल होऊं नका, ह्मणजे सर्व कांहीं ईशकृपेनें आपल्या इच्छेप्रमाणें होईल.

शि०–तर आतां स्वस्थपणें बसून विचार ठरवूं.

पन्हाळ्याचा किल्लेदार आह्मांस धरण्याचा मनापासून प्रयत्न करीत आहेसें दिसतें. तेव्हां या प्रसंगीं तुमची काय मसलत आहे?

हि०–( निराशेनें ) मला तर कांहीं मसलत सुचत नाहीं. बहिर्जीनें जी बातमी आणली आहे ती जर खरी असेल तर तेथून निसटून जाण्याची मोठी पंचाईत दिसते. गणपतरावानें कालच माणसें पाठवून जिकडे तिकडे रस्ते रोखिले आहेत. गांवोगांवीं पाटील कुळकर्ण्यांस, आह्मी जाऊं तेथें आह्मांस धरून ठेवण्याबद्दल सूचना केल्याच आहेत. जो कोणी आह्मांस धरून देईल त्यास मोठें इनाम मिळेल अशी दवंडी फिरविली आहे. कांहीं हुशार व धूर्त लोक, गोसावी, बैरागी, फकीर इत्यादि नानाप्रकारचीं सोंगें घेऊन आह्मांस शोधण्याकरितां हिंडत आहेत. स्वतः किल्लेदा-

रही बरोबर शंभर स्वार घेऊन त्याच कामाकरितां आज पहांटेस निघणार होता. इतक्या प्रकारांनीं इतके लोक आह्मांस धरण्याकरितां टपले असून त्यांस कसें चुकवितां येईल?

शि०—मला वाटतें कीं, या वेळीं अकस्मात् पुनः पन्हाळ गडावर जाऊन गडकऱ्यांस ओळख द्यावी.

प्र०—तसेंही करणें ह्मणजे पंचाइतीचेंच काम आहे. गडावरील शिबंदी लोक आपल्या इमानास जागून आजपर्यंत मोंगलांस वश झाले नाहींत हें खरें आहे! तथापि प्रत्यक्ष त्यांचा मुख्य अधिकारी किल्लेदार व संभाजी महाराज हे जर उघड मोंगलांबरोबर महाराजांशीं द्वेष करण्यास प्रवृत्त झाले आहेत; तर विचारे गडकरीही फिरले नसतील असें कशावरून? त्यापेक्षां मी दुसरा एक उपाय योजिला आहे. तो आपणांस पसंत पडेल तर सांगतों?

शि०—तो कोणचा उपाय?

प्र०—या प्रांतांतील सर्व गांव मोंगलांनीं घेतले परंतु वडगांव मात्र त्यांच्या हातास अजून लागलें नाहीं. याचें कारण हा गांव चांगला तटबंदी असून शिवाय येथें महाराजांचें एक ठाणेंही आहे. खेरीज या गांवांतील लोक चांगले राजभक्त असल्यानें मोंगलांचा लाग त्या ठिकाणीं साधला नाहीं. महाराजांची मर्जी असल्यास पेशवे येतील तोंपर्यंत याच वेषानें आपण वडगांवांत राहिल्यास कांहीं हरकत नाहीं.

शि०—शाबास! प्रल्हादपंत, या वेळीं योग्य मसलत दिलीत. तुह्मी ह्मणतां त्याचप्रमाणें करूं. ( समोर पाहून ). हा गडावरून ह्मातारा गृहस्थ कोण येत आहे

वरें? यानें आपणांस पाहिलें आहे त्याअर्थी आतां याची नेजर चुकवून एकीकडे सरावें तरी पंचाईतच. काल याच वेळीं त्या किल्लेदारबुवांचें दर्शन घडलें त्याबद्दल आज आह्मीं या लचांडांत पडलों आहों. आतां हे गृहस्थ आह्मांस भेटले तर काय होईल नकळे! ( हिरोजीस ) हिरोजी, तूं पुढें हो आणि हा गृहस्थ कुठला कोण वगैरे साधल्यास चौकशी करून येऊन मला कळीव. ह्मणजे त्याप्रमाणें वागणूक ठेवण्यास ठीक पडेल.

हि०—जी, हुकूम (जाऊन व पुनः प्रवेश करून) महाराज, समोरून मनुष्य येत आहे त्याचें नांव जिवाजीपंत देशपांडे. हा वडगांवचा राहणारा. हा पन्हाळ्यावर कांहीं कामाकरितां गेला होता व आतां तो परत वडगांवास चालला आहे.

शि०—जिवाजीपंत? जिवाजीपंत देशपांडे ह्मणतोस तूं या गृहस्थाचें नांव माझें कानावरून बहुत वेळां गेल्यासारखें वाटतें.

हि०—या जिवाजीपंताची व आपल्या पेशव्यांची चांगली ओळख आहे. ते वारंवार वर्णन करीत असतात कीं, हा गृहस्थ मोठा प्रामाणिक, उदार मनाचा व दयाळू असा आहे. हा ब्राह्मण जमदग्नीसारखा तापट आहे, तरी मनाचा फार कोंवळा आहे. हा मोंगलांचा पक्का शत्रु व आपला मनापासून उत्कर्ष इच्छिणारा असा आहे.

शि०—तर मग या प्रसंगीं याची गांठ पडली ही सुदैवाची गोष्ट. याजबरोबरच आपण वडगांवांत जाऊं ह्मणजे झालें. पण प्रल्हादपंत, आतां कोणावर एकदम

भरंवसा टाकण्याची सुद्धां पंचाईत. प्रत्यक्ष पुत्र देखील पित्यावर उलटून त्याचा नाश करण्यास प्रवृत्त होतो. आतां काल प्रतिकूल आला आहे. याकरितां आधीं याचें इमान कसास लाविलें पाहिजे.

( नंतर **जिवाजीपंत देशपांडे** प्रवेश करितो. )

**जि०**—( शिवाजी व त्याचे सोबती यांस पाहून ) रामराम! पाटीलबुवा, कोठले रहाणार तुह्मी?

**शि०**—हामी ऱ्हइमतपुरचे ऱ्हानार व.

**जि०**—हां, तर तुह्मी लांबून आलां आहां. इकडे कोणीकडे चाललां?

**म०**—हामी चालल्या कोलापुराला.

**जि०**—( साशंक मुद्रेनें ) कोल्हापुरास? कोल्हापुरास कशाकरितां बरें?

**शि०**—बैलं इकत घ्यायाची हाईती त्यापाई तडक जातुंया.

**जि०**—( हंसून ) हो, कोल्हापुरास हल्लीं जमले आहेत ते सगळेच बैल आहेत! भले गुलाम घीशक्कर खाऊन एकापेक्षां एक तुंद पडून राहिले आहेत! पण तुह्मीं विकत घेऊं गेल्यास तुह्मां गरीब लोकांच्या उपयोगी पडण्यासारखे ते बैल नाहींत! ते नांगराच्या उपयोगी नाहींत, मोटेच्या उपयोगी नाहींत, गोणीच्या उपयोगी नाहींत. खायला काळ व भुईला भार! शिवाय ते कडबा, पेंड, सरकी वगैरे खाणारे बैल नव्हेत. तुमची वर्षाची धान्याची बेगमी ते आठ दिवसांत खाऊन फस्त करितील; आणि जातां येतां तुह्मांस हुंदाड्या मारून दुनियाभर आग लावीत सुटतील.

**शि०**—(न समजल्यासारखें करून) काय ह्मणतां.

व तुमी. तुमी काय ह्मन्ता त्याचा अरुतवी हामाला उमेगना जनु !

जि०—अर्थ कसला खुळ्यांनों, अनर्थ झाला आहे त्या कोल्हापुरांत ! तो तेथें रणमस्तखान आला आहे. त्यानें तीन हजार मोंगल जमविले आहेत. तुह्मांला सांगतों, तुह्मी आल्या वाटेनें मागें फिरा, नाहीं तर तुह्मी तेथें गेल्यावर एखादा लांब दाढीचा खां तुमचे-जवळ काय पैसा आडका असेल नसेल तो हिसकून घेईल, आणि टाकील तुमच्या मुंता करून !

शि०—आमच्या मनामंदी इत बैल कांहीं सोईवार पडत्याल मनुनशान् आलों ! पन येऊन परत व्हाया करताय किव ! तर हामासारख्या भल्या मानूसाची तत जाण्याची सुइ नाइं ह्मन्ताय. बंरं, हामास्नी इचाराया तुमी कंच्या गांवच आन् हाकड कुनिकड जातासा ? हामास्नी वाइस सांगा कि जी !

प्र०—तुम्ही हकड कुट किल्ल्यावर गेला व्हता जनु ?

जि०—( त्रासानें ) होय, होय मी किल्ल्यावरच गेलों होतों. तुम्हाला मी अमकीकडे गेलों होतों ह्म-णून कोणीं सांगितलें ?

भ०—तकडच्या रस्त्यान तुमी आलायसा त्यापाइं इचारलं. तुमचा चेहरा लई तपत झाल्यावानी दिसतुया!

जि०—मला आधीं सांगा कीं, शिवाजी महाराजां-बद्दल रहिमतपुराकडे काय बातमी आहे ? ते स्वदे-शीं कधीं येणार ?

शि०—म्हाराजास्नी येउनशान पंधरा दिवस झाल. तुमाला अजून खबरबी लागली न्हाई ह्मना ?

जि०—( मिशांस पीळ भरीत आवेशानें ) असें

काय ? आतां पाहून घेईन या किल्लेदाराला. अधिकाराच्या गर्वानें या लुच्चाला स्वर्ग दोन बोटें उरला आहे ! पण महाराजांकडून त्यास तोफेच्या तोंडीं न देववीन तर माझें नांव जिवाजिपंत नव्हे !

शि०—आपल्याला जिवाजीपंत म्हनत्यात जनु. आन् ह्यो किल्लेदार कोन ?

जि०—त्याचें नांव गणपतराव. तो महाराजांच्या पन्हाळ्यावरील ठेवणाईत किल्लेदार आहे.

शि०—आन् त्याच्या जिवावरच उठलायसा जनु ! असं त्येनं केलं तरी काय ?

जि०—त्यानें काय केलें ? त्यानें काय नाहीं केलें असें विचार ! या किल्लेदाराचीं आईबापें हा लहान तीन महिन्यांचा असतांच मरण पावलीं. तेव्हांपासून पोटच्या पोराप्रमाणें याचें मीं पोषण केलें. हा मोठा झाल्यावर याला शिवाजी महाराजांच्या फौजेंत मींच चाकरी देवविली. आतां हा किल्लेदार झाल्यावर पूर्वींचे माझे सर्व उपकार विसरून माझा समूळ नाश करण्यास तयार झाला आहे ! यानें माझा सर्वस्वी घात केला. रणमस्तखानाचे मोंगल करवीर प्रांतांत शिरून लुटालूट करूं लागले, तेव्हां या दुष्टाच्या विश्वासावर मजजवळ काय वित्त होतें नव्हतें तें बरोबर देऊन मीं आपला मुलगा कृष्णराव व त्याची बायको यांस किल्ल्यावर पाठविलें. पुढें संभाजी महाराज पन्हाळ्यावर राहण्यासाठीं आले. हा गणपतराव किती पाजी मनुष्य आहे हें तुम्हांस माहीत नाहीं ! यानेंच संभाजीस नानाप्रकारचीं दुर्व्यसनें लाविलीं; यानेंच माझ्या सुनेस संभाजीच्या दृष्टीस पाडून ति-

जविपयीं त्याच्या मनांत पापबुद्धि उत्पन्न केली; यानेंच संभाजीकडून माझ्या मुलावर मोंगलांकडे फितूर असल्याबद्दल खोटा आरोप ठेवून त्यास कैदेंत टाकिलें; आणि माझें वित्त लुटून घेऊन नाच, रंग, तमाशे करण्यांत तें उडवून टाकिलें! आतां मी ऐकतों कीं हाच गणपतराव किल्लेदार मोंगलांस अनुकूल असून त्यानें महाराजांविरुद्ध बंड करण्यासाठीं संभाजीस भर दिली आहे! काय अधमपणा हा! तेव्हां आतां तूंच सांग कीं, हा दुष्ट मनुष्य देहांत–शासनास पात्र आहे कीं नाहीं?

म०–आन् जिवाजीपंत दादा, आज तुमी किल्ल्यावर जान्याचं कारन्?

जि०–मनांत होतें कीं गडावर जाऊन संभाजीची एकदां चांगली कानउघाडणी करावी; आणि गणपतरावाची चारचौघांत अप्रतिष्ठा करून त्यास कांहीं शरम वाटली तर पहावी!

हि०–संभाजी महाराजांची आन् गनूपतरावाची गांठ घेऊनशानी आलासा का तुमी?

जि०–(क्रोधानें जळफळत) किल्ल्यांत माझा प्रवेश होईल तर ना सगळ्या गोष्टी! मी दरवाज्याशीं जातों तों पहारेकऱ्यास हुकूम कीं मला आंत सोडूं नये ह्मणून! मी सारी रात्र उपाशी आणि थंडीनें कुडकुडत किल्ल्यावर बाहेर पडून राहिलों होतों. (डोळ्यांत अश्रू आणून) हा तरी शेवटचाच उपाय होता. आतां मी इहलोकच्या सुखास अंतरलों खरा. आतां माझीं मुलें माझ्या दृष्टीस कोठून पडणार! देवा, देवा, ह्मातारपणीं मला तांब्याभर पाणी देण्यास

सुद्धां कोणी उरलें नाहीं ! अरे दुर्दैवा, माझी आंधळ्याची काठी तूं अकस्मात् हिसकून घेतलीस !

शि०–अऱ्याऱ्याऱ्या !!! तुमचा ल्योकबी तुरुंगांत घातलाया आन् सूनबी तुरुंगांत घातलीया? अस तुमच वनवास क्येल अं ? ह्माराजान वायस बामनाकड बघायाच व्हत ! संबाजी ह्माराजाची अशी वंगाळ बुद जालिया कायव?आतां ह्मोर इचार?आतां तुमी काय करणार.

जि०–काय करणार? सांगतों तुला मी आतां काय करणार तें. शिवाजी महाराज जर कर्नाटकांतून परत आले असले तर रायगडापर्यंत एक खेप घालीन. तेथें महाराजांपुढें जाऊन आडवा पडेन आणि पदर पसरून विनंति करीन कीं, "महाराज, आजपर्यंत सरकारांशीं मी इमानानें वागलों आहें; आणि त्रेळोवेळीं मीं यथाशक्ति या गादीची सेवा केली आहे. मजवर आपल्या पुत्राकडून व आपल्या कामदारांकडून अशा अशा रीतीनें जुलूम होत आहे. आपण न्याय करण्यांत प्रत्यक्ष धर्मराज आहांत अशी आपली कीर्ति आहे, ह्मणून मी पायांशीं आलों आहें. तर या कामांत आपला पुत्र अपराधी आहे तरी आपण मज गरिबावर योग्य न्याय करून कृपा करावी."

शि०–ह्य सार तुमी मनामंदी वातल खरं; पन तुमचं ऐकूनशान् पोटच्या पोराच बी पारपत शिवाजी ह्माराज करत्यो काय ! पोटच्या पोराची माया त्याला येनारच असं मी ह्मनतों.

जि०–(रागानें) तूं फार शहाणा आहेस. मोठा आला लेक मला सांगणारा ! मी " असें ह्मनतों आणि तसें ह्मनतों ! " मूर्खा, खऱ्या मार्गानें जे चालतील त्यां-

चें शिवाजी महाराज पालन करितील तसें प्रत्यक्ष पुत्राचेंही करणार नाहींत. दुष्टांचें शासन करण्यांत ते काळाप्रमाणें उग्र आहेत हें तुला माहित नाहीं?

शि०—काय. राव ह्मन्ता येड्यावानी! शिवाजी म्हाराज ह्मन तुमची दाद घेतूया! (हिरोजीस) कायव वहिरोजीबुवा, ह्येनी ह्मन्त्यांत त्यापरमान शिवाजी करील कायव?

हि०—मला तर वा लई कोड पडलया!

जि०—(संतापून) काय? काय ह्मणतोस बोल ते शब्द पुनः तूं शिवाजी महाराजाविषयीं असे शब्द बोलतोस त्या तुझी जिव्हा कशी तुटून पडत नाहीं! अरे आमचे महाराज ह्मणजे प्रत्यक्ष सांबाचा अवतार!

शि०—(तिरस्कारानें) सांभाचा अवतार कुट दरोड घालतो? ठाव हाय जिवाजीपंत, बसा उगीच. शिवाजीचा त्येगार आम्हाम्होर सांगुबी नगा! त्यानं मग किरत केलेली ठावी हाय तुमाला; नर्मदा नदी धरूनशान तुंगभद्रेपावतर झडा दुनिया ओस् पाडूनशानी गबर होऊन बसलाया. अन् येड्या वामना, त्याची भरांत कशाला धरतुयास? जा बस जा घरामंदी, नाहीं तर तूंबी मरून जाशील. त्याच्या नावान समदी दुनिया खड फोडतिया. जवां जवां जवां त्यो मोगल अन् सिदी अन् विजापुरवालाबी येउनशान् झडा दुनिया लुटून गेला, तवां त्यो तुमचा परजा पाळणारा कुट मुर्का मारून बसला व्हता? त्याच्या नावान सारी परजा धाई धाई रडतिया आन् ह्मन् शिवाजी न्याई आन् चंदरराव मोऱ्या.

जि०—(चवताळून) थांब तुझी बत्तिशीच हालवून

सोडतों! पाजी मनुष्य कुठला! आपण कोण आपली योग्यता काय, आपण कोणाविषयीं बोलत आहों याचें तुला भान नाहीं वाटतें? शिवाजी महाराजांनीं वेळोवेळीं संकटें प्राप्त झालीं असतां जे जे उपाय केले, ते यथायोग्य प्रसंगास अनुसरूनच होते. पण हें तुला कुणबटाला सांगून काय उपयोग! महाराजांची निंदा करण्यासाठीं तुझी जिव्हा जी इतकी वळवळत आहे ती तुझ्या जाभाड्यांतून उपटूनच काढिली पाहिजे! तूं आमच्या गांवांत जर हें शब्द बोलतास तर तुझी धिंडच काढिली असती! लुच्चा, बेशरम मनुष्य कुठला! माझ्या समोर शिवाजी राजाची निंदा करतोस त्या तुला असा खरपूस मार देतों कीं तूं आठ पंधरा दिवस अंथरुणावर कुंथतच पडशील! (शिवाजीस मारावयास धांवतो.)

प्र०—(बावरून आपल्याशीं) आतां काय करावें या खुळ्या ब्राह्मणाला? (घाईघाईनें पुढें होऊन) अहो जिवाजीपंत, मागें सरा मागें सरा आधीं. तुह्मी कुणापुढें—

शि०—( प्रल्हादपंतास डोळा घालतो. )

प्र०—(आपल्याशीं) खरेंच. मी भलतेंच बोलून जात होतों. पण रागाच्या आवेशांत जिवाजीपंताचें तिकडे लक्ष्य गेलें नाहीं हें बरें झालें. (उघडपणें) आहो ऱ्हाउंद्या ऱ्हाउंद्या, वाटच्या वाटसरासंगं तुमी काय लावलया? कुनाला कसं वाटतं आनू कुनाला कसं वाटतं तुमचं भांडन कशापाई? शिवाजी कुट हाय आनू तुमी कुट हायसा. ( जिवाजीपंतास अडवितो. )

जि०—(आवेशानें)हो एकीकडे! आधीं महाराजांची निंदा करणाऱ्या माकडतोंड्या मुरदाड कुनबटाचीं हाडेंनूहाडें मोकळीं करितों!, (जिवाजीपंत पुढें येत असतां

प्रल्हाद निराजी त्यास मिठी घालून एकीकडे ओढतो.)

शि०—(हंसून आपल्याशीं) प्रजेचें मन मजविषयीं कसें आहे हें पाहण्याकरितां मी वेषांतर करून पुष्कळ वेळ गुप्तरूपानें हिंडलों आहें; पण अशी कडक राजभक्ति मात्र आजपर्यंत माझ्या दृष्टीस पडली नव्हती. (उघडपणें) सोडा-सोडा कन्याखाऊ बामन् येऊंद्या वरं वगूं!

प्र०—(आपल्याशीं) आमचे महाराज सत्त्वधीर आहेत. ज्याप्रमाणें एकादें अजाण मूल सिंहाची उग्रता न जाणून त्याच्या झिंजोट्या धरून ओढीत असतांही सिंहास मुळींच राग येत नाहीं, तर उलटा तो त्या बालकाकडे प्रसन्नमुद्रेनेंच पाहत असतो, त्याप्रमाणें हा भोळसर ब्राह्मण आपल्या प्रभूशीं उद्धट आचरण करीत आहे, तरी महाराजांची प्रसन्नता अधिकच वाढत आहे! ब्राह्मणानें उरावर लाथ मारिली असतां तें भूषण ह्मणून मिरविणाऱ्या श्रीहरीची उपमा आमच्या महाराजांस चांगली शोभेल!

हि०—अहो जिवाजीपंत, बामनासनी इतका कुरद असूं नये. तुमच्या पायास्नी हामी गरीब कुनबी तुमच तिरुत घेऊनशानी हामी न्हानार. अन् आमच्यावर तुमची कुरपा असूं द्याची. अन् तुमी रागावून मारांया उटलायसा. हामी काय ह्मनतो त्यें अगुदर ऐकूनशान तरी घ्या.

जि०—तुमचें काय ह्मणणें असायचें आहे?

प्र०—हामी इत्कच ह्मनूतों, जवां तुमची भेट झाली तवां तुमी ची महाराजांचे अबिमानी हायसा, ह्य हामाला ठाव नव्हतं. हामी शिवाजी ह्माराजाची इत्की नालस्ती केली त्याचं कारन तुह्मास फोडूनशान् सांगतो. आतां या मुलकामंदी म्हाराजाचा अमल नाहीं व्ह-

य. मोंगलाचा अंमल तर जालाया. या अमदानींत कोनाचं मन कसं असतं काय ठाव हाय? ह्मनुनशान् हामी बघा आमच्या कामाला निगालुया. तवां आपला राजा तसा परजा होऊनशानी आपल कारन करून जान्याचा हामचा ञ्योत. त्यापरमान तुमच्या मनाच धोरुन काडाय पाइ हामी तसं बोललों. पन हामी बी शिवाजी ह्मा- राजांच्या अन्नानं ह्य दिवस पायला. शिवाजीचा अ- बिमान हामाला नाहीं अन् तुह्माला त्येवढा हाय व्हय? पन करनार काय ? ह्यं सारं ध्यानामंदी घेऊनशान मग बोला ह्मन्.

जि०–( किंचित् खजिल होऊन ) हो. तेंहीं खरेंच. पण तुह्माला खरेंच सांगतों, ही गोष्ट प्रथम माझ्या लक्षां- त आली नाहीं. मला असें कळालें नाहीं कीं, महाराजां- च्या जयदुंदुभीचा नाद ऐकून ज्यांच्या बाहूंस स्फुरण चढ- णार नाहीं, असा मनुष्य महाराष्ट्र देशांत असेल कसा? ते- व्हां हे लोक जें बोलतात तें कांहीं कारणानेंच बोलत असती- ल.तुमची खरी योग्यता न ओळखल्यानें मी तुमचा मोठा अ- पमान केला ( शिवाजीचा हात धरून) कां पाटीलबुवा ?

शि०–कायव जिवाजीपंत, घडीमंदी इत्का फेर पा- डलायस्रा कायव. मंगा मला माकडतोंड्या, मुरदाड कुनबट बी बोलला, अन् आतां ह्मन पाटील. बरं हांसा.

जि०–अरे झालें तें झालें. मी अविचारी मनुष्य आहें. क्रोधामध्यें मी काय बोलतों याचें मला भान रहात नाहीं. परंतु मागून मात्र फार वाईट वाटतें. तुह्मी महाराजां- चे गरीब प्रजाजन असून तुह्मांस मी कांहीं बोल- लों असेन तर त्याचा राग मानूं नका. तुह्मी शिवाजी म- हाराजांची निंदा केलीत हें मीही मनांत ठेवीत नाहीं

माझ्या मनांत तुमच्याविषयीं कांहीं वाईट राहिलें नाहीं. यास प्रमाण ( खिशांतून रुपया काढून ) हा रुपया मी तुह्मांस पानसुपारीकरितां देतों, हा घ्या.

शि०–( हंसून ) ठेवा राव रुपया ठेवा! मानुस जोडलइ का पैसा जोडलई! तुमीच सांगा?

जि०–अरे, तुह्मी फार भले मनुष्य दिसतां. चला आतां दोनप्रहर भरत आले. चला आमच्या गांवांत. वाटेनें चालून थकलां शिणलां असाल. याकरितां आजचा दिवस मुक्काम वडगांवांत करून उद्यां घरच्या वाटेला लागा. आतां तुह्मी कोल्हापुरास जाणें ह्मणजे शुद्ध वेडेपणा आहे!

हि०–न्हाई न्हाई हामाला मांग ग्यलच पाहिजे. सुगी आलीया अन––

शि०–म्यां बी लइ बामनं बगितलीं. पन् तुमावानी नाहीं बगितला भोळासंकर. मला बी वाटतया तुमच्या पायासंग चाकरी करूनशान् ऱ्हाव.

जि०–( प्रल्हादपंतास ) हें काय ह्मणतो हा!

प्र०–अव जिवाजीपंत दादा, ह्यो आमासंग कुट चाकरी बगाया आलाया. तुमावानी भल्या गिरस्तानें ठेवला तर ह्यो ऱ्हानार हाय. कामालावी लई हुशार. आन बगा सदा आनंदांत. यजमानाची मर्जी खुस करून ऱ्हायाचा. ठेवा ठेवा तुमी त्याला चाकरीला.

जि०–सांप्रत माझा काल विपरीत आला आहे. आतां चाकरमाणसें मला कशास पाहिजेत? त्यांस बाळगण्याची मला शक्ति कोठें आहे? मी घरीं गेल्यावर माझ्या आसऱ्यास जे चार लोक आहेत त्यांसच मी निरोप देणार आहें!

शि०—रोजमुऱ्याची इशेश जिकोर न्हाइ बगा. तुमी पायासंग ठेवा मजी झालं. माज काम बगुनशानी सुइ सुइ प-रमानं पगार द्या म्हन. आतां तर आसं का न्हाइं राहिली ?

जि०—( आश्चर्यानें ) काय ! चाकरी करून वेतनाची कुरकुर नाहीं असें म्हणतोस? असला कसला चाकर हा ? माझ्या घरीं कांहीं नाहीं तरी दहा गडी आहेत. पण गुलाम सगळे आळशी, आंगचोर, उर्मट आणि भांडखोर असे आहेत. कोणचेंही काम त्यांस सांगा. तें त्यांनीं म्हणजे कधीं व्यवस्थेनें केलें असें घडणेंच नाहीं ! तरी पण महिना सरला नाहीं तों आधींच ते पगारासाठीं तगादा सुरू करितात! पण तुझी तऱ्हा पहावी तों अगदींच निराळी ! तूं पूर्वजन्मीं कोणी तरी राजा असशील.

शि०—( आपल्याशीं ) मीं पूर्वजन्मीं राजा होतों किंवा नव्हतों हें मला माहीत नाहीं, पण या जन्मीं मात्र मी राजा आहें खरा !

जि०—बरें बाबा, ज्या अर्थीं तुझी मजवर इतकी भक्ति आहे, त्या अर्थीं तुला नाखुष करणें वाजवी नाहीं. यजमानाची भरभराट चारचौघां आश्रित लोकांच्या दैवानें होत असते असें म्हणतात. तेव्हां तुझ्या दैवानें तरी माझा ऊर्जित काळ कशावरून येणार नाहीं? चल मजबरोबर. वाटेनें जातां जातां तुला काय काम सांगावयाचें तें ठरवून टाकूं. अरे, पण तुझें नांव काय तें मला आधीं सांग बरें ?

शि०—(हात जोडून) मला धर्म्या म्हनत्यात धनीसाब.

जि०—वा: ! काय गोड नांव तरी ? धर्म्या, धर्माजी, धर्माजीराव कसेंही म्हटलें तरी कानाला गोडच लागतें ! तूं जर एकदां राजा असतास तर तुझें नांव कसें ' धर्मराज ' असें सुंदर शोभलें असतें !

प्र०—( शिवाजीच्या कानाशीं लागून ) सरकार आपल्या सुरक्षितपणाबद्दल जी आह्मांस काळजी होती ती सुदैवानें दूर झाली. आतां आह्मी काय करावें याबद्दल सेवकांस आज्ञा झाली पाहिजे.

शि०—( प्रल्हादपंतास हळूच ) तुह्मी येथें राहून किंवा मजबरोबर वडगांवास येऊनही तुमचा कांहीं उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. मजविषयीं ह्मणाल तर गणपतरावाकडून किंवा करवीरच्या मोंगलाकडून मला उपद्रव होण्याची मुळींच काळजी नाहीं. याकरितां तुह्मी दोघे येथून जा, आणि पेशव्याची गांठ घेऊन त्यांस इकडील वर्तमान कळवा. समजलास हिरोजी, मी काय ह्मणतों तें ? मजविषयीं चिंता आतां अगदीं करूं नका.

प्र० व हि०—जसा महाराजांचा हुकूम होईल त्याप्रमाणें करणें हें आमचें काम.

शि०—या तर आतां तुह्मी.

प्र०—( जिवाजीपंतास ) बाल्या, आमच्या धर्म्यास आतां जपूनशान् वागवा.

हि०—तुमी बी इचारी हायस खरा. ह्यापाई हामी लई सांगत नाहीं.

जि०—धर्म्याविषयीं आतां काळजी सोडा. या तर आतां राम राम ?

प्र० व हि०—(जिवाजीपंतास) राम राम! (शिवाजीस) धर्माजी बुवा, बामनाच्या मनापरमान ऱ्हावा बरं काय ? रामराम.

शि०—रामराम ! (सर्व निघून जातात. )

## दुसरा अंक समाप्त.

# अंक तिसरा.

## स्थळः—वडगांवांतील जिवाजीपंताचा वाडा.

( मध्यरात्र झाली असतां शिवाजी येतो. )

शि०— ( आपल्याशीं ) लोक ह्मणतात कीं या जगामध्यें सुख व समाधान यांचें राजपद हें स्थान होय. परंतु स्वानुभावावरून मी खचीत सांगतों कीं, ही त्यांची समजूत खरोखर चुकीची आहे. जसें जसें पर्वतावर उंच चढूं लागावें तसें तसें श्वासोश्वास करण्यास कठीण पडतें, त्याचप्रमाणें वैभवाची गोष्ट आहे. तें जसें जसें मनुष्याला अधिक प्राप्त होईल तशा तशा त्यांच्या चिंता अधिक वाढतील व त्या मानानें त्यास सुखप्राप्तीही कमीच होईल. यापेक्षां दिवसभर मेहनत करून आपलें व आपल्या कुटुंबाचें पोषण करणारा गरीब कुणबी जास्त सुखी होय! कारण त्याची तृष्णा थोडी. मीच पहा, आज चार दिवस या जिवाजीपंताकडे घोड्याची चाकरी करून आहें. जर मोंगल माझ्या देशबांधवांस धुळीस मिळविण्याचा यत्न न करितील, किंवा मजशिवाय जर कोणी दुसरा भाग्यशाली पुरुष माझ्या जन्मभूमीची मुक्तता करण्यास उभा राहील, तर या स्थितींत मरण येई तेथपर्यंत मी खुशाल काळ काढीन. आतां एवढें खरें आहे कीं, मूर्धाभिषिक्त क्षत्रियानें असलें काम करणें हें त्याच्या प्रतिष्ठेची हानि करणारें आहे. तरी पण यांत मला लघुत्व येत नाहीं. प्रत्यक्ष भगवंतानेंही आपल्या भक्तांचीं घोडीं धुतलीं, मग तेंच काम मला करण्यास हर-

कत कोणचो! श्रीकृष्णाची अर्जुनावर जितकी ममता होती तितकीच माझी ममता याच जिवाजीपंतावर आहे! याचा स्वभाव किती साधा व सरळ? याचें मन किती थोर व. निर्मळ? याला क्रोध जरी तत्काळ येतो तरी त्यापासून दुसऱ्याची हानि व्हावयाची नाहीं. त्याला अभिमान आहे तरी त्या अभिमानापासून कोणाचें मन व्यथित व्हावयाचें नाहीं. (इकडे तिकडे फिरत) काय शांत वेळ ही! प्राणीमात्र निद्रेमध्यें निमग्न असल्यानें जिकडे तिकडे अगदीं सामसुम झालें आहे. या वेळीं चांदणें तरी किती शुभ्र पडलें आहे! भगवान् चंद्रमा आपल्या अमृतमय किरणांनीं पृथ्वीस दुग्धस्नान घालीत आहे! खरेंच, या चांदण्यांत अंमळ हिंडलें फिरलें असतां मनाला आनंद होऊन मोठी हुशारी येते. (आकाशाकडे पाहून) इतक्यांत चांदणें अंधक झालें? होय! चंद्राच्या आड मेघसमुदाय आल्यानें त्याचा उजेड अस्पष्ट झाला. हे चंद्रा, तूं एवढा आकाशाचा सार्वभौम राजा, असूनही तुला कधीं कधीं हे मलिन मेघ आच्छादून टाकतात मग मीं संकटकाळीं कुरकुर कां करावी? (बंदुकीचे बार ऐकून व चपापून) काय? एवढ्या रात्रीं बंदुकीचे बार? हें काय बरें असेल? काय गांवांत कोणाच्या घरावर दरोडा तर नाहींना आला? छे! पण एवढ्या तटबंदीच्या गांवावर दरोडा कोठून येणार? (आणखी बार होतात, शिंगें वाजतात व मोठा गलबला होतो तो ऐकून) आणखी आवाज? हां समजलों. हा दरोडा तर खराच. पण तो द्रव्याकरितां नव्हे. तर हा माझ्या जिवितावर दरोडा आहे! मला धरण्यासाठीं मोंगल जमून

आले आहेत, आणि त्यांस पाहून हे पेशीवर पहारेकरी घाबरून बार काढीत सुटले आहेत असें वाटतें. ( आवेशानें व क्रोधानें ) ठीक आहे. मला धरण्यासाठीं मोंगल येतात तर खुशाल येवोत ! त्यांचीं पुरीं शंभर वर्षें जर भरलीं असतील तर त्यांस नको कोण ह्मणेल ! हे माते धरणी, आज तुला भारभूत झालेल्या या यवनांचीं सहस्रावधि शिरें तुला वहातों ! त्यांचा स्वीकार करून तूं मजवर संतुष्ट हो. ( मिशांवर ताव देऊन ) मोंगलांस इतकें पक्कें माहीत असावें कीं, शिवाजी कोणच्याही स्थितींत असला तरी जेथें जेथें त्याची व मोंगलांची गांठ पडेल, तेथून तेथून त्यांनीं रडतच निघून गेलें पाहिजे ! वाहवा ! आमचे यजमान जिवाजीपंतही उठून डोळे चोळीत इकडेच येत आहेत.

---

## प्रवेश दुसरा.

[ जिवाजीपंत प्रवेश करितो व त्यामागून दुसरे कांहीं लोक येतात. ]

**जि०**—कायरे ? हा गांवांत गलबला कसला ? आज कोणाकडे गोंधळ आहे वाटतें.

**एक जण**—जिवाजीपंत, गोंधळ गांवांत नाहीं, गांवाबाहेर आहे.

**जि०**—ह्मणजे ? याचा काय अर्थ ?

**दुसरा**—अर्थ कसला ? बंदुकीचे आवाज तुह्मीं ऐकिले नाहींत ?

**जि०**—( गलबला ऐकून ) अरे हें आहे तरी काय ?

**तिसरा**—करविराहून मोंगल आले आहेत.

जि०—मोंगल आले? अरे, मग येथें शुंभासारखे उगीच काय उभे राहिलां? त्या पलिकडच्या सोप्यांत निजलेल्या मंडळीला उठवा. अहो शामराव, गोविंदपंत उठा उठा! कोणी तरी वेशीवरच्या शिपायांस जाऊन सांगा कीं, " भिऊं नका, आह्मी येऊं तेथपर्यंत दम धरा. " शामराव, तुह्मी जाऊन आमच्या तवेल्यावरच्या माडीवर गडी निजले आहेत त्यांना उठवा. त्या सगळ्या गुलामांना बाहेर काढा! कोणाजवळ हत्यार पात्यार नसेल तर पहा. परवां मीं त्या फिरंगणांतून आलेल्या दहा बंदुकी विकत घेतल्या आहेत त्या खालीं काढा. गोविंदपंत तुह्मी आधीं ठाणेंदारास बोलावून आणा.

ठाणें०—( प्रवेश करून ) मला बोलावणें नको. हा मी आलों.

जि०—शाबास वेळेवर आलेत तुह्मी. आज ठाण्यांकिती शिपाई हजर आहेत? बोला.

ठाणें०—पन्नास असामी आहेत.

जि०—ठीक आहे. ते आणि आमचे पंधरा सोळा, गडी यांस बरोबर घेऊन तुह्मी वेशीवर चला. तेथील पहारेकऱ्यांस हुशारी द्या. मोंगलांस पुढें येऊं देऊं नका.

ठाणें०—जिवाजीपंत, मोंगलांची जमात मोठी दिसते. ते निदान एक हजारावर लोक आहेत. त्यांपुढें आमचा निभाव लागण्याची पंचाईत दिसते.

जि०—आणि ते दहा हजार असले ह्मणून काय झालें? चला, त्यांची धूळधाण उडवून देऊं. मीही आतां गांवांत जातों. प्रत्येक घरांत शिरून जितके ह्मणून पुरुष सांपडतील तितक्यांना बाहेर काढून मी

त्यांस बरोबर घेऊन येतों. आज मोंगलांची खात्री झाली पाहिजे कीं, शिवाजी महाराजांची प्रजा गरीब व गांवढळ असली ह्मणून ती उगीच कोणाचा त्रास सोसून घेणार नाहीं ! शिवाजी महाराजांच्या राज्यांतील लोकांस नांगर व तरवार हीं दोनही सारख्याच कुशलतेनें हातांत धरितां येतात. ( डोळ्यांस पाणी आणून ) जर माझा शूर पुत्र आज येथें असता, तर मला ह्मातार्‍याला ही यातायात कशाला पाहिजे होती? असो; ईश्वरी इच्छा. ( मंडळीस ) चला आतां, विलंब करण्याची ही वेळ नव्हे. ( जिवाजीपंत व शिवाजी याशिवाय सर्व जातात. )

जि०—( शिवाजी पाहून ) कोणरे तो ? धम्या ?

शि०—जी व्हय. मीच त्यो.

जि०—मग तूं येथेंरे कां उभा ?

शि०—अपुन लडाइ कराया निगालायसा. मीबी तुमच्या मागून येव ह्मनतों.

जि०—हा खुळ्या ! तेथें काय घोड्याला खरारा करावयाचा आहे ! तुला बंदूक कशी धरावी हें तरी माहीत आहे ?

शि०—न्हाई ह्माराज.

जि०—( हंसून) मग मजबरोबर तूं येऊन उपयोग काय ? या मोंगलांबरोबर लढण्याची योग्यता येण्यास जन्माचे जन्म शिपाईगिरींत घालवावे लागतात. तें काम आह्मीच करावें. तूं जन्मांत कधीं लढाई पाहिलीही नसशील. तूं आपला बैस घरीं. घर राखण्यास कोणी तरी पाहिजे.

शि०—न्हाई न्हाई, त्ये व्हयाचं नाहीं. मीं तुमच्या

पायांशींच न्हानार. जत तुमी तत मी. ह्योच समदा इच्यार.

जि०–( आपल्याशीं ) काय इमानी मनुष्य आहे हा ! ( मोठ्यानें ) तुझी जर इतकी उत्कंठा असेल तर चल मजबरोबर ! उगीच कुठें हातापायांला जखम लागून जन्माचा लंगडा किंवा थोटा होऊन बसशील ह्मणून ह्मणत होतों. बरें, आतां घरीं दुसरा गडी ठेवून तुला बरोबर नेतों.

शि०–माजं बी त्येंच ह्मननं. चला तर.

[ शिवाजी व जिवाजीपंत जातात. ]

---

## प्रवेश तिसरा.

### स्थळः—वडगांवांतील एक रस्ता.

( शामराव व गोविंदपंत समोरासमोर येतात. )

शा०–कां गोविंदपंत, आज तुह्मी होतां कोणीकडे ? वेशीवर तर दिसलां नाहीं !

गो०–आज आमची वेशीवर योजनाच झाली नव्हती.

शा०–कां ? असें कां बरें ? तुह्मी जिवाजीपंताच्या तावडींत सांपडलां नाहीं वाटतें.

गो०–अहो, तो ह्मातारा मला कुठला सोडायला ? तो ह्मणाला, " चला वेशीबाहेर मोंगल आहेत त्यांचा चांगला समाचार घेऊं. " पण मोंगलांचें नांव ऐकिल्याबरोबर माझें अंग भीतीनें थरथर कांपूं लागलें !

शा०–( हंसून ) छे हो ! तुमच्या अंगांत लढाईचें स्फुरण भरलें असें ह्मणा ! बरें मग तुमचा हा युद्धोत्साह पाहून जिवाजीपंत काय ह्मणाला ?

**गो०**—तो ह्मणाला " काहो गोविंदपंत, असे कांपतां कां ? तुह्माला अलीकडे हिंवताप येत असतो वाटतें. " मी चटकर ह्मणालों, " होय. मला हींव येत असतें. काय करावें ? " मग तो ह्मणाला, " गोविंदपंत, आज तुमचा तर मग वेशीवर उपयोग नाहीं. तुह्मी त्या पलीकडल्या बुरुजावर चढा, आणि इतकेंच करा कीं मोंगल आपलें ठिकाण सोडून गुप्त रूपानें जर कोठें दुसरीकडे तटावर चढण्याचा एलगार करतील तर आह्मांस कळवा. " मी हर्षानें नाचत नाचत्च आपल्या कामावर गेलों. तेथून तुमच्या आरोळ्या व बंदुकीचे बार ऐकून माझ्या तर कानठळ्या बसल्या! त्या वेळीं मला वाटलें कीं, लोक " युद्धस्य कथा रम्या " असें ह्मणत असतात तें कांहीं खोटें नाहीं ! असो, मग लढाई संपून मोंगल पळून गेल्यावर मी खालीं उतरलों.

**शा०**—मग तर तुह्मी मोठे दुर्दैवी ह्मणावयाचे. कारण कीं, आमच्या गांवकऱ्यांनीं आज जी कांहीं मर्दुमकी केली ती अवर्णनीय होती ! त्या दुष्ट यवनांच्या जुलुमापासून आपल्या घरादारांचें व बायकांपोरांचें रक्षण करण्याकरितां आपल्या मंडळीचे अचाट प्रयत्न पाहून एकादे भागूबाईसही स्फुरण चढलें असतें!

**गो०**—शाबास ! एकून आमचे गांवकरी बहादर तर खरेच; कारण कीं, मोंगल ह्मणजे आज काल कांहीं सामान्य योद्धे नव्हत. त्यांच्यापुढें विजापूरवाल्यांच्या फौजांचा दम निघत नाहीं, व ते शिवाजी महाराजांच्या मावळे लोकांसमोरही युद्ध करण्यास कधीं मागें घेत नाहींत; तर असे मोंगल आह्मांपेक्षां पांचपट संख्येनें

अधिक असूनही आह्मीं त्यांस दाद दिली नाहीं. हें केवढें भूषण ह्मणावयाचें!

शा०—पण आज एक महापराक्रमी पुरुष जर आपल्या साह्यास न येता तर आमचे इतकेही प्रयत्न व्यर्थ झाले असते!

गो०—असा पुरुष कोण बरें?

शा०—तो कोण हें तुह्मांस सांगितल्यास खरें सुद्धां वाटणार नाहीं! आपल्या जिवाजीपंतांनीं तो नवीन ठेविलेला गडी धर्म्या, तो तुह्मांस माहीत असेलच.

गो०—मग तुह्मी त्याचें नांव घेणार वाटतें?

शा०—अहो, तो धर्म्या ह्मणजे एक झांकलें माणीक आहे बरें! दिसतांना पहा कसा भोळसर कुणबी दिसतो, पण त्याची कृति पाहिली तर केवळ अलौकिक आहे! (हळू स्वरानें) गोविंदपंत, मला वाटतें, हा देशपाड्यांनीं ठेविलेला गडी कोणी तरी मोठा मनुष्य असावा. याच्या दिसण्यावर तुह्मी जाऊं नका. तुह्मांला मी खचित सांगतों कीं हा हाडाचा खरा शिपाई आहे. याला युद्धकलेची पूर्ण माहिती असून यानें जन्मभर हाताखालीं मोठाल्या फौजा बाळगिल्या असाव्यात असें दिसतें.

गो०—छे, भलतेंच नाहीं तें! शामराव, असला मनुष्य जिवाजीपंतांच्या घरीं घोडे घांसून पोट भरण्यास कशाला राहील?

शा०—अहो शत्रु कोणास नाहींत? दुर्योधनादिकांच्या छलानें पांडवांसारखे राजपुत्रही अज्ञातवासांत नानाप्रकारचीं हलकीं कामें करीत होते. त्याचप्रमाणें या शूर गृहस्थावरही कांहीं संकट येऊन यानें हा वे-

प धारण केला असावा, असा माझा तर्क वाहतो.

गो०—पण तुह्मी जी इतकी स्तुति करितां, असें त्यानें आज काय बहादुरीचें काम केलें ?

शा०—सांगतों ऐका. जिवाजीपंताच्या हुकुमाप्रमाणें जेव्हां मीं वेशीवर गेलों, तेव्हां आमचे सरासरी दीडशें लोक जमले होते. आह्मांस वाटलें होतें कीं मोंगलांस ह्याच ठिकाणीं आटपून धरलें ह्मणजे झालें. पण शत्रूची हिकमत मोठी! ते वेशीसमोर अर्ध्या हांकेवर जमावानें येऊन थांबले. तेथें ते नौबदी वाजवून व शिंगें फुंकून मोठा गलबला करूं लागले. शत्रूंचा वेशीवर नीट चालून येण्याचा रोख पाहून आह्मीही त्यांजवर आपल्या बंदुका भराभर सोडूं लागलों. पण इतक्यांत शत्रु कांहीं अंतरावर तटास शिड्या लावून वर चढूं लागले, ते प्रथम आमच्या दृष्टीस पडले नाहींत. मग पहातों तों शें दोनशें गांवांत शिरलेले! त्यांस पाहून आह्मी घाबरलों. ठाणेदार तर निराशेनें हातावर कपाळ टेंकून उगीच बसला. पण धर्माजीनें धीर सोडिला नाहीं. तो ह्मणाला, “ चला! अजूनही चला!! प्रयत्न केला तर अजूनही आपला बचाव होईल. धीर सोडूं नका.” नंतर सवाशें असामींची टोळी करून आह्मीं त्यांत धर्माजीसच मुख्य केलें. मग झाडांच्या सावलींतून छपत छपत आह्मी शत्रूंच्या अगदीं समोर गेलों; व ‘ हरहर ’ करून त्यांजवर एकदम झडप घातली. तेव्हां जी चकमक उडाली तिचें वर्णन काय करूं ? मोंगल असावध असतां जरी आह्मी छापा घातला होता, तरी ते मोठ्या शौर्यानें लढले. आह्मीही कांहीं कमी मर्दुमकी केली असें नाहीं.

युद्धकलेमध्यें वाकबगार असणाऱ्या मोंगलांबरोबर आमचा टिकाव या हातघाईच्या प्रसंगीं लागला नसता; परंतु धर्माजीचा अचाट पराक्रम पाहून आह्मांसही स्फुरण आलें. त्या वेळीं कोणी जिवाची पर्वा केली असें नाहीं. भाले, बर्च्या, कट्यारी, यांच्या जखमा लागून कित्येकांच्या अंगांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. सोट्यांच्या तडाक्यांनीं कित्येकांचीं डोकीं फुटलीं. चांदण्यामध्यें विजेप्रमाणें तरवारी चमकूं लागल्या. ह्याप्रमाणें अर्धी घटका होऊन शेवटीं शत्रु मागें फिरून शिड्या लावलेल्या ठिकाणाकडे पळून जाऊं लागले. परंतु खालीं जिवंत व सुरक्षित असे थोडकेच जाऊन पोंचले असतील! कारण कीं, आह्मी हर्षानें गदारोळ करीत त्यांच्या पाठीस लागून लांडगेतोड केली. आह्मांपैकीं तीस असामी ठार होऊन पडले आहेत. शिवाय पुष्कळांस जबर जखमा लागल्या आहेत.

गो०—अरेरे! ही मोठी वाईट गोष्ट झाली. पण त्या मुसंड्यांस या गांवच्या लोकांच्या अंगांत पाणी कितपत आहे हें चांगलेंच कळलें!

शा०—पण कळून उपयोग काय झाला? सपोस काठी मारली असतां तो भय तर पावत नाहींच, पण अधिक चवताळून अंगावर उडी घालूं पाहतो, त्याप्रमाणें मोंगलांची स्थिति झाली. त्यानीं रागानें एक भयंकर आरोळी ठोकली; आणि मणगटें चावीत ‘ दिन् दिन् ’ करीत ते मोंगल वेशीकडे येऊं लागले. इतक्यांत आमच्या बाजूसही जिवाजीपंत आणि दुसरी पुष्कळ मंडळी येऊन पोंचली. मग आह्मीं शत्रूंवर गोळ्यांचा, तिरांचा व गोफणींच्या दगडांचा वर्षाव के-

ला. त्या काळीं धर्माजी स्वतः बरकंदाजी करीत होता. त्याची निशाण मारण्याची खुबी इतकी उत्कृष्ट आहे कीं, त्याची गोळी ह्मणून फुकट जावयाचीच नाहीं! त्याला नुसते सात गडी बंदुका भरून देण्याकरितां उभे होते. आमचे जिवाजीपंतही बार काढीत होते. त्यांची कर्तबगारी तुह्मांस माहीतच आहे.

गो०—हो हो! ते ज्या दिशेला बंदूक धरतील, त्या दिशेस त्यांची गोळी हटकून जावयाचीच!

शा०—त्यांची त्या वेळीं कोण धांदल! धर्माजीरावांच्या बंदुकांतून सुटलेल्या गोळ्यांनीं मोंगल पटापट मरूं लागले. तेव्हां वेशीपासून दोनशें हातांवर कोणी फिरकेनासें झालें. हें पाहून आमच्या यजमानास असें वाटलें कीं, हा आपलाच प्रताप होय. ते वारंवार हंसून मोठ्यानें ओरडत कीं, "या, या! मुसंड्यानों, घ्या अल्लाचें नांव; आणि मरा! तुह्मांपैकीं बातमी सांगण्याकरितां एकासही जिवंतपणें परत जाऊं देत नाहीं! मग तो पन्हाळगडावरील किल्लेदार गणपतराव—

गो०—काय? तोही शत्रूस फितूर झाला आहे! काय हो नीचपण हें! कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ह्मणतात तो हाच!

शा०—तो तर करवीरच्या मोंगल सरदारचा गळ्यांतील ताईत बनून गेला आहे. कालच्या सर्व अनर्थास मूळ तोच. मोंगल धास्त खाऊन निराश झाले तेव्हां तो पुढें झाला, आणि मोंगलांस ओरडून ह्मणाला, "दोस्तहो, तुह्मी अलमगीर बादशहाचे शूर शिपाई आहां. तुह्मी असे भागुबाईसारखे या गांवढळ लोकांसमोर पळून जाऊं लागलां तर जग तुम्हाला काय म्हणेल? उद्यां

बायकापोरेंही तुमच्या पगड्या हिसकावून घेतील! यापेक्षां मरण आल्यास बेहत्तर! चला, कुऱ्हाडीनें दरवाजा फोडून आपण आंत शिरूं व लुटालुट करून या गांवास आग लावूं; आणि आंत सांपडतील त्या लोकांची कत्तल करूं." असें बोलून तो स्वतः हातांत कुऱ्हाड घेऊन पुढें सरला. त्या वेळीं प्रलयकालीं खवळलेल्या समुद्राच्या लाटेप्रमाणें सर्व शत्रु 'दिन् दिन्' ओरडून पुढें निघाले. आह्मी त्यांस करवेल तितका प्रतिबंध केला; तरी ते आह्मांस आंवरेनात. शेवटीं ते वेशीवर येऊन थडकले. दरवाजावर कुऱ्हाडीचे घाव धाड धाड पडूं लागले. जिकडे तिकडे हाहाकार उडाला! सर्वजण भयामुळें स्तब्ध उभे राहिले.

गो०—(भय पावून उत्सुकतेनें) मग काय झालें?

शा०—इतक्यांत धर्माजीनें एक अत्यद्भुत कर्म केलें, तेणेंकरून कालचा प्रसंग बचावला. शत्रु आतां दरवाजा खचित फोडतात असें पाहून त्यानें हातांतील बंदूक खालीं ठेवली. नंतर त्यानें तरवार मेणांतून काढून दरवाज्यांत उडी टाकिली. दरवाज्याचे सांखळदंड सोडवून त्यानें अकस्मात् दरवाजा मोकळा केला; आणि मशालीच्या उजेडांत तरवार पडताळून तो मोंगलांस आवेशानें ह्मणाला, "या, या पुढें. दुष्ट हो, एक या, दहा या, पन्नास जण या!! तुह्मां सर्वांचा काळ मी येथें तुमच्या छातीवर पाय देऊन उभा आहें." त्या वेळीं धर्माजीरावाचें जें उग्र स्वरूप दिसत होतें, त्याचें वर्णन कोण करील? कौरवांच्या सभेंत तेजःपुंज सुदर्शन हातांत घेऊन द्रौपदीच्या संरक्षणार्थ उभा राहिलेल्या श्रीकृष्णास पाहून जशी दु-

ले, "रे अधमा, रे कृष्णसर्पा, ज्यानें तुला दूध पाजून वाढविलें त्यावरच तूं उठलास! रे राक्षसा, आजपर्यंत मजवर खोटा लोभ दाखवून शेवटीं तूं माझ्या पोरांच्या मुंड्या मुरगळण्यास चुकला नाहींस! उभा रहा. चोरा, हरामखोरा आतां तूं कोठें पळशील? थांब. तुला या वेशीसमोरील वडाच्या झाडास टांगून फांशीं देतों!" इतकें बोलून जिवाजीपंतानें जाऊन गणपतरावाचा हात धरिला. तेव्हां तो किल्लेदार सर्पाप्रमाणें त्वेषानें मागें फिरला; आणि जवळ उभ्या असलेल्या एका शिपायाची बंदुक घेऊन त्यानें जिवाजीपंताच्या पायावर बंदूकीच्या दस्त्याचा असा एक तडाका दिला कीं, तेणेंकरून तो म्हातारा "अरे गण्या, माझा पाय मोडला किरे?" असें म्हणत जमिनीवर कोसळला! शत्रूंनीं त्याचे तुकडे तुकडे उडविले असते, परंतु आम्हीं धर्माजीसह त्यास सोडविण्याकरितां धांवलों. इतक्यांत पश्चिमेकडे धुळीचे लोटावर लोट उठूं लागले. चांदण्यांत भाले चमकूं लागले, हजारों घोड्यांच्या खाड खाड खाड टांपा ऐकूं येऊं लागल्या; व एकदांच 'हरहर महादेव' अशी भयंकर गर्जना झाली! ती ऐकून मोंगल एकसारखे पळत सुटले.

गो०—ही नवीन आलेली स्वारांची फौज कोणाची?

शा०—ती मोरोपंत पेशव्यांची फौज. मोंगलांचा दंगा मोडण्याकरितां महाराजांनीं त्यांस इकडे पाठविलें अशी बातमी पसरली आहे.

गो०—होय, तसेंच असेल खरें. (पुढें पाहून) हें पहा आपले यजमान जिवाजीपंत पुष्कळ मंडळीसह—वर्तमान लंगडत लंगडत घराकडे चालले आहेत. चला

योंधनादिकांची गाळण उडाली, तशी मोंगलांची स्थिति झाली. सर्व शत्रु, भयानें व आश्चर्यानें स्तब्ध होऊन क्षणभर जागच्या जागींच उभे राहिले. सर्वांपुढें किल्लेदार होता तो भीतीनें अगदीं गांगरून पाठ फिरवून माघारा चालला. त्याबरोबर सर्व मोंगल मागें फिरले.

गो०—वाहवा ! शाबास ! शाबास !! धर्माजीराव, तुझा पराक्रम लोकोत्तर होय ! आमच्या बायकांची अब्रू आज तूं बचावलीस ! आह्मांस व आमच्या पोरांबाळांस तूं दुसरा जन्म दिलास ! आज हजारों माणसें तुला दुवा देत रहातील ! तुझें देव सर्वदा कल्याण करो !

शा०—सर्व प्रकारें ईश्वराची आपल्यावर कृपादृष्टि आहे इतकीच गोष्ट खरी. कारण कीं, आज त्याच्या दयेनें जिवाजीपंतांचा प्राण बचावला. नाहीं तर ते मृत्यूच्या दाढेंत खचित पडले असते !

गो०—तें कसें काय? मला तरी वाटलेंच होतें कीं, हा तापट ह्मातारा कोठें तरी या दंग्यांत कांहीं अविचार करून प्राणास मुकेल.

शा०—दरवाजा उघडल्याबरोबर सर्व मोंगल आमच्या दृष्टीस पडले. त्या सर्वांचा पुढारी गणपतराव होता हें तुह्मांला मीं सांगितलेंच आहे. त्यास पाहिल्याबरोबर जिवाजीपंत खवळले. त्यांचा राग कसा अनावर आहे हें तुह्मांला माहीतच आहे. ते बुजावलेल्या बैलाप्रमाणें बिथरून एकटेच मोंगलांवर चालले. धर्माजी नको नको ह्मणून त्यांस ओढीत असतां ते वेगानें वेशीबाहेर पडले. मग गणपतराव परत जात होता त्यास गांठून ते क्रोधानें दांत ओंठ खात ह्मणा-

त्यांच्या पायास कितपत दुखापत झाली आहे हें पाहिलें पाहिजे.

( जातात. )

---

## प्रवेश चवथा.

( जिवाजीपंत व दुसरे कांहीं लोक प्रवेश करितात. )

**जि०**—शाबास वडगांवकरांची. त्यांनीं आज मोंगलांची खोडच मोडून टाकिली. मोठे आले लेंक ' पीरखा ' ' शीरखा ' ' हुसेनखां ' ' दगडखां ' ' मातीखां! ' पण त्यांना जिवाजीपंताशीं गांठ आहे हें कोठें माहीत होतें?

**एकजण**—आपणांस फार मेहनत पडली. आपण आज मोठा पराक्रम केला.

**जि०**—अं! तसें कांहीं नाहीं. मीं सरासरी शेंपन्नास मोंगल जमिनीवर पाडले, आणि शेवटीं तर त्यांस केवळ आपल्या गर्जनेनेंच पळावयास लावलें ही गोष्ट खरी आहे. पण यांत कांहीं मीं मोठा पराक्रम केला असें होत नाहीं. पण (पायाकडे बोट दाखवून) कळा फार लागल्या आहेत बुवा!

**दुसरा**—आज धर्माजीसारखा शूर पुरुष येथें होता ह्मणूनच वेळ निभावली!

**तिसरा**—रात्रीं त्यानें जो पराक्रम केला तो ऐकून मोठमोठाले शूर पुरुष सुद्धां तोंडांत बोटें घालतील!

**चवथा**—याकरितां आपण त्याचा चांगला सन्मान केला पाहिजे.

**जि०**—कायरे बडबडतां तुह्मी? धर्म्यानें काल फार चांगली लढाई केली हें मी नाहीं ह्मणतों काय? तो तसें

करणारच! त्यानें पराक्रम केलेच पाहिजेत! कारण तो कोणाचा चाकर आहे? माझा! पण त्याबद्दल सन्मान मला देणें योग्य आहे. माझा पराक्रम पाहून माझ्या चाकरांसही आवेश चढतो; आणि ते अद्भुत कृत्यें करतात ह्यांत काय आश्चर्य? खरें कीं नाहीं? धर्म्या तूंच सांग या लोकांना.

शि०–( हात जोडून ) धनीसाबांच्या पुण्यपरतापानें समद हुयाचं, अन् म्यां गरीबानं काय करायाचं हाय.

जि०–खरें बोललास धर्माजी. बरें, रात्रीं ज्यांना जखमा लागल्या आहेत त्यांना मीं आपल्या घरीं पाठविलें आहे; तेथें जाऊन त्यांच्या जखमा बांधण्याची तजवीज काय झाली आहे ती बघ.

शि०–जी. ( निघून जातो. )

जि०–अरे, हा पुनः गलबला कसला उठला रे? जाहो शामराव, काय प्रकार आहे तो पहा.

शा०–( जाऊन व प्रवेश करून ) जिवाजीपंत मोंगलांचा पाठलाग तीन कोसपर्यंत करून आतां पेशव्यांचे स्वार परतले आहेत. खुद्द मोरोपंत पेशवेही आपल्या भेटीकरितां निघाले आहेत.

जि०–बरें आहे. येऊं दे त्यांना इकडे. त्यांच्या अधिकारास व योग्यतेस साजेल असें आगतस्वागत करण्याचें सामर्थ्य देवानें मला जरी दिलें नाहीं, तरी त्याजबद्दल त्यास कांहीं वाटावयाचें नाहीं. कारण कीं, आह्मी व ते लहाणपणाचे खेळगडी आहों.

( मोरोपंत पेशवे हे कांहीं सरदार व मानकरी लोकांसह प्रवेश करितात. )

हुत वर्षांनीं पडली आहे; याकरितां तुह्मांस या वडगां-
वांत चार दिवस राहून घेतल्याशिवाय मी सोडणार
नाहीं.

मो०—छे:, जिवाजीपंत, सध्यां येथें रहाण्यास मला मुळींच सवड नाहीं. मोंगल जेथपर्यंत करविरांत आहेत, तेथपर्यंत माझ्या जिवाला स्वस्थता नाहीं. त्यांस तेथून त्वरित हांकून लावण्याची महाराजांकडून मला सक्त ताकीद झाली आहे. शिवाय तो पन्हाळ्यावरील किल्लेदारही विथरला आहे. त्याचा समाचार मला घेतला पाहिजे. मी याच पायीं करविरास जाणार होतों. परंतु या कामांत मला एका मनुष्याची मसलत घेणें जरूर आहे. त्याचकरितां मी मुद्दाम वडगांवांत परत आलों.

जि०—( उत्साहानें ) समजलों आपलें काय ह्मणणें आहे तें. मी इकडला रहाणारा असल्यामुळें मला करविराबद्दल माहिती चांगली आहे. शिपाईगिरीचा धंदाही मला थोडाबहुत समज्तो. याकरितां माझी मसलत घेण्याकरितां तुह्मी येथें आलां आहां. ठीक आहे. शिवछत्रपतींच्या सेवेस हा देह अर्पण केलाच आहे. त्यांच्या शत्रूंचें निर्दलन करण्यांत या देहाचा कांहीं उपयोग व्हावा हीच माझी इच्छा. माझ्या हाताखालीं तुमच्या फौजेंतील दोन तीन पथकें द्या, आणि मी काय चमत्कार करून दाखवितों तो स्वस्थ बसून पहा. नुसती माझी मसलत तुमच्या काय उपयोगीं पडणार ? मी गेलों तर पहा शत्रूंची कशी दाणादाण उडवून देईन! काल त्यांनीं माझा पराक्रम पाहिलाच आहे. आतां मी कोल्हापुरास गेलों ह्मणजे

मो०—नमस्कार! जिवाजीपंत. क्षेम आहेना?

जि०—नमस्कार! ( मोरोपंतास आलिंगन देऊन) तुमच्या दयेनें पूर्ण क्षेम आहे. कारण आज तुह्मी जर न येतां तर माझी गच्छंतीच होण्याची वेळ आली होती! पण भेटीचा योगायोग पहा कसा तो, कीं तुमची आमची गांठ त्याच वेळीं पडून माझ्या जिवाचें रक्षण तुह्मीं करावें!

मो०—होय. मी वेळेवर येऊन पोंचलों ह्मणून बरें, नाहीं तर मोठा अनर्थ होत होता. अहो, तुमच्यासारखे लोक ह्मणजे महाराजांच्या राज्याचे आधारस्तंभ. मग त्यांचाच जर नाश झाला तर यापेक्षां दुर्दैवाची गोष्ट कोणची? आज तुह्मीं वडगांवचें ठाणें राखण्याबद्दल फार प्रयत्न केले त्याबद्दल सरकारांतून तुमचा मोठा सन्मान होईल.

जि०—मला दुसरा कांहीं सन्मान नको. महाराजांनीं माझी आपल्या विश्वासू सेवकांत गणना केली ह्मणजे मला सर्व पावलें.

मो०—शिवाय कालच्या लढाईंत पुष्कळ लोक जखमी झाले आहेत ह्मणून ऐकिलें त्यांस व ज्यांनीं काल मर्दुमकी केली असेल त्यांस सरकारांतून पोषाख व इनामें देण्यांत येतील. काल जे कोणी कामास आले असतील त्यांच्या मुलांमाणसांच्या संरक्षणाची सोय आमचे दयावंत प्रभु अवश्य करतील यांत संशय नाहीं.

जि०—तें सर्व यथायोग्य होईल. बरें, आतां रस्त्यांत उभे राहून किती वेळ बोलणार? चला आमच्या घराकडे. मोरोपंत तुह्मांला एकच सांगतों कीं, तुमचा आमचा ऋणानुबंध बहुत दिवसांचा; आज गांठहीं ब-

पुरे. माझें नांव ऐकिल्याबरोबर मोंगलांच्या उरांत धडकी बसून ते पोबारा करतील !

मो०–( किंचित् हंसून ) तुह्मांला करविरास धाडल्यावर शत्रु पराजित होऊन पळून जातील यांत संशय नाहीं. परंतु तुह्मांसारख्या सद्गृहस्थास तसदी देण्याचें माझ्या मनांत मुळींच नाहीं. मला मसलत घ्यावयाची ती दुसऱ्याच माणसाची आहे.

जि०-( निराशेनें ) हां, असें काय ?

मो०–आपले घरीं धर्म्या ह्मणून एक गडी आहे नाहीं बरें ?

जि०–होय, आहे. मग त्याचें काय ?

मो०–मी त्याची मसलत घेण्यासाठीं मुद्दाम आज वडगांवास आलों आहें.

जि०–छे, काय ह्मणतां ? तुह्मांला धर्म्याची गांठ घ्यावयाची आहे ? छे:, तुह्मी माझी थट्टा करतां. माझीच मसलत घेण्यासाठीं तुह्मी येथें आलां हीच गोष्ट खरी.

मो०–नाहीं. मला धर्म्याचीच गांठ घ्यावयाची आहे.

जि०–तें मला खरें वाटत नाहीं. कारण कीं तुमची पदवी मोठी, तुमचा पराक्रम व अधिकारही विशेष. तुह्मी केवळ शिवछत्रपतींचें दुसरें हृदय आहां. तेव्हां तुह्मी माझ्या गरीब गड्यावर स्वदर्शनाचा अनुग्रह कशास कराल ? धर्म्याचें शौर्य मोठें आहे खरें; परंतु तसले पुरुष तुमच्या फौजेंतही शेंकडों हजारों असतील. तेव्हां तुह्मांस लढाईच्या कामांत मसलत देण्यासारखें माझ्या धर्म्यांत काय ज्ञान आहे ?

मो०—जिवाजीपंत, तुह्मांला माणसाची पारख अगदीं नाहीं असें ह्मटलें पाहिजे. तुमच्या चाकराचें ज्ञान कित्येक गोष्टींत आह्मांपेक्षांही अधिक आहे. मी त्यास फार दिवसांपासून ओळखतों. ह्याकरितां आतां उशीर लावूं नका. माझी व त्याची एकांतीं गांठ पडेल अशी तजवीज अगोदर करा. मला त्याजवळ पुष्कळ महत्वाच्या गोष्टी बोलावयाच्या आहेत.

जि०—बरें बाबा आमचें काय जातें? (आपल्याशीं पुटपुटत) पण हें काय गौडबंगाल आहे हें मला कळत नाहीं. मोरोपंत पिंगळे शिवाजी महाराजांचे मुख्य प्रधान, आणि ते मजजवळ कांहींच भाषण करीत नाहींत. माझ्या गरीब गड्यापाशीं राज्यकारस्थानाच्या मसलती करूं इच्छितात! सर्वत्र चमत्कारिक! (मोठ्यानें) चला आमच्या घराकडे. तेथें तुमची व धर्माजीरावाची गांठ घालून देतों.

(सर्व जातात.)

## तिसरा अंक समाप्त.

# अंक चवथा.

## स्थळः-संभाजीचें पन्हाळगडावरील रहाण्याचें ठिकाण.

( संभाजी एकटाच इकडून तिकडे हिंडतांना दृष्टीस पडतो. )

सं०-(आपल्याशीं ) स्त्रियांनीं एकदां दुराग्रह धरिला ह्मणजे तो मोडून काढण्यास प्रत्यक्ष ब्रह्मदेवही समर्थ होणार नाहीं! या हट्टी विजवल्या मरून जातील, पण शेवटीं आपलेंसें करतील. असें असून स्त्रियांचें चित्त चंचल आहे असें ह्मणणारे लोक मूर्ख नव्हेत काय? अरे, तसें असतें तर एव्हांना मी आनंदसमुद्रांत पोहूं लागलों असतों! ही देशपांड्यांची बायको राधा येथें येऊन अडीच महिने झाले. इतक्या काळांत तिला वश करण्याकरितां मी नानाप्रकारचे यत्न करून थकलों; पण तिचा एक निश्चय आहे तो आहेच! तिची भेट घेऊं नका ह्मणून गणपतराव मला सांगतो. पण माझ्यानें आतां दम निघत नाहीं. माझ्या हृदयांत मदनाग्नि जो एकदां प्रज्वलित झाला आहे तो दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन माझ्या अंगाची होळी करीत आहे! मना, तूं तिच्यावर एकदम आसक्त झालेंस ही फार अविचाराची गोष्ट केलीस. किती झालें तरी ती परस्त्री, त्यांतून आपणास पूज्य अशा ब्राह्मणकुलांत तिचें जन्म; तेव्हां तिजवर आसक्ति ठेवून आपणास काय कर्तव्य आहे? असा जर तूं विचार करतेस तर ही गोष्ट आज या थरास कां येती? रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबरोबर जर मीं औषध घेतलें असतें, तर हा शरीरांतील रक्त शोषण करणारा,

इंद्रियें विकल करणारा, व विचारबंधनाप्रत छिन्न करणारा प्रीतिरोग माझ्या हृदयांत कां बळावता? बरें, माझ्या इच्छा कधीं पूर्ण होण्याचा संभव आहे काय? नाहीं——नाहीं–नाहीं. ही राधा हें एक चमत्कारिक पुष्प आहे. तें अतिशय सुंदर असल्यामुळें दूर टाकून देतां येत नाहीं. तें इतकें नाजुक आहे कीं, त्यास चुरडून टाकण्याची कोणाची छाती होणार नाहीं! हे विधात्या, अरे या स्त्रीचें शरीर जसें तूं सुंदर निर्माण केलें आहेस, त्याप्रमाणें जर तूं हिला सारासार विचार दिला असतास, तर काय बहार झाली असती! तसें असतें ह्मणजे, माझें स्वरूप, गुण, कुल व माझें तिजवरील अप्रतिम प्रेम, यांचें महत्व तिच्या लक्ष्यांत आलें असतें. मी कधीं तरी मराठी राज्याचा मालक होणारच. ही राधा जर मला अनुकूल होती तर हिला तिच्या सौंदार्यास अनुरूप असें पट्टराणीचें पद मीं दिलें असतें! (रागानें) पण लक्ष्मी घरीं चालत येत असून तिचा अव्हेर करणारी ही दांडगी कोण? किती झालें तरी मी राजपुत्र आहें! माझा मानभंग व आज्ञाभंग आजपर्यंत कोणींही केला नाहीं! तो तिला मी कसा करूं देईन! मी तिचा राजा या नात्यानें तिला पाहिजे तसें वागविण्याचा माझा हक्कच आहे! आणि माझा हक्क आज मी गाजवीनच गाजवीन! आज तिजकडे मी जातों आणि पहातों ती मला कशी वळत नाहीं ती! आज तिच्या पोंवळ्यासारख्या लाल व रसरशीत ओंठाचें चुंबन घेतल्याशिवाय जर मी परत येईन तर मला धिक्कार असो!

[ जातो.

---

## प्रवेश दुसरा.

[ शोकानें व्याकुल झालेली अशी राधाबाई दृष्टीस पडते. ]

रा०( आपल्याशीं ) काय बाई असेल तें असो! माझ्या मनाला आज एकसारखी हुरहूर लागली आहे! सकाळपासून उजवा डोळा लवत आहे. यावरून मजवर कांहीं संकट येणार आहे असें वाटतें. पण मजवर येणारें असें संकट आतां कोणचें राहिलें आहे? एक आकाशांतून वीज कडाडून माझ्या डोकीवर पडावी, किंवा धरणीनें दुभंग होऊन मला गिळण्यासाठीं आ पसरावा हें मला अजून घडून आलें नाहीं! तसें होणार असेल तर तें कांहीं वाईट नाहीं! या हालांतून माझी एकदांची सुटका तरी होईल! कांहींही होवो, माझें पातिव्रत्य जेथपर्यंत माझी पाठ राखणारें आहे, तेथपर्यंत मला भीति कोणाची? देवा! देवा! तिकडे काय हाल चालले असतील व किती अपमान होत असेल? आई जगदंबे, तूं सर्वसाक्षीच आहेस याकरितां तुला किती विनवूं? तुजवांचून अनाथाचा कैवार कोण घेईल? या प्रसंगीं आमचें रक्षण करणारी तूंच आहेस. या प्रसंगीं तुझ्या कृपेनें जर आह्मी या संकटांतून पार पडलों, तर तुझ्या नांवानें एकशें आठ सुवासिनींची खणांनारळांनीं ओंटी भरीन!

( संभाजी आंत येतो व त्यास पाहून राधाबाई उभी रहाते. )

सं०–( पुष्कळ वेळ तिजकडे प्रीतीनें निरखून पाहून ) हे सुंदरी, तूं अशी निराश्रितासारखी दीन व उदासीन कां दिसतेस? ईश्वरानें तुला हें सुंदर शरीर दिलें आहे त्याची अनास्था कां करितेस? तूं वस्त्रालंकारांविषयीं निरिच्छ कशी झालीस!

रा०–स्त्रियांचा मुख्य अलंकार त्यांचा पति. तो

खुशाल असल्यावर इतर दागिने शोभतात. तो प्राणसंकटांत पडला असल्यावर मला अलंकार काय करावयाचे. ( जाऊं लागते. )

सं०-( तिला आडवून ) ज्याच्या पायाशीं प्रणाम करीत असतां सहस्रावधि बलिष्ट लोक आपणांस धन्य मानून घेतात, त्या शिवाजी राजाचा पुत्र मी संभाजी. माझा धिक्कार करून तूं निघून जावेंस हें तुला योग्य काय? पहा. माझा पिता प्रजेचें पोटच्या लेंकराप्रमाणें पालन करितो, त्याचा मी पुत्र त्या अर्थी तूं माझा आदर केला पाहिजेस.

रा०-शिवाजी महाराज प्रजाजनास पोटच्या लेंकराप्रमाणें मानतात असें आपण ह्मणतां हें कांहीं खोटें नाहीं. आपण त्यांचे चिरंजीव, त्या अर्थी आपलें व माझें बहीणभावंडाचें नातें आहे, हें ध्यानांत आणून जर माझी आपण मर्यादा राखाल तर मजकडून आपला अनादर कसा होईल !

सं०-( आपल्याशीं ) ही मोठी वस्ताद बायको आहे. हिजबरोबर मी बोलूं लागलों तर ही मला निरुत्तर करील. याकरितां आतां मुख्य मुद्यावर आलें पाहिजे. ( मोठ्यानें ) तुझ्या नवऱ्यास मीं कां प्रतिबंधांत ठेविलें आहे हें तुला ठाऊक आहे?

रा०-खरें कारण काय आहे तें मला माहीत नाहीं. लोक सांगतात कीं, ते मोंगलांकडे फितूर आहेत अशा संशयावर आपण त्यांस प्रतिबंधांत ठेविलें आहे. हें जर खरें असेल तर आपणांस मी हात जोडून विनंति करितें कीं, तो आरोप अगदीं खोटा आहे. कृपा करून आपण त्यांस सोडून द्यावें. आपले उपकार आह्मी जन्मभर स्मरूं !

सं०—कृष्णरावाची मुक्तता करण्याचें काम तुझ्या इच्छेचें आहे.

रा०—माझ्या इच्छेचें आहे तें कसें ?

सं०—तूं मजजवळ रहाण्याचें जर कबूल करशील तर तुझ्या नवऱ्यास मी आतांच सोडून देतों !

रा०—( क्रोधानें लाल होऊन ) हे शब्द शिवाजी राजाचा पुत्र बोलत आहे काय? आंब्याचे झाडास कधीं कधीं कंवडळेंही लागतात हें मला आजच कळलें !

सं०—प्रियकरिणी, आतां उपहास करून काय उपयोग ? तुला पाहिल्या दिवसापासून अंगांत भूत संचरल्याप्रमाणें तुजविषयीं माझ्या मनांत जो अवर्णनीय अभिलाष उत्पन्न झाला आहे, तो कधींही शांत व्हावयाचा नाहीं. याकरितां लावण्यलतिके, मी तुजवर अत्यंत लुब्ध होत्साता तुझा दासानुदास होऊन तुझ्या चरणीं लागलों आहे ! ( पायां पडतो. ) माझे प्राण घेणें किंवा मला जिवंत ठेवणें हें तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे. जर तूं माझा आव्हेर करशील तर दुःखानें झुरून झुरून मरून जाण्याचें माझ्या नशिबींच आलें आहे ! पण जर तूं मला अनुकूल होशील, तर मजसारखा धन्य प्राणी या त्रिभुवनांत कोण आहे ?

रा०—( कानावर हात ठेवून ) हरहर काय भाषण हें ! संभाजी महाराज, कांहीं विवेक धरा. विचार करा. आपले मनास असें पाहिजे तिकडे बहकूं देऊं नका ! आपल्या कुलशीलाकडे लक्ष्य द्या ! आपल्या वडिलांची नीति कशी आहे, ते आपल्या ज्ञानाचा आणि अधिकाराचा कसा व्यय करितात हें ध्या-

नांत आणा. ज्याच्या ठायीं धर्म व नीति हीं निरंतर वास करितात, त्या राजर्षीचे आपण चिरंजीव; आपणांस परस्त्रीवर अशी पापवासना ठेवणें हें कधींही योग्य होणार नाहीं! येसूबाईसाहेबांच्या सौंदर्याविषयीं व सद्गुणांविषयीं मीं कीर्ति ऐकिली आहे. त्यांजवर जर आपण असेंच प्रेम कराल तर आपणांस इहलोकीं चांगलें व परलोकींही चांगलें. आपण वडिलांमागें सिंहासनावर आरूढ होणार. आपणच जर असें अन्यायाचें आचरण करूं लागलां, तर आपली आज्ञा कोण मानील? आणि नीतीनें प्रजापालन करणें तरी आपल्याकडून कसें घडेल?

सं०—राधाबाई, तुला मघांशीं एकदां सांगितलें ना, कीं आतां विवेक करण्याच्या गोष्टी सांगणें व्यर्थ आहे ह्मणून? मग माझी व्यर्थ निंदा करून फल कोणतें? माझ्या ह्मणण्याप्रमाणें जर तूं चालशील तर त्यांत तुझें अत्यंत हित आहे. तुला पट्टराणी करण्याचें माझ्या अंगांत सामर्थ्य आहे.

रा०—देवानें मला ज्या स्थितींत निर्माण केलें आहे त्या स्थितींत मी सदाचरणानें राहिलें ह्मणजे इहलोकचें सर्व सुख मला मिळालें.

सं०—छे छे! पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळालें ह्मणजे आपणांस इहलोकचें सर्व सुख मिळालें असें होत नाहीं! वेडे, शेले, शालु, शालजोड्या हीं ज्यांचीं वस्त्रें; हिरे, मोतीं, पाच, माणिकें यांणीं सुशोभित ज्यांचे अलंकार; मिष्टान्नभोजन करणें, व सुखशय्येवर आपल्या प्रियाशीं विलास करणें, हें ज्यांचे नित्य व्यवसाय; त्या राजस्त्रियांच्या स्थितींत व तुझ्या स्थितींत

कांहींच भेद नाहीं ह्मणतेस? सेवेकरितां हात जोडून भोंवत्या उभ्या असाणाऱ्या शेंकडों दासी; सहस्रावधि लोकांचें बरें वाईट करण्याचा हातांत अधिकार; मजसारख्या बलिष्ट राजाचें जिवाहूनही अधिक प्रेम; या गोष्टी जर तुला अनुकूल नसतील, तर तूं इहलोकच्या सुखांचा व विलासांचा काय उपयोग घेशील? विधात्यानें आपलें कौशल्य खर्च करून जें तुझें रूप निर्माण केलें आहे. त्याची कृतार्थता झाली पाहिजे. ज्या ठिकाणीं मनुष्यानें कधींही पाऊल ठेविलें नाहीं, ज्या ठिकाणीं व्याघ्रसिंहादिक हिंस्र पशु मात्र हिंडावयाचे, अशा रानांत जर एकादें गुलाबाचें फूल निर्माण झालें व कालेंकरून कोमेजून गेलें, तर त्याचा उपयोग काय? त्याचें सौंदर्य व नाजुकपणा शात्त आपली दृष्टि कोण निववील? त्याचा अनुपमेय सुगंध घेऊन कोणाचें मन प्रसन्न होईल? त्याला स्वशिरीं धारण करून आपणांस कोण धन्य मानून घेईल?

रा०—आपण माझा स्वभाव अगदीं ओळखला नाहीं. इहलोकचें खरें सुख संपत्तीमध्येंच मिळतें अशी माझी समजूत नाहीं. मग पापमार्गानें मिळविलेल्या वैभवांत आपण मला सुखाची अशा कां दाखवितां? मला स्वतःला सुखाची कांहींच पर्वा नाहीं. देवानें ज्या पुरुषाशीं माझी जन्माची गांठ घातली आहे, त्याला जें सुख तेंच मला सुख. त्याजबरोबर रानांत अनवाणी उपाशी हिंडण्यांत जें मला सुख आहे, तें त्याशिवाय मोठ्या राजवाड्यांतही होणें नाहीं! नवऱ्याच्या सेवेंत तत्परतेनें राहून आयुष्य घालवावें हा स्त्रीचा धर्म. तिला अन्य वस्तूचा विचार कशास पाहिजे? याकरितां

महाराज, माझी पदर पसरून आपणांस विनंति इतकीच आहे कीं, माझा नाद आपण सोडा. मला व्यर्थ पीडा देऊं नका. मजवरच आपण आग कां पाखडतां, जगामध्यें आपल्या ऐश्वर्यास भुलणाऱ्या शेंकडों स्त्रिया सांपडतील.

सं०–( आवेशानें ) मी तुझा नाद सोडून देणार ! हें तर मी जिवंत आहें तेथपर्यंत घडणेंच,नाहीं ! तूं जिवंत आहेस तेथपर्यंत तूं पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही गेलीस तरी मी तुला तेथून हुडकून काढीन ! मी हरएक उपाय करून आपले मनोरथ पूर्ण करीनच करीन ! दुर्दैवानें माझ्या आधींच जर तुला मरण आलें तर 'राधा !' 'राधा !' 'राधा !' असा या मनोहर नामाचा जप करीत मीही प्राण सोडीन !

रा०–संभाजी महाराज, सावध व्हा, सावध व्हा; अजून तरी मी काय ह्मणतें तें ऐका ! असे उन्मत्त होऊं नका !. इहलोकीं पुरुषास परस्त्रीसारखें विष नाहीं. स्त्रियेस परपुरुषाच्या संसर्गासारखा नरक नाहीं. तुह्मी प्रभु आहां. तुह्मांस सर्व अनुकूल आहे. तुह्मीं एक सोडून दहा लग्नें करून घेतलीं तर त्यांत तुह्मांस कोणी दोष देईल असें नाहीं. परंतु दुसऱ्याच्या स्त्रियांवर, सुनांवर व मुलींवर पापदृष्टि ठेवून नरकाचें साधन करून घेऊं नका ! पुरुष कितीही गुणी, ज्ञानी व मान्य असला तरी परस्त्रीच्या अभिलाषानें त्याच्या सर्व गुणांवर पाणी पडून लोकामध्यें त्याची छीथू होते ! आणि प्रायः याच दुर्व्यसनांत त्याचा प्राण जाऊन निंद्य परिणाम होतो !

सं०–पुरे ! पुरे ! तूं मला व्यर्थ भीति घातलीस ह्म-

अशी जर ईश्वराची इच्छा असेल तर त्यास उपाय काय? परंतु आपणांस मी एकच सांगतें कीं, एक सोडून शंभर मृत्यु जरी माझ्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत येऊन उभे राहिले, तरी माझें वर्तन पातिव्रत्यापासून तिळमात्रही ढळणार नाहीं! याकरितां खुशाल पुढें या, आणि माझ्या जिवाचा वळी घेऊन मला मोकळी करा! त्यांत मला आनंदच आहे! कारण, दुसऱ्याची मजकरितां विटंबना होणार, त्यापेक्षां मी मेलें तर पातिव्रत्यासाठीं प्राण देण्यासही मागें सरलें नाहीं अशी माझी कीर्ति तरी होईल! मज अबलेवर हत्यार टाकल्यानें आपल्या शिपाईगिरीचीही जगांत प्रशंसाच होईल!

सं–( जळफळत आपल्याशीं ) काय करावें ! मी जें जें करितों तें तें माझ्या गळ्यांत येत आहे! बरें, आणखी एक उपाय करून पाहूं. ( मोठ्यानें ) नाहीं नाहीं. तूं आजपर्यंत जी मला अनान्वित पीडा दिली आहेस, आणि आज मला ज्या दुरुक्ति बोलली आहेस त्याचा सूड मी निराळ्याच रीतीनें घेईन! नवऱ्याच्या नांवावर तूं फार उड्या मारीत आहेस, तर त्याचेच हाल करून त्याला मी ठार मारीन ह्मणजे तूंही दुःखानें तडफडून मरशील!

रा०–( अतिशय घाबरून ) का काय?

सं०–काय तें तूं आतां घटकेंतच पहाशील. तुझ्या डोळ्यांसमोर पलीकडे तो कडा दिसत आहे, त्यावरून कृष्णराव देशपांड्याचे हात पाय बांधून त्यास ढकलून देईन. तीं पहा त्या दरीच्या तळाशीं गिधाडें तीं तेथें कशाकरितां फिरत असतात हें तुला माहीतच आहे!

रा०–( दीनस्वरानें ) छे छे! असले भयंकर शब्द

णजे मी एकाद्या लहान मुलाप्रमाणें भिऊन जाईन असा अर्थ नाहीं! तूं ह्मणतेस तें कदाचित् खरें असेल; परंतु ती गोष्ट हलक्यासलक्या लोकांस लागू. मी राजा आहें. मला वाटेल तें मी करीन. मला पीडा करण्यास कोण समर्थ आहे?

रा०–( तिरस्कारानें ) आपली कथा काय? आपलेपेक्षां शेंकडों पटीनें बलिष्ट असणारे लोक पूर्वी परस्त्रियांच्या पायीं उलथून गेले आहेत हें आपणास ठाऊकच आहे! परस्त्रीच्या नादांत प्रत्यक्ष देवांचा राजा जो इंद्र त्याची काय दुर्दशा उडाली? ज्यास नऊ हजार हत्तींचें बळ तो कीचक द्रौपदीस भुलून अग्नीच्या ज्वाळेवर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणें कसा प्राणास मुकला? ज्यानें स्वपराक्रमानें त्रिभुवन हालवून सोडिलें, तो लंकानाथ सीतेच्या अभिलाष धरून आप्तगणगोतांसह कसा नाश पावला? या गोष्टी ध्यानांत धरा. जे जे या मार्गानें गेले, त्यांतून एकाचेंही कल्याण झालें नाहीं!

सं०--(आपल्याशीं) ही सरळ उपायांनीं वळतां दिसत नाहीं. याकरितां आतां कठोरपणा धरलाच पाहिजे. (क्रोधाचा आविर्भाव आणून मोठ्यानें) दुष्टे! मी तुझ्या हिताची गोष्ट तुला सांगत असतां तूं माझी कीचकाशीं व रावणाशीं तुलना करितेस! मी ह्मणतों तसें तूं ऐकशील तर बरेंच आहे; नाहीं तर मी आज तुला जिवंत ठेवीत नाहीं. तूं जिवंत राहून मजसारख्या शेंकडों तरुण पुरुषांचीं हृदयें पोळशील! (कमरेची कट्यार काढून) पहा, ही कट्यार तुझ्या उरांत खुपसून मी तुझा प्राण घेणार!

रा०–(शांतपणानें) मी अशा रीतीनें मरून जावें

आपण उच्चारूं देखील नयेत! असलें क्रूर कर्म करण्याचें आपल्या मनांत देखील येणार नाहीं, मग हातून कसें घडेल?

सं०–( निष्ठुरपणानें ) पण अशा मतलबी भाषणानें माझें मन वळेल असें तूं समजूं नको. मी ह्मणेन त्याप्रमाणें करणारा मनुष्य आहे!

रा०–( काकूलतीनें ) असें करण्यापासून हित कोणचें? नको नको! असले शब्द ऐकण्यापेक्षां माझा प्राण झटकर निघून गेला तें बरें? आह्मीं आपला काय अपराध केला आहे? मी आपले पुढें पदर पसरतें! पाहिजे तर आपल्या पायांशीं शंभर वेळां नाक घांसतें! माझी विनंति एवढी आपण ऐकिली पाहिजे! आपण ह्मणता त्याप्रमाणें जर मी आपल्या मनःसंतापास कारण झालें असेन, तर मला पाहिजे ती कडक शिक्षा आपण करावी. त्यांच्या जिवास काडी इतकी यातना देऊं नये. आपण समर्थ आहां. आपले ठिकाणीं दया असलीच पाहिजे.

सं०–( रोषानें ) राधे, तुजबद्दल मला आतां दया कशी येईल. मी एवढा राजपुत्र, आपला मान एकीकडे ठेवून तुझ्या विनवण्या करूं लागलों, तेव्हां तुला माझी दया आली? मग आतां मजपासून दयेची अपेक्षा कां करित्येस? तुझ्या भर्त्यावरील संकट टाळण्याचा आतां एकच मार्ग आहे. इतःपर तूं त्याचें नांव काढूं नयेस व त्याचें मुखावलोकनही करूं नयेस. आजपासून तूं मजजवळ दासीप्रमाणें रहावेंस. तुझ्या शरीराचा व मनाचा मालक मी. या गोष्टी जर तुला कबूल असतील तर कृष्णरावाचा जीव बचावेल. कसें काय? बोल.

रा०–( निराशेनें चवताळून ) राक्षसा! नीच येथून. जा, तुला काय करणें असेल तें कर! माझ्या हातून असलें कर्म कधींही घडणार नाहीं! निर्लज्जा, अधमा, मी काकुलतीस येऊन तुझ्या इतक्या विनवण्या केल्या असतां तुझें हृदय द्रवत नाहीं, तर तें पाषाणापेक्षांही कठीण ह्मटलें पाहिजे! बरें, तुला वाटेल तें कर! सन्मार्गानें चालणाऱ्या नवराबायकोची तूं या लोकीं तुटातुट केलीस तरी परलोकीं आह्मी आनंदानें एकत्र अक्षय्य सुखांत राहूं! तेथें तर तूं येत नाहींस? पण काळतोंड्या, असलें अति नीच कर्म करून तूं आमचा छळ करीत आहेस, त्याअर्थी तुझें कधींही कल्याण होणार नाहीं! तुझ्या जिवांत जीव आहे तेथपर्यंत तुला यमयातना होतील; आणि तूं हालहाल होऊन मरशील! हा माझा शाप कधींही अन्यथा होणार नाहीं, हें खचित समजून ठेव!

सं०–( तिरस्कारानें ) तुझ्या असल्या शापांस व शिव्यांस मी भीत नाहीं! गोडीगुलाबीनें तूं वळली नाहींस हें तुझें दुर्दैव. त्याला मी काय करूं? तुजवर बलात्कार करून मी आपली इच्छा पूर्ण करणार. तुझें रक्षण करण्यास कोण तुझा काका येथें उभा रहातो तो पहातों!

( राधाबाईच्या अंगाशीं जाऊं लागतो. )

रा०–(मागें सरून) मागें हो, मागें हो. निलाजऱ्या! अरे, असा पशूसारखा उन्मत्त कसा झालास! खबरदार, जवळ येशील तर संभाळून ऐस! ( संभाजी तीस धरूं लागतो व ती इकडे तिकडे पळूं पहाते.)अग बाई, आतां काय करूं! अरे देवा नारायणा, धांव धांव

लौकर, आतां अंत पाहूं नको! (संभाजी तीस धरतो.) अरे काळतोंड्या, सोड, सोड मला! नाहीं तर ह्या या भिंतीवर डोकें आपटून प्राणच मी देईन! ( मोठ्यानें ओरडून ) अरे धांवा धांवा कोणी तरी! या चांडाळाच्या हातून मला कोणी तरी सोडवा लवकर!

सं–( मदनानें व क्रोधानें धुंद होऊन दांत खात ) राधे, राधे, ओरडूं नको. प्रत्यक्ष ब्रह्मदेव आला तरी मी तुला आतां सोडणार नाहीं. गप् गप्, ओरड तर खरी ह्मणजे गळा चेंपून तुझा प्राणच घेतों. ( दोघे धडपड करितात. )

( इतक्यांत गणपतराव खोलीजवळ येतो. )

ग०–( खिडकींतून आंत पाहून आपल्याशीं ) वहावारे संभ्या! मी नसतां माझ्या घरावर दरोडा घालवयाचा तो घातलासच आं? मी वेळेवर आलों ह्मणून तुला लाग साधला नाहीं ही गोष्ट निराळी. (अकस्मात् दरवाजा उघडून प्रवेश करून ) वाहवा! संभाजी महाराज, फार चांगलें काम करीत आहां!

सं०–( राधाबाईस सोडून क्रोधानें पाय आपटीत) हा शिनळीच्या गाढवा! तुला येथें येण्यास हीच वेळ बरी सांपडली! अरे, आज दोन महिनेपर्यंत मदनाग्नीनें संतप्त झालेलीं गात्रें या निर्दय परंतु सुंदर स्त्रियेच्या गाढालिंगनानें शांत करणार होतों, इतक्यांत तूं मांगासारखा येथें येऊन उभा राहिलास याची तुला शरम नाहीं वाटत?

ग०–अहो महाराज, तुमच्या डोळ्यावरची थोडी धुंदी उतरेल तर तुमचे हे चाळे लागलेच बंद पडतील. तुह्मी आहां कोठें? प्रसंग कोणचा गुदरला आहे

याची तुह्मांला दाद तरी आहे काय ?

सं०—( चपापून ) काय ? काय ह्मणतोस ?

ग०—संभाजी महाराज, आपणांस सर्व वृत्तांत मी सांगतों. परंतु तो सांगण्यास हें स्थळ योग्य नव्हे. त्यास एकांत स्थळ पाहिजे. ( राधाबाईकडे वळून ) राधावहिनी, बसा बरें तुह्मी स्वस्थ. इतःपर संभाजी महाराजांकडून तुह्माला यत्किंचितही त्रास पोहोंचणार नाहीं. त्याजबद्दल जामीन मी. झाल्या. त्या गोष्टी झाल्या. त्यांची आठवण ठेवूं नका. ( संभाजीस ) चला महाराज, आपल्या बंगल्याकडे जाऊं.

सं०—चला.

[ जातात.

---

## प्रवेश तिसरा.

[ गणपतराव व संभाजी प्रवेश करितात. ]

सं०—गणपतराव, एकून वडगांवास तुमची दुर्दशा उडाली. पण अशा बळकट ठिकाणावर इतक्या घाईनें तुह्मीं हल्ला केला ? महाराज तेथें आहेत अशी तुह्मास बातमी लागली होती ?

ग०—( दुःखानें श्वास टाकून ) तें आतां काय सांगूं ! दैवापुढें मनुष्याचा कांहीं उपाय चालत नाहीं हें खरें आहे. कारण कीं, ज्या मनुष्यास धरण्याकरितां मीं इतकी खटपट केली, तो स्वतः आपण होऊन मजपुढें आला होता. त्यामध्यें व मजमध्यें चार हातांचेंही पुरतें अंतर नव्हतें. मजबरोबर दोनशें असामी होते. इतकें असून त्यास धरण्याची माझी छाती झाली नाहीं !

सं०—असें होण्याचें कारण काय ?

ग०—कारण? कारण माझें दुर्दैव! मी स्वतःच्या पराक्रमावर बारगिराचा किल्लेदार बनलों. आजपर्यंत मी ज्या ज्या लढाईंत होतों, त्या त्या लढाईंत मीं नांव मिळविलें आहे. पण काय सांगूं संभाजी महाराज, मी आपल्या वडिलांसमोर उभा राहिलों ह्मणजे माझें धैर्य अगदीं गळून जातें. माझें देहभान सुटून मी बावरा होतों. त्या वेळीं लांडग्यास पाहिल्यावर मेंढराची काय दशा होत असेल याचें मला चांगलें अनुमान होतें. परवांपासून माझी दोनदां अशी स्थिति झाली. अजूनही तें स्मरण झालें ह्मणजे अंगावर शहारे उत्पन्न होतात. देव करो व शिवाजीची व माझी गांठ पुनः जन्मांत न पडो!

सं०—( दुःखानें ) गणपतराव, आपले दुष्ट बेत जगजाहीर होऊन त्यांचा शेवटीं असा परिणाम झाला, ही गोष्ट फार वाईट झाली.

ग०—पण एवढ्यानें आमचीं दुःखें सरत नाहींत. आज उजाडावयाचे सुमारास मोरोपंत पेशवे बरोबर मोठी फौज घेऊन आले. ते इतक्या त्वरेनें व गुप्त रीतीनें येऊन ठेपले कीं, त्यांच्या येण्याची आह्मांला बातमी देखील नव्हती व त्यामुळें आह्मी अगदीं बेसावध होतों. त्यांच्या स्वारांनीं जो एकदम कहर उसळला त्याबरोबर आमची पळतां पळतां त्रेधा उडाली. त्या अनर्थांतून मी मोठ्या शर्तीनें बचावलों. पेशव्यांनीं जाऊन कोल्हापूरच्या मोंगलांची दाणादाण उडविली. आतां मोंगल वाट फुटेल तिकडे पळत सुटले आहेत. आह्मीं केलेले सर्व उपाय उलटे आमच्या गळ्यांत आले. आमच्या फितुराची बातमी सर्व देशभर पस-

रली. आतां आपणांस प्राण राखण्याकरितां मोंगलांचा आश्रय धरल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

सं०—( त्रासून ) गण्या, तुझे उद्योग बरें हे सगळे! तुझ्या नादीं मी न लागतों तर आज या दुर्दशेला कां पोंचलों असतों? संपत्ति, अधिकार व सन्मान यांतून मला काय उणें होतें? वडिलांच्या कृपेनें दुधभात खाऊन खुशाल पडलों असतों! या राज्यप्राप्तीच्या वेडगळ कल्पना माझ्या मनांत तूं भरविल्यास; मोंगलांकडे बोलणें करण्याची बुद्धि तूं शिकविलीस; बाबांस धरण्याचा घाट तूं घातलास; आणि आपलें काळें तोंड येथें मला दाखवून ह्मणतोस कीं, " मोंगलांकडे पळून गेल्याशिवाय आपल्यास गत्यंतर नाहीं ! "

ग०—(निस्पृहतेचा डौल घालून) वाहवा! मैत्री ह्मणतात ती हीच! मित्राच्या खऱ्या प्रेमाचें चीज श्रीमंत लोक याच तऱ्हेनें करितात! बडे लोकांच्या कल्याणासाठीं गरीब लोकांनीं जिवापाड श्रम केले तरी शेवटीं त्यांची पूजा याच रीतीनें व्हावयाची! संभाजी महाराज, अजूनही आपण वडिलांकडे जावें. तुह्मी प्रत्यक्ष त्यांचे पुत्र आहां, याकरितां तुह्मांस माफी होईलच. महाराज आपलेवर विश्वास ठेवणार नाहींत तरी तेथें दूधभात खाऊन ते जिवंत आहेत तोंपर्यंत राहण्यास अडचण पडणार नाहीं. जा, दरबारी लोक तुह्मांस ' पितृद्वेषी, ' ' धर्मशत्रु ' ' दगेबाज असें ह्मणतील तें ऐकून तुमची सावत्र आई क्षणोक्षणीं मर्मभेद वाग्बाण मारील ते सहन करा. वडिलांमागें एखाद्या डोंगरी किल्यांतील भुरुंगांत कित्येक वर्षे अन्नपाण्याचे हाल सोसून एखाद्या दिवशीं विषप्रयोगानें किंवा मारेकऱ्याच्या कत्या-

रीनें मरून जा, झालें. आपलें जसें प्राक्तन असेल तशी आपणांस बुद्धि होईल. मी आपणांस राज्यावर बसविण्याची निरपेक्ष बुद्धीनें खटपट केली हा मजकडून मोठा अन्याय झाला; याची क्षमा असावी. आतां माझेंच काय होईल तें होवो!

सं०–( विरमून ) तसें नव्हे गणपतराव, एकादे वेळेस उगीच मी एकीकडे बसून राहिलें ह्मणजे असले विचार मनांत येतात. तूं माझ्याच कल्याणासाठीं झटतोस ही माझी खात्री आहे. तुझी माझी मैत्रीबद्दल जी आणभाक झाली आहे ती आपण जिवंत आहों तेथपर्यंत कायम रहावयाची. तुला मी या संकटांत ओढिलें आहे, याकरितां मी तुला कधींही सोडणार नाहीं. जी तुझी गति ती माझी, मग आतां मी काय करूं ह्मणतोस?

ग०–मजबरोबर तुह्मीं मोंगलांकडे जाण्यास निघालें पाहिजे.

सं०–कधीं?

ग०–आज रात्रीं.

सं०–इतकी घाई कां?

ग०–महाराज, आतां येथें रहाणें सुरक्षित नाहीं. गडकरी लोकांनीं आजपर्यंत आपला अपमान केला नाहीं ही सुदैवाची गोष्ट. पण कालपासून तें ग्रहणें फिरलें आहे, आज गडकरी लोक अगदीं बिथरले आहेत. मी आज गडावर आलों तेव्हां त्यांच्या रागीट मुद्रांवरून मला भीति पडली कीं, ते आतांच माझा कडेलोट करतात कीं काय! पेशव्याची फौज आल्यापासून हे गडकरी इतके शेफारून गेले आहेत.

नाहीं तर आजपर्यंत त्यांना आपल्या फितुरीबद्दल संशय आला नसेल? आलाच असेल. परंतु ते सरकारी फौज येण्याची वाट पहात होते. आतां येथें आपण एक दिवस राहिलों तर खचित धोका पोंचेल.

सं०—तूं ह्मणतोस तें सगळें खरें पण माझे पाय येथून कसे सुटतील देव जाणे! माझे तैनातीस जे लोक आहेत त्यांचा मी नांवचा धनी, पण वस्तुतः बंदिवान् आहें हें तूं पहातोसच. ते मला एकट्याला पाहिजे तिकडे कसे जाऊं देतील?

ग०—मीं सर्व योजना करून ठेविली आहे, या किल्ल्याला एक चोरवाट आहे. ती मला मात्र माहीत आहे. प्रहर रात्र झाली ह्मणजे आपण हळूच कोणास न कळत त्या वाटेनें किल्याबाहेर पडूं. माडीवर आपण पोंचलों ह्मणजे तेथें दोन घोडे तयार ठेवण्याबद्दल मीं आपल्या विश्वासू गड्याला सांगून ठेविले आहे. त्या घोड्यावर बसून आपण निघून जाऊं. एकदां बाहेर पडल्यावर मग गडावरून पाठलाग होण्याची भीति नको. बरें, त्या राधाबाईचें तुह्मी काय करणार? तिला बरोबर नेणार काय?

सं०—नाहीं. आतां तिची गोष्ट मजसमोर काढीत जाऊं नको.

ग०—अहो दोन घटकांपूर्वी तुह्मी इतके आतुर झालां होतां कीं, मीं आलों नसतों तर तिजवर तुह्मी खचित बलात्कार केला असता, आणि इतक्यांत तिजविषयीं असें वैराग्य कां धरिलें?

सं०—ती हट्टी व मूर्ख पोर आहे. ती मला कधीं वश होणार नाहीं. मग तिचा उगीच नाद कशास

पाहिजे? खरेंच सांगूं गणपतराव, माझ्या बोलण्यापासून तिला फार दुःख होतें. अशा सुंदर अबलेचें मन दुखविणें योग्य नव्हे. आपल्याला वाटलें होतें तशांतली ती बायको नव्हे!

ग०—इतकी तुह्मांला भूतदया होती तर तुह्मी तिजवर जुलूम करण्यास कसे प्रवृत्त झालां होतां?

सं०—त्याचें कारण अभिमान. मीं अभिमानाच्या भरीं पडून अशीं दुष्ट कृत्यें करण्यास तयार होतों. पण मागून त्याबद्दल मला फार पश्चाताप होतो. अरेरे! त्या गरीब स्त्रियेची म्यां अधमानें किती छळणा केली?

ग०—( आपल्याशीं ) हें पोरगें अगदीं अजागळ आहे! याला या वेळीं थोडा पीळ भरला नाहीं तर राधा माझ्या हातीं लागतां दिसत नाहीं! ( मोठ्यानें ) मला वाटतें या राधेचा नाद अगदीं सोडून देण्यास पश्चात्ताप किंवा भूतदया यांपैकीं एकही कारण नसावें. ( उपहासपूर्वक ) महाराज तुह्मी भ्यालां होय?

सं०—( रागानें ) भ्यालों? तो कशाकरितां?

ग०—तिचा नवरा तुमचा सूड घेईल ह्मणून!

सं०—( संतापून ) गण्या, भय ही वस्तु जन्मापासून मला माहीत नाहीं व मला भित्रा असें आजपर्यंत कोणीही ह्मटलें नाहीं. कारण माझें धैर्य केवढें आहे ही गोष्ट जगजाहीर आहे. आज तूंच बोललास त्याला उपाय नाहीं. दुसरा कोणी असता तर त्याची जीभच कापली असती!

ग०—छे छे! तुह्मी भ्यालां ह्मणून कांहीं आश्चर्य नाहीं. महाराज, या कृष्णरावासारखा प्रतापी योद्धा

आमच्या प्रांतांत दुसरा नाहीं. तेव्हां त्याचा जर कोणीं अपराध केला तर तो सूड घेण्यास कधींही चुकणार नाहीं! त्याचा अपमान करण्याची कोणाची छाती आहे?

सं०—( आवेशानें ) कोणाची छाती? माझी! मजसमोरही तूं ज्याच्या पराक्रमाची प्रशंसा करितोस असा तो कोण पुरुष आहे? गणपतराव, त्या देशपांड्याच्या उमेट पोराच्या भीतीनें मीं राधाबाईचा नाद सोडून दिला असें तुला वाटतें काय? ठीक आहे. तर आज त्याबरोबर युद्ध करून मीं त्याच्या स्त्रीस तो पहात असतां हरण न करीन तर माझें नांवच संभाजी नव्हे, समजलास?

ग०—नको, नको. तुमच्या व कृष्णरावाच्या कलहांत त्या गरीब बायकोची विटंबना काय ह्मणून! मला आपल्या धैर्याबद्दल खात्री आहे. लोक ह्मणतील कीं, तुह्मी भ्यालां ह्मणून. पण त्यांच्याशीं आपल्याला काय करावयाचें आहे?

सं०—लोक असें ह्मणतील तर या कृष्णरावाच्या छातीवर पाय देऊन त्याच्या बायकोस मीं जन्मभर बटकीप्रमाणें वागवीन!

ग०—पण ती तुमच्या हातास कशी लागणार? किल्ल्यांतून तर तिला सर्व लोकांदेखत आपणांस नेतां येत नाहीं!

सं०—तर मग ती बरोबर असल्याशिवाय येथून मी निघतच नाहीं! येथें माझें काय होणें असेल तें होवो!

ग०—( आपल्याशीं ) मला हेंच पाहिजे होतें. ( विचार केल्यासारखें करून उघड ) संभाजी महा-

राज, येथें आपण रहाल तर खचित नाश पावाल. मला अशी एक युक्ति सुचली आहे कीं, तेणेंकरून आपल्या जाण्यास प्रतिबंध न होतां, राधाबाईस नेण्याची आपली इच्छा पूर्ण होईल.

सं०—बोल तुझी युक्ति काय आहे ती?

ग०—आपण हवालदारास बोलावून असा हुकूम करावा कीं, आज प्रहररात्र झाल्यानंतर कृष्णराव व त्याची बायको यांस बंदींतून मोकळें करून एकदम किल्ल्याबाहेर हांकून लावावें. आपण हुकूम केला ह्मणजे हवालदार त्याप्रमाणें करीलच. मग तीं आपल्या गांवाकडे जाण्यास निघतील. आह्मी आधीं पुढें जाऊन वडगांवच्या वाटेवर टपत बसूं. राधाबाई जवळ आल्याबरोबर तिला उचलून आपल्या घोड्यावर बसवा ह्मणजे झालें!

सं०—तुझी युक्ति उत्तम आहे. त्याच्या देखत राधाबाईस पळवून नेण्याची माझी प्रतिज्ञा आहे. त्याप्रमाणें मी करीन. त्याच्या अंगांत धैर्य असेल तर तो युद्धास उभा राहील!

ग०—मग आपण काय कराल?

सं०—काय करीन? त्याला अर्ध्या घटकेंत जमीनदोस्त करून निघून जाईन! दुसरें काय करणार?

ग०—मग याप्रमाणें वागण्याचा आपला निश्चय झाला?

सं०—होय झाला, त्यांत आतां अंतर होणें नाहीं.

( जातात. )

**चवथा अंक समाप्त.**

# अंक पांचवा.

## स्थळः—पन्हाळगडाखालच्या रानांतील देवीच्या देवळाजवळची एक वारी.

( राजा व बहिर्जी प्रवेश करितात. )

शि०—बहिर्जी, तूं ह्मणतोस कीं, गणपतरावाच्या गड्याकडून ही बातमी तुला कळली. पण ही बातमी खरी असेल ना?

ब०—तिच्या खरेपणाबद्दल मला तर संशय मुळींच नाहीं. तो गडी ह्मणाला कीं, संभाजी महाराज व गणपतराव प्रहररात्रीनंतर या वाटेनें मोंगलांच्या छावणीकडे जाण्यास निघतील. पण त्यांचें ह्मणणें खरें किंवा खोटें हें आतांच कळेल. कारण आतां प्रहररात्रीचा सुमार असावा.

शि०—देव करो व तुझी बातमी खरी ठरो! मग संभाजी मोंगलाकडे कसा जातो तें पाहीन!

ब०—सरकार आपलेबरोबर आणखी कांहीं मंडळी पाहिजे होती. मला एकट्यालाच बरोबर घेऊन आपण आलां हें योग्य झालें नाहीं.

शि०—कां बरें?

ब०—संभाजी महाराजांचा स्वभाव अगदीं बदलला आहे. त्यांस वाटेंत धरण्याचा प्रयत्न केला असतां ते काय करतील हें कळत नाहीं. निराशेनें मनुष्य बेफाम झाला ह्मणजे तो काय न करील?

शि०—ही गोष्ट माझ्या मनांत पूर्वी येऊन चुकली होती. पण माझ्या मुलावर माझा किती वचक आहे

हें मी जाणतों. तो किती बेफाम झाला असला तरी मी जर त्यास हांक मारून ह्मटलें कीं, " शंभू फीर मागें," तर त्याची पुढें पाऊल टाकण्याची मगदूर नाहीं.

ब०—पण तो गणपतराव—याविषयीं आपण काय ह्मणतां? तो तर उलट्या काळजाचा मनुष्य आहे!

शि०—अं:, त्या किल्लेदारांत कांहीं अर्थ नाहीं. तो चांगला शिपाई आहे असें मी ऐकत होतों. पण परवांपासून तो दोनदां मजसमोर आला आणि दोनही वेळां त्याची अगदीं गाळण उडाली. मग मला पाहून त्याची अशी दशा होते, कीं तो मूळचाच शेंदाड शिपाई आहे हें कळत नाहीं. कसेंही असलें तरी त्याजपासून अपणास भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

ब०—ऐका, ऐका. महाराज, घोड्यांच्या टापा अगदीं जवळ ऐकूं येऊं लागल्या. आपल्या बाजूस वांकणांतून वाट येत असल्यानें कोणी आलें तर अगदीं कळत देखील नाहीं. ते पहा. आपणांस पाहिजेत ते गृहस्थ घोड्यावर बसून चालले आहेत. संभाळा. सावधपणानें पुढें व्हा. ( मिशांस पीळ भरून ) मी या किल्लेदाराचा समाचार घेतों.

शि०—छे! पुढें जाऊन त्यांस अडविण्याचें कारणच नाहीं. कारण, ते दोघेही घोड्यावरून उतरून व घोडे झाडांस बांधून इकडेसच येत आहेत. आपण या जवळच्या जाळींत बसून ते काय बोलतात तें ऐकूं.

[ संभाजी व गणपतराव प्रवेश करितात. )

सं०—( गणपतरावास ) आपण किल्ल्यांतून तर सुरक्षित बाहेर पडलों. पण पुढें काय विघ्नें येतील न कळे! माझ्या तर मनाला चैन पडत नाहीं!

ग०—महाराज, आपण अगदीं दिलगिरी धरूं नये. गडकरी आपल्या पाठीस लागले तर त्यांच्या हातावर तुरी देऊन आह्मी निसटून जाऊं. मी किल्यावर होतों तेथपर्यंत मात्र मनाला सारखी धुगधुग लागली होती. गडकऱ्यांनीं मला पकडून शिवाजीकडे नेलें असतें तर काय झालें असतें? तुह्मांदेखत तुह्मांकरितां तुमच्या गण्याला हत्तीच्या पायांशीं बांधून घेऊन मारावें लागलें असतें! पण आतां काय, मी वाघाच्या जाळींतून सुरक्षित बाहेर पडलों. आतां मी कोणाला भितों कीं काय?

शि०—( आपल्याशीं ) हारामखोरा, वाघाच्या जाळींतून तूं सुटलास तर नाहींमच. पण उलटा वाघाच्या जबड्यांत मात्र पुरता सांपडला आहेस!

ग०—( मोठ्यानें हंसून ) कायहो संभाजी महाराज. आपले वडील राजद्रोही लोकांस मोठें शासन करीत असतात नाहीं बरें? मी तर प्रत्यक्ष तुह्मांला घेऊन शत्रूकडे चाललों आहें. आहे त्यांचें सामर्थ्य मला अडविण्याचें?

शि०—[ आपल्याशीं ] अडविण्याचेंच काय, पण रडविण्याचेंही सामर्थ्य आहे! प्रसंग आला पाहिजे ह्मणजे तूं पहाशीलच!

सं०--बरें तें असूंदे. तीं दोघें अजून आलीं नाहींत हें कसें? मला वाटतें आपण खुळ्यासारखे रात्रभर येथें वाट पहात बसूं, आणि तीं येणार देखील नाहींत. त्यांना आपलेबद्दल संशय असेल.

शि०—( आपल्याशीं ) तीं? तीं कोण?

ग०—महाराज तो कृष्णराव, जिवाजीपंताचा मु-

लगा! संशय, धूर्त व शहाण्या मनुष्यास येतात; मूर्खास संशय कुठला व भय कुठलें! तुह्मी स्वस्थ बसा. असे उतावीळ होऊं नका. वेळ आली ह्मणजे त्या जिवाजीपंताच्या सुनेवर झडप घाला ह्मणजे झालें! तो कृष्ण्या कांहीं गडबड करूं लागला तर टाकूं त्याला तिथल्या तिथेंच तोडून ह्मणजे झालें!

शि०–(बहिर्जीकडे वळून) बहिर्जी, हें भाषण तूं ऐकिलेंसना? जिवाजीपंताच्या मुलाचा घात करून त्याच्या सुनेस पळवून नेण्याचा या दुष्टांनीं बेत केला आहे. मी शंभूस धरून नेण्याकरितां आलों असून जिवाजीपंताच्या पुत्रास व सुनेस या संकटांतून सोडविण्याची मला संधि आली आहे हें माझें थोर भाग्य होय!

ब०–हें जर खरें असेल तर महाराज, आपण प्रकट होऊन पुढें प्राप्त होणाऱ्या विघ्नाचा आधींच प्रतिबंध करावा हें उत्तम. कारण, येथें कांहीं तरी मोठा अनर्थ होईल असा सुमार दिसतो. कृष्णराव लहान सामान्य मनुष्य नाहीं. तो प्रलय करील! संभाजी महाराजही उगीच बसणारे नव्हेत. त्यांची व कृष्णरावाची लढाई जुंपली असतां काय परिणाम होईल नकळे!

शि०–बहिर्जी, शंभूस आपल्या दुष्ट कृत्याबद्दल पश्चात्ताप झाला नाहीं आणि नुसतें मीं त्यास धरून नेलें तर त्यापासून तादृश उपयोग नाहीं. फार झालें तर त्यास प्रतिबंधांत ठेवून तो असलीं दुष्ट कर्में करणार नाहीं अशी तजवीज होईल त्या रीतीनें करीन. पण त्याचें जर मन शुद्ध नाहीं तर पुढेंमागें तो [illegible]

त्यास कुमार्गापासून अगदीं परावृत्त करण्यास पश्चात्ताप हेंच मुख्य साधन होय. कृतकर्माबद्दल त्यास पश्चात्ताप झाला तर मी त्याजवर प्रथमप्रमाणें कृपा करीन. न झाला तर मरेपर्यंत कैदेंत टाकीन. येथें आतां काय काय प्रकार होतो हें शेवटपर्यंत मी बघणार आहें. आपलेबद्दल अगदीं अडलेंच तर मात्र ओळख द्यावयाची

ब०—जशी सरकारची मर्जी.

ग०—( संभाजीस ) महाराज, सावध असा. ही तुमची शिकार आली.

( राधाबाई व कृष्णराव बोलत येतात. )

कृ०—( क्रोधानें ) काय? तो दुष्ट तुझ्यावर जुलूम करण्यास देखील प्रवृत्त झाला?

रा०—होय, होय. अग बाई! त्या वेळच्या स्थितीचें स्मरण झालें ह्मणजे भयानें माझें काळीज थरारून जातें!

कृ०—( तिला जवळ घेऊन व तिचें चुंबन घेऊन ) आतां तूं भीति धरूं नको. मी समीप असतां तुला यत्किंचित् पीडा देण्यास समर्थ होईल असा पुरुष जन्मासच आला नाहीं!

रा०—पण त्या वेळीं मला सोडविण्याकरितां गणपतराव तेथें आले ह्मणून हे पाय माझ्या दृष्टीस पडत आहेत!

कृ०—अग, ईश्वराला अनाथाची काळजी आहे. भक्तांस संकट पडलें ह्मणजे तोच या गणपतरावासारख्या उदार मनाच्या पुरुपास पाठवून संकटाचा परिहार करितो. यावरून गणपतराव आमचा हितशत्रु नसून तो आपला असा विश्वासू स्नेही आहे अशी

माझी खात्री होते. आमची संपत्ति लुटून घेण्यांत व आह्मां दोघांस कैदेंत टाकण्यांत त्याच्या नांवाचा उगीच डंका मात्र झाला. बाकी तें कृत्य संभाजीचेंच होय यांत संशय नाहीं!

ग०—होय, माझ्या सर्व दुःखांस व यातनांस तोच मूळ कारण. ( डाव्या बाजूस पाहून भीतीनें ! ) अगाई. तें कोण तेथें बसलें आहे!

सं०—( एकदम पुढें होऊन राधाबाईजवळ जाऊन ) मनमोहिनी, असा व्यर्थ आरोप तूं मजवर कां करितेस? चल मजबरोबर आणि मग पहा कीं हा विलासी पुरुष तुला यातना देणारा आहे, कीं तुजबरोबर विषयदनामध्यें प्रीतीच्या सरोवरांत स्वच्छंदानें क्रीडा करणारा आहे.

शि०—(आपल्याशीं) शंभू, तुझेच कारे हे शब्द!

ग०—( आपल्याशीं ) मूर्ख बेटा! तिला उचलून घोड्यावर घालावयाची आणि पळून जायचें. तिजबरोबर आलंकारिक भाषणें करण्याची का ही वेळ?

कृ०—(मध्यें होऊन व तरवार उपसून संभाजीस ) राजपुत्रा! खबरदार, मागें हो. संपत्ति, अधिकार व शक्ति हीं सर्व तुला अनुकूल आहेत. तेव्हां तूं ह्मणशील कीं या गरीब मनुष्यानें मजशीं काय वैर करावयाचें आहे? तथापि इतकें मनांत पक्कें समजून ठेव कीं, जेथपर्यंत माझ्या जिवांत जीव आहे, तेथपर्यंत मी तुला एक पाऊलही पुढें सरकूं देणार नाहीं. माझा मुर्दा पडल्यावर त्यावरून तूं चालत जा, आणि मग ती तेथपर्यंत जिवंत राहिल्यास तुझ्या हातीं लागेल.

ग०—( आपल्याशीं ) तुझा मुर्दा पडावा ह्मणूनच माझी इतकी खटपट!

रा०–( कांकुलतीनें कृष्णरावास एकीकडे ओढून ) आपण कां जीव धोक्यांत घालतां? आपल्या सर्व श्रमांस कारणीभूत जी मी, तीमीच या कड्यावरून उडी टाकून प्राण देतें, ह्मणजे सगळा तंटा मिटेल !

कृ०–प्रिये, तूं गेल्यावर मागें राहून मला काय कर्तव्य आहे? माझा जीव धोक्यांत पडेल हें पाहण्याची ही वेळ नव्हे. विवाहामध्यें अग्नि व ब्राह्मण यांजसमोर मीं तुझें पाणिग्रहण केलें आहे. त्या अर्थी तुझें संरक्षण करण्याचें माझें कर्तव्यकर्मच आहे, तें मला करूं दे. यश अपयश येणें हें माझ्या हातीं नाहीं. ती गोष्ट दैवाधीन आहे. या कलहांत जर दुर्दैवानें मी पडलों, तर तुला वाटेल त्याप्रमाणें तूं कर. तेथपर्यंत तूं स्वस्थ असावेंस अशी तुला माझी आज्ञा आहे. ( संभाजीकडे वळून ) चल दुष्टा, लढण्यास तयार हो. तूं माझ्या धर्मपत्नीचा छळ केला आहेस, त्या अर्थीं या वैराग्नीचें शमन रक्तपाताशिवाय होणें नाहीं. आजच्या युद्धाचा शेवट कोणाचा तरी प्राण गेल्याशिवाय होणेंच नाहीं.

सं०–( तरवार उपसून ) हां हां! असें असें! कृष्णराव, मला वाटत होतें कीं तुझ्या आंगांत कांहीं तरी शहाणपणा असेल, व तूं बायकोची आशा न धरितां जीव बचावून निघून जाशील, परंतु मजबरोबर लढून धारातीर्थीं मरण पावण्याचें तुझ्या मनांत आलें आहे असें दिसतें. ठीक आहे. शत्रूनें युद्धार्थ निमंत्रण केल्यावर संभाजी पाठ फिरवून माघारा निघाला ही गोष्ट कधीं घडली नाहीं व पुढेंही घडणार नाहीं.

शि०–( आपल्याशीं ] हें तुझें शौर्य यवनांचा उच्छेद करून स्वधर्म स्थापण्याकारितां जर उपयोगीं

पडतें, तर आमच्या कुळास मोठें भूषण आलें असतें !

रा०–हाय! हाय! किती तरी मी अभागी ! काय हे माझ्या जन्माचे धिंडवडे! हे सर्व कलह मजकरितां चालले आहेत! आजच्या प्रसंगीं राजपुत्राच्या देहास कांहीं अपाय झाला तर आमच्या कुलाच्या राजभक्तीस अक्षय्य कलंक लागेल! जर माझ्या जीविताचें साफल्य करणाऱ्याचेंच कांहीं बरें वाईट झालें तर माझ्या जिण्यास धिक्कार असो !

सं०–संभाळ कृष्णराव, तुझ्या आंगीं कांहीं सामर्थ्य असेल तर विद्युत्पाताप्रमाणें भयंकर असा जो माझा खड्गप्रहार त्याचें निवारण कर.

( कृष्णराव व संभाजी लढूं लागतात. लढतां लढतां कृष्णराव संभाजीच्या तरवारीचे तुकडे तुकडे करितो. संभाजी आश्चर्यानें स्तब्ध उभा राहतो. )

कृ०–(तरवार खालीं ठेवून ) संभाजी, तूं माझे असे अपराध केले आहेस कीं, या वेळीं मीं तुझा प्राण घेतला तरी मला कोणी दोष देईल असें नाहीं. ज्याच्या हातांत हत्यार नाहीं त्याच्यावर वार चालविणारा अधम पुरुष मी नाहीं ! याकरितां मी आपलें हत्यार ठेवून तुला बाहुयुद्धार्थ बोलवीत आहें. धैर्य असेल तर पुढें हो. नाहीं तर आमची वाट सोड ह्मणजे आह्मी आपल्या रस्त्यानें निघून जातों.

सं०–( उत्साहानें दंड थोपटून ) कबूल आहे माझ्या तरवारीनें मला आयत्या वेळीं दगा दिला, तरी हे माझे विश्वासू बाहू अजून कायम आहेत. यांचें बळ कसें आहे तें तुझ्या दृष्टीस पडेलच.

शि०–(आपल्याशीं) शाबास ! शाबास ! कृष्णराव, केवळ भीष्माप्रमाणें धर्मयुद्ध करणारा या काळांत तूं

एकच होस. अशा नीतीनें जो लढाई करितो त्यास ईश्वर जय देईलच यांत काय संशय? पण हें अजून आमच्या पोराला समजत नाहीं!

ग०—(पुढें होऊन) थांबा; वीरहो, थांबा. अशानें तुमच्या भांडणाचा निकाल लवकर लागणार नाहीं. कृष्णराव, घ्या आपली तरवार उचलून. संभाजी महाराज तुह्मी माझी तरवार घेऊन युद्ध करा. पण तुह्मां दोघांसही सांगतों कीं, मारामारी करून आपले हातपाय तोडून घेण्यांत अर्थ नाहीं. याकरितां एकमेकांनीं मागच्या सर्व गोष्टी विसरून संधि करावा हें उत्तम.

सं०—कृष्णराव मला शरण येईल तर मी त्याला जिवानिशीं सोडीन.

कृ०—(तिरस्कारानें) शरण? मी तुला शरण येणार? तूंच माझ्या पत्नीच्या पायांवर मस्तक ठेवून जीवदान मागशील तर आज माझ्या हातून जिवंत सुटशील. मी तर तुझ्या छातीवर पाय देऊन उभा आहें.

सं०—झालें. गणपतराव, आतां तूं रदबदली करूं नकोस. आतां मी कृष्णरावाशीं लढून एक जय तरी मिळवीन, किंवा मरून तरी जाईन.

शि०—(हळूच) बहिर्जी, हे दोघेही पुरते हट्टास पेटले आहेत असें दिसतें. या कलहाचा काय परिणाम होईल न कळे. काय करूं? माझ्यानें स्वस्थ बसवत नाहीं. पुत्राच्या जिवास अपाय होईल या चिंतेत माझा जीव तळमळत आहे!

कृ०—(किल्लेदाराचा हात धरून एकीकडे) गणपतराव, तूं आणि मी लहानपणापासून बंधूप्रमाणें वागत आलों आहों. याकरितां मजबद्दल तुला अभिमान अ-

सला पाहिजे. मी तर माझ्या स्त्रियेची अब्रू बचावि-ण्याकरितां लढत आहें. जर मी यांतून जिवंत बाहेर आलों तर सर्व ठीकच आहे. मी पडलों तर मात्र माझ्या प्राणवल्लभेस या दुष्टाच्या हातीं लागूं देऊं नको. ही माझी तरवार घेऊन आधीं तिचे दोन तुकडे कर. नंतर या गर्वानें अंध झालेल्या राजपुत्राशीं लढून त्याचा प्राण घे. ह्मणजे तूं आमच्या मरणाबद्दलचा चांगला सूड घेतलास असें होईल. ( दुःखानें उसासा टाकून ) माझा वृद्ध पिता तर येथून दूर राहिला. आमचा शेवट अपरात्रीं या घोर अरण्यांत होणार. असो, ईश्वरी इच्छा! आतां बाबांस माझे ठिकाणीं तूंच आहेस. त्यांचें मन अगदीं दुखवूं नको. त्यांची अशी शुश्रूषा कर कीं, जेणेंकरून त्यांस आमचा विसर पडेल. आमची काय वतनवाडी आहे ही आतां तुझीच आहे. मी सांगतों याप्रमाणें तूं करशीलना?

ग०—हो हो! त्यांत काय संशय?

कृ०—तर घे शपथ. मार माझ्या गळ्यावर हात.

ग०—( कृष्णरावाच्या गळ्यावर हात ठेवून ) तूझ्याच गळ्याची शपथ!

कृ०—गणपतराव, तुमची आमची हीच आतां शेवटची भेट. एकदां मला शेवटचें कडकडून आलिंगन दे ह्मणजे मी सुखी होईन. मग प्रत्यक्ष कलिकालाशींही झगडण्यास मी मागेंपुढें पहाणार नाहीं! (दोघे एकमेकांस आलिंगन देतात व किल्लेदार मागें सरतो.)

सं०—कृष्णराव, आतां विलंब कां?

कृ०—विलंब इतक्याकरितां कीं, अजूनही विचार करून तूं आपले प्राण वांचवावेस. परंतु तुझा तर म-

रण्याचा हट्ट दिसतो, तर तसेंच कां होईना?

( दोघे पुनः लढतात. कृष्णरावास वार लागून तो मूर्छित पडतो. संभाजीही श्रमानें धापा देत एका शिळेवर बसतो. ]

रा०–( त्वरेनें कृष्णरावाजवळ जाऊन व मोठ्यानें ओरडून ) हारे दुर्दैवा! काय हा मजवर प्रसंग आणिलास! आतां मी काय करूं! कोणास हांक मारूं! कोणाचा धांवा करूं! ( मूर्छित पडते. )

शि०–( आपल्याशीं ) हरहर!! काय भयंकर प्रसंग हा! या स्त्रीपुरुषांच्या नाशास मी कारण झालों! मीं जर पुढें येऊन माझ्या पुत्राचा हात धरला असता तर या गोष्टी घडून न येत्या.

ग०–( हर्षानें संभाजीस ) कायहो, तो पुरता मेला का?

सं०–( कृष्णरावाजवळ जाऊन व त्याची जखम पाहून ) छे! तो सुदैवानें मरण्याची भीति नाहीं. पायाला जखम लागली आहे ती इतकी भयंकर नाहीं. जखमेंतून रक्त वाहूं न दिलें ह्मणजे तो आतां सावध होईल. ( कमरेचा शेला सोडून व त्याचा पदर फाडून कृष्णरावाची जखम बांधतो.

शि०–असो. कृष्णरावाच्या जिवाला धोका नाहीं हें ऐकून मला समाधान वाटतें. त्याच्या बायकोची स्थिति मात्र काय झाली आहे, हें कळत नाहीं.

ग०–त्या देशपांड्याच्या पोराचें शिर धडापासून वेगळें करून एकदां धडाचा निकाल लावांना?

सं०–( क्रोधानें ) दुष्टा! ज्या वीराचें मन एवढें उदार कीं, ज्यानें मी निःशस्त्र झालों असतां मजवर

हत्यार धरण्याचें नाकारलें, तो मूर्छित पडला असतां त्याचा खून करणें हें मांगाचें काम, तें तूंच करशील! माझ्या हातून ही गोष्ट कदापि घडणार नाहीं!

शि०—शाबास! शंभू? हें मात्र तूं माझ्या मुलाप्रमाणें भाषण केलेंस?

ग०—पण राधा जर तुह्मांला पाहिजे असेल तर याचा नाश आधीं तुह्मीं केला पाहिजे. तो जिवंत राहून कसें चालेल?

शं०—(विचार करीत स्तब्ध बसतो.)

रा०—(सावध होऊन) काय? अजून येथेंच पडणें झालें आहे? (कृष्णरावाच्या गळ्यास मिठी मारून व त्याच्या हनुवटीस हात लावून) अहो! आतां किती अंत पहाल! उठा, उठा, चला आपल्या गांवीं जाऊं मामंजी आपली वाट पहात बसले असतील. येथें थंडी कोण पडली आहे, आणि अशा ठिकाणीं आपण निद्रा घेत पडलां यास काय ह्मणावें? या अरण्यांत व्याघ्रादि हिंस्र पशु हिंडत असतात त्यांचें तुम्हांस भय नाहीं वाटत? आपण मजजवळ अबोला कां धरिला? आपणच जर मजवर राग धरिला तर मीं आतां कोणाच्या तोंडाकडे पहावें? आपण एका घटकेपूर्वीं काय काय बेत करीत होतां ते सर्व निर्फळ झाले काय?

कृ०—( सावध होऊन राधाबाईकडे पाहून ) काय? तूं अजून येथेंच बसली आहेस? तूं घाबरूं नको. मी चांगला सावध आहें. पण मला बोलण्याला देखील शक्ति उरली नाहीं. संभाजी आणि गणपतराव कोठें गेले?

रा०—( हर्षानें ) ते दोघे पलीकडे कांहीं बोलत आहेत. पण वाऱ्यानें त्यांचें बोलणें ऐकूं येत नाहीं.

आपणही बोलूं नये; स्वस्थ असावें. बोलण्याचे श्रम आपणाला सोसणार नाहींत.

ग०—( संभाजीस ) कां महाराज, आपण स्तब्ध बसलां! उत्तर कां करीत नाहीं.

शि०—(आपल्याशीं) शंभू आतां काय उत्तर देतो हें ऐकण्याची मला उत्कंठा लागली आहे!

सं०—गणपतराव. झाली ती गोष्ट झाली. ती आतां परत येते असें नाहीं. कृष्णरावाचें उदार वर्तन व अपार शौर्य पाहून माझें मन अगदीं विरघळून गेलें आहे. व मी परम नम्र झालों आहें. अशा पुरुषाशीं मीं कलह केला, आणि तोही त्याच्या धर्मपत्नीच्या अभिलाषानें! तिचें पातिव्रत्य तरी केवढें, कीं जिला अहल्याद्रौपदी इत्यादि साध्वींनीं वंदन करावें! लक्षावधि स्त्रीपुरुषांमध्यें असा जोडा एखादा जमून यावयाचा. त्यांचाही मीं अपमानें मुखभंग केला ही गोष्ट मनांत आली ह्मणजे माझें मन मला खाऊं लागतें. किल्लेदार, राधाबाईस या क्षणापासून मी आपली पाठची बहीण ह्मणून समजतों. यांत काय तें समज.

शि०—( आपल्याशीं ) पुत्रा. तुझ्या तोंडचे हे शब्द ऐकून मी कृतार्थ झालों.

ग०—( मनांत ) झालें! आजपर्यंत मीं केलेल्या सर्व खटपटी व्यर्थ झाल्या! असो. आतां एक गोष्ट विचारणें राहिली आहे. ( उघडपणें ) महाराज, आपण येथें बोलत बसून उपयोगी नाहीं. आपण कोणीकडे निघालों आहों हें आपल्या ध्यानांत आहेना?

सं०—मला आतां मोंगलांकडे येण्याची जरूरी ... पळवून नेऊन मोंगलांच्या मुलखां-

त जाऊन रहावें असें माझ्या मनांत होतें, पण आतां ती दुष्ट बुद्धि मीं सोडून दिली आहे. आतां मी बाबांकडे जाऊन त्यांचे पाय धरीन आणि ह्मणेन कीं, "बाबा, मीं महदन्याय केले आहेत. मी आपल्या पायांशीं आलों आहें. माझ्या अपराधाबद्दल शिक्षा करणें किंवा क्षमा करणें आपणांकडे आहे." तुला वाटेल तिकडे तूं जा. तुझी माझी आजपासून संगत सुटली.

ग०—( मनांत ) लागलें वाघाचें पिलूं नखें बाहेर काढयला! आतां याला मोकळें सोडून उपयोगीं नाहीं. हा खचित राधाबाईला मी नेऊं लागलों तर अडथळा करील. ( मोठ्यानें ) छे छे! असें कसें होईल? आपण आणाशपथा घेऊन आमरणांत मैत्री राखण्याचें ठरविलें आहे; त्याचा हाच का अर्थ? जेथें आपण तेथें मी. मीही महाराजांजवळ जाऊन आपले अन्याय कबूल करीन. मग मला काय शिक्षा होईल ती होवो!

सं०—( गणपतरावाची पाठ थोपटून ) शाबास! खरा मित्र ह्मणावें तर तुलाच! तुला क्षमा होण्याबद्दल मी यथाशक्ति खटपट करीन.

ग०—( घाबरल्यासारखें करून ) संभाजी महाराज, आपले दंडाला जखम लागली आहे. तिकडे आपलें लक्ष्य गेलें नाहीं.

सं०—(किंचित् हंसून) अं:, उगीच कुठें चाट लागली आहे झालें; त्यांत काय आहे?

ग०—भलतेंच नाहीं तें! असल्या गोष्टीची उपेक्षा करून उपयोग नाहीं. माझ्या शरीरास शंभर जखमा लागल्या तरी त्यांचें मला इतकें दुःख होणार

नाहीं. पण आपल्यावर माझें इतकें अवर्णनीय प्रेम आहे कीं, आपल्यास तिळमात्र दुःख झालें असतां माझा जीव कसा कासावीस होतो! आपण खालीं बसून आपले हात अंमळ लांब करा ह्मणजे मी डोकीचा पटका काढून त्यानें ती जखम बांधून टाकितों.

सं०—बरें जशी तुझी मर्जी असेल तसें कर.

( संभाजी खालीं बसतो व गणपतराव त्याची जखम बांधतां बांधतां शिताफीनें हातपाय बांधूं लागतो. )

शि०—( आपल्याशीं ) अरे घातक्या, हीच का तुझी मैत्री!

सं०—( विस्मयानें ) मूर्खा, हें रे काय!

ग०—( संभाजीस पुरतें बांधून ) ही एक खुबी आहे.

सं०—ह्मणजे?

ग०—आपले वडिलांस लोक सांबाचा अवतार ह्मणत असतात. आपण त्यांचें पुत्र ह्मणून आपणांस चतुर्भुज करून मीं विष्णूचा अवतार बनविलें आहे!

सं०—( संतापून ) कोण पाजी मनुष्य आहेसरे तूं! थट्टा कोणच्या वेळीं कोणाजवळ करावी हें तुला कांहींच समजत नाहीं!

ग०—थट्टा! अशी थट्टा थट्टा समजून किती लोक मरत असतील न कळे! एकाद्यास तोफेच्या तोंडीं बांधून उडविण्यांत किंवा हत्तीच्या पायीं बांधण्यांत जर तुह्मी थट्टा समजत असाल तर हीही थट्टाच समजा!

सं०—अरे, तुझें ह्मणणें तरी काय आहे?

ग०—( गर्वानें व क्रोधानें ) इतःपर जर तूं मला अरे तुरे ह्मणून हांका मारशील तर चाबकांनीं तुझ्या पाठीच्या चिंधाड्या उडवीन! मी आतां तुझ्या दरोडे-

त जाऊन रहावें असें माझ्या मनांत होतें, पण आतां ती दुष्ट बुद्धि मीं सोडून दिली आहे. आतां मी बाबांकडे जाऊन त्यांचे पाय धरीन आणि ह्मणेन कीं, "बाबा, मीं महदन्याय केले आहेत. मी आपल्या पायांशीं आलों आहें. माझ्या अपराधाबद्दल शिक्षा करणें किंवा क्षमा करणें आपणांकडे आहे." तुला वाटेल तिकडे तूं जा. तुझी माझी आजपासून संगत सुटली.

ग०–( मनांत ) लागलें बाबाचें पिलूं नखें बाहेर काढयला! आतां याला मोकळें सोडून उपयोगीं नाहीं. हा खचित राधाबाईला मी नेऊं लागलों तर अडथळा करील. ( मोठ्यानें ) छे छे! असें कसें होईल? आपण आणाशपथा घेऊन आमरणांत मैत्री राखण्याचें ठरविलें आहे; त्याचा हाच का अर्थ? जेथें आपण तेथें मी. मीही महाराजांजवळ जाऊन आपले अन्याय कबूल करीन. मग मला काय शिक्षा होईल ती होवो!

सं०–( गणपतरावाची पाठ थोपटून ) शाबास! खरा मित्र ह्मणावें तर तुलाच! तुला क्षमा होण्याबद्दल मी यथाशक्ति खटपट करीन.

ग०–( घाबरल्यासारखें करून ) संभाजी महाराज, आपले दंडाला जखम लागली आहे, तिकडे आपलें लक्ष्य गेलें नाहीं.

सं०–(किंचित् हंसून) अं:, उगीच कुठें चाट लागली आहे झालें; त्यांत काय आहे?

ग०–भलतेंच नाहीं तें! असल्या गोष्टीची उपेक्षा करून उपयोग नाहीं. माझ्या शरीरास शंभर जखमा लागल्या तरी त्यांचें मला इतकें दुःख होणार

नाहीं. पण आपल्यावर माझें इतकें अवर्णनीय प्रेम आहे कीं, आपल्यास तिळमात्र दुःख झालें असतां माझा जीव कसा कासावीस होतो! आपण खालीं बसून आपले हात अंमळ लांब करा ह्मणजे मी डोकीचा पटका काढून त्यानें ती जखम बांधून टाकितों.

सं०—बरें जशी तुझी मर्जी असेल तसें कर.

( संभाजी खालीं बसतो व गणपतराव त्याची जखम बांधतां बांधतां शिताफीनें हातपाय बांधूं लागतो. )

शि०—( आपल्याशीं ) अरे घातक्या, हीच का तुझी मैत्री!

सं०—( विस्मयानें ) मूर्खा, हें रे काय?

ग०—( संभाजीस पुरतें बांधून ) ही एक खुबी आहे.

सं०—ह्मणजे?

ग०—आपले वडिलांस लोक सांबाचा अवतार ह्मणत असतात. आपण त्यांचें पुत्र ह्मणून आपणांस चतुर्भुज करून मीं विष्णूचा अवतार बनविलें आहे!

सं०—( संतापून ) कोण पाजी मनुष्य आहेसरे तूं? थट्टा कोणच्या वेळीं कोणाजवळ करावी हें तुला कांहींच समजत नाहीं!

ग०—थट्टा! अशी थट्टा थट्टा समजून किती लोक मरत असतील न कळे! एकाद्यास तोफेच्या तोंडीं बांधून उडविण्यांत किंवा हत्तीच्या पायीं बांधण्यांत जर तुह्मी थट्टा समजत असाल तर हीही थट्टाच समजा!

सं०—अरे, तुझें ह्मणणें तरी काय आहे?

ग०—( गर्वानें व क्रोधानें ) इतःपर जर तूं मला अरे तुरे ह्मणून हांका मारशील तर चाबकांनीं तुझ्या पाठीच्या चिंधाड्या उडवीन! मी आतां तुझ्या दरोडे-

खोर बापाचा नोकर नाहीं! मी अलमगीर बादशहाचा नोकर आहें! मला 'गणपतराव मनसबदारसाहेब बहादूर' अशी हांक मारून नम्रपणानें हात जोडून भाषण करीत चल. तूं ह्मणशील मी शिवाजीचा मुलगा; पाहिजे त्याबरोबर पाहिजे तसा वागलों तरी चालणार आहे. पण तें आतां विसर. मागचे चाळे सोडून दे. तूं माझ्या ताब्यांत पुरता सांपडला आहेस. मी तुला असाच मोंगलांकडे नेणार. तेथून तुला उंटाच्या पाठीवर उलटा बांधून दिल्लीस पाठवून देऊं; समजलास आतां मी काय ह्मणतों तें?

सं०—काय गणपतराव, तूं मला कैद करून मोंगलांकडे नेणार? दुष्टा, आजपर्यंत मीं तुजवर बंधूप्रमाणें प्रेम करून अत्यंत विश्वास ठेविला; सुखदुःखाच्या गोष्टी मीं तुजजवळ बोलून प्रत्येक कामांत तुझी मसलत घेत होतों; तूंही प्रतारणा करणार नाहीं म्हणून शपथ घेतलीस; त्याचा शेवट हाच काय? तूं माझ्या बापाच्या घरांतून मला काढून शेवटीं माझ्या गळ्यास फांस लाविलास! अरे विश्वासघातक्या, असा तुझा अपराध तरी मीं काय केला होता?

ग०—तूं शिवाजीचा मुलगा कां झालास? एकाद्या गरीब कुणब्याच्या कुळांत कां उत्पन्न झाला नाहींस? हाच तुझा मुख्य अपराध. शिवाय ज्या स्त्रियेवर लहानपणापासून मीं दृष्टि ठेवली होती, तिजवर तूं जुलूम करण्यास प्रवृत्त झालास. तिला पळवून परदेशांत नेण्याची खटपट तूं चालविलीस. हे काय लहानसान अपराध आहेत? (इकडे तिकडे फिरत) असो. रात्र सरत चालली. अजून मला पुष्कळ लांब जावया-

चें आहे. आतां त्या देशपांड्याच्या मुलास कंठस्नान घालून राधेला व तुला येथून नेण्याची खटपट करितों.

रा०—( कृष्णरावास ) आपण सावध आहांना? ( किंचित् थांबून ) हे तर अगदीं स्तब्ध पडले आहेत! ही काय निद्रा आली आहे किंवा मूर्च्छा आली आहे हें कळत नाहीं! ( मोठ्यानें ) अहो गणपतराव, तेथें तुह्मी बोलत काय उभे रहातां! आधीं इकडे या आणि यांची प्रकृति पहा!

ग०—आलों आलों बरें तिकडेच! माझे सोनकुले! थांब अंमळ.

सं०—अरे चांडाळा, घातक्या, नीचा, तुझीं कर्मे इतकीं दुष्ट आहेत कीं त्यांची निंदा करण्यास माझी जिव्हा समर्थ होत नाहीं! जर तूं अंमळ माझे हात मोकळे सोडशील तर—

ग०—( हंसून ) नको नको! तुझी जिव्हाच तुझ्या स्वाधीन आहे तेवढ्यानेंच काय चालेल तितकें चालूं दे! तुझे जर मीं हात मोकळे सोडिले तर गाढवें ह्मणूं लागतील कीं आमच्यापेक्षां माणसांत देखील कित्येकांचे कान लांब असतात!

सं०—( दुःखानें ) संभाजी! तूं एवढ्या प्रबळ छत्रपतीचा पुत्र असून आज तुझी अशी दुर्दशा व्हावीना! अथवा दुर्जनाच्या संगतीपासून हाच परिणाम! आज येथें माझा कोणीच कैवार घेणारा नाहीं! बाबा बाबा! तुमचे जरी मीं घोर अपराध केले आहेत, तरी माझी ही स्थिति पाहून तुह्मांला खचित दया आली असती!

शि०—( आपल्याशीं ) पुत्रा, अशा प्रसंगींही मी तुला विसरलों नाहीं बरें!

रा०–( गणपतराव तिजकडे येत असतां ) अहो गणपतराव, सांगा, सांगा, संभाजी महाराजही जखम लागून पडले आहेत !

सं०–( मोठ्यानें ओरडून ) हे साध्वी, माझे हातपाय बांधले जाऊन पतिव्रतेचा छळ केल्यापासून होणाऱ्या पापांचें मी फळ भोगीत आहें ! आतां तूं मात्र या राक्षसापासून आपल्या अब्रूचें रक्षण कर, व आपल्या पतीचेही प्राण वांचीव. मी जर मोकळा असतों तर तुह्मां दोघांचें रक्षण करण्यांत मीं आपला प्राण दिला असता.

रा०–गणपतराव, महाराज हें काय बोलतात ! तुह्मी इकडे कोणच्या हेतूनें येत आहां ? तुमचे हातांत हत्यार कशाकरितां ?

ग०–जिवलगे, या तुझ्या अजागळ नवऱ्यापासून तुला एकदांची मोकळी करितों. याच्यामुळेंच तुला या यातना भोगाव्या लागल्या ! तूं या वेळीं मऊ बिछान्यावर झोंप घेत सुखानें पडलेली असावयाचीस; परंतु याच्याच संगतीनें तुला अरण्यांत यावें लागलें. याकरितां एकाच घावानें याला यमलोकीं पाठवितों.

रा०–नका नका ! असें बोलूं देखील नका !

ग०–मी एक चकार शब्द देखील अधिक बोलत नाहीं. जें मी आतां बोललों तें करून दाखवितों.

रा०–(काकुलतीनें) अहो गणपतराव, असे कसे तुह्मी निष्ठुर होतां ? ज्याच्या अन्नावर तुह्मी वाढलां, ज्याबरोबर तुह्मी लहानपणापासून खेळ खेळलां, ज्याबरोबर तुह्मी विद्या शिकून एवढ्या योग्यतेस चढलां, जो अर्ध्या घटकेपूर्वी तुह्मी जिवलग मित्राप्रमाणें

लेखित होतां, तो निःशस्त्र व निश्चित असतां त्यावर प्रहार करणें तुह्मांस कसें योग्य वाटतें? त्यानें तुमचा काय अन्याय केला आहे?

सं०—(दरडावून) अरे अधमा! चांडाळा, मागें फीर, मागें फीर. असलें घोर पातक करण्यास प्रवृत्त झाला आहेस. पण याचीं फळें तूं लवकरच भोगशील बरें! अरे, ह्या तुझ्या दगलबाजीबद्दल सुड घेणारा जेव्हां तुला भेटेल, तेव्हां तूं कोठें जाशील? तुजवर दया कोण करील?

ग०—ओरड! ओरड! कंठास शोष पडे तोंपर्यंत ओरड! तुला मी भीत नाहीं! येथें आतां तुझा बाप आला तरी त्यासही मी भिणार नाहीं!

शि०—(आपल्याशीं) तें आतां पहाणें आहे!

ग०—(राधाबाईस) राधे, तूं कशाला श्रमी होतेस? तुला एकदां सांगितलें कीं, कृष्णरावास ठार मारल्याशिवाय मी उगाच बसणार नाहीं. तुझी इच्छा असो अगर नसो; तें मी पहात नाहीं. मीं तुला बलात्कारानें नेण्याचा जो संकल्प केला आहे, त्याच्या सिद्ध्यर्थ तुझ्या नवऱ्यास ठार मारल्याशिवाय मला गत्यंतर नाहीं! ( कृष्णरावावर तरवार उगारतो. )

रा०—(कृष्णरावाच्या अंगावर पडून अतिदीन स्वरानें ) अरे अरे! एक माझें ह्मणणें तरी ऐक! मी तुजपुढें पदर पसरून एवढें चुडेदान मागतें हें मला दे! अरे, लोकांचे नित्य प्राण घेणें हा ज्याचा धंदा त्या मांगास सुद्धां माझी दीन दशा पाहून करुणा येईल! मग तूं तर ब्राह्मणच आहेस! तूं आमचा आप्त असून तुजवर आह्मीं कांहीं उपकारही केले आहेत

ते आतां स्मर.

( किल्ल्यावरील शिंगें वाजतात. )

ग०—( भीतीनें किल्ल्याकडे पाहून ) घात झाला. मला पकडण्याकरितां गडकरी आतां येथें येतील. या पोरीला व संभाजीला येथून अजून घेऊन जावयाचें आहे. आतां मी क्षणभर येथें थांबलों असतां प्राणासच मुकेन! ( राधाबाईस ) राधे, त्याच्या अंगावरून उठून बाजूस होतेस कीं नाहीं? का टाकूं एका घावानें दोघांचेही तुकडे करून? ( तरवार उगारतो. )

रा०—खुशाल! खुशाल! एक तर माझ्या पतीस सोड, किंवा आह्मां दोघांसही एकदम मारून टाक! या प्रसंगीं दोहोंतून कोणतीही गोष्ट केलीस तरी तुझे आह्मांवर उपकार होतील!

शि०—( मनांत ) आतां जर मीं उपेक्षा केली, तर ब्रह्महत्या व स्त्रीहत्या केल्याचें पातक मला लागेल. ( वेगानें पुढें सरून गणपतरावास दरडावून ) किल्लेदार, ठेव हत्यार खालीं!

सं०—( मनांत ) बाबा येथें आले? आतां मी त्यांस कसें तोंड दाखवूं? या वेळीं पृथ्वी दुभंग होऊन जर मला आंत घेईल तर बरें होईल!

ग०—( शिवाजीस पाहून घाबरतो व तरवार खालीं ठेवून कांपत हात जोडून) म-म-महा-रर-राज, म-म मी-( बोबडी वळून बोलतां येईना ह्मणून शिवाजीच्या पायांकडे बोट दाखवितो. )

रा०—( अनुमानानें शिवाजीस ओळखून अतिहर्षानें ) आला! आला! आतां दुर्जनांचा काळ आला! जो अनाथाचा कैवारी त्यानें माझ्या रक्षणार्थ धांवणें केलें!

( गणपतरावास ) दुष्टा! आतां मी तुला भीत नाहीं! (शिवाजीकडे वळून ) महाराज, आपणांस मी राधा प्रणाम करित्यें. ( शिवाजीच्या पायां पडत्ये. )

शि०—हे साध्वी, तूं मला प्रणाम करावास हें योग्य नाहीं. तूं अशी पवित्र व पुण्यवान् आहेस कीं, मींच दररोज सकाळीं उठून तुला शत प्रणाम करावे. ऊठ, तूं भर्त्यासह चिरकाल नांदून संसारसुख भोगशील. केवढें तुझें प्रखर पातिव्रत्य! केवढें तुझें थोर मन! काय तुझी राजभक्ति! बाळे! या तुझ्या सद्गुणांनीं तूं आपल्या माहेरच्या व सासरच्या कुळासच भूषणीभूत झालीस असें नाहीं, तर तूं माझ्या सर्व राष्ट्रास शोभविलें आहेस? अशा पतिव्रता माझ्या राज्यांत नांदतात ह्मणूनच बलिष्ट शत्रूस पराजित करण्याचें माझ्या बाहूंत सामर्थ्य येतें! आजपर्यंत तूं पुष्कळ कष्ट भोगलेस. परंतु इतःपर मी तुला असुखाचें वारेंही लागूं देणार नाहीं! कृष्णरावाबद्दल तूं आतां काळजी करूं नको. ( कृष्णरावास निरखून पाहून ) त्याला मूर्च्छा आली आहे. ( पागोट्यांतून एक मुळी काढून ) ही मुळी घे, आणि दगडावर ठेंचून त्याच्या नाकाशीं धर; ह्मणजे तो लागलाच सावध होईल. तें पलीकडे देवीचें देऊळ आहे. ती बरी निवाऱ्याची जागा आहे. माझा सेवक बहिर्जी कृष्णरावास उचलून त्या देवळांत नेईल. तेथें तूंही जा. आह्मी मागून आलोंच. बहिर्जी, जा. शंभूचे हातपय मोकळे कर; आणि त्याच पटक्यानें या लुच्याचे हात बांध; नंतर कृष्णरावास उचलून देवळांत ने. आणि तेथेंच बैस.

ब०—जी सरकार.

शि०—( गणपतरावास पाहून ) अरे अधमा, तुझीं

अन्यायकर्मे आजपर्यंत मी ऐकतच होतों. परंतु आज मीं प्रत्यक्ष तुझें जें वर्तन पाहिलें, त्यावरून असें वाटतें कीं, तुझें दर्शन झालें असतां स्नानच करावें! तूं जिवंत राहण्यास योग्य नाहींस. पण तुला शतशः देहान्त शासन दिलें असतां तुझ्या पातकास प्रायश्चित्त पुरें होणार नाहीं!

( बहिर्जी संभाजीस मुक्त करून गणपतरावाचे हात बांधतो व कृष्णरावास उचलून राधाबाईसह निघून जातो. )

सं०–( धांवत धांवत येऊन शिवाजीच्या पायांवर लोळण घेत व स्फुंदत स्फुंदत रडून ) बाबा! बाबा! मी किती तरी घोर अपराधी! मला या संकटांतून सोडविण्याकरितां आलां काय? मी आपल्या दयेस केवळ अपात्र आहे! मला कृतकर्माचा पूर्ण पश्चात्ताप झाला आहे! याकरितां माझे अन्याय पोटांत घालून मला क्षमा करा.

शि०–( सद्गदित होऊन व संभाजीस उठवून पोटाशीं आवळून ) ये, ये, लाडक्या! आतां तुजवर माझा राग नाहीं. आज तुझ्या जिवावर केवढें अरिष्ट आलें होतें! माझें दैव सबळ ह्मणून तूं आज माझ्या दृष्टीस पडलास! लेंकरा, आतां तरी मला सोडून जाऊं नको! ह्मातारपणीं मला दुःख देऊं नको. पहा, आतां दिवसेंदिवस मी क्षीण होत चाललों. माझे हातून आतां पहिल्याप्रमाणें उपद्व्याप होत नाहीं. मीं वडिलांच्या पुण्याईनें जें एवढें प्रचंड राज्य मिळविलें आहे, त्याच्या कारभाराचा आटोप जर तुह्मीं न केला तर कोण करील? आतां राजारामही वयांत येईल. तुला येथें राहणें रुचत नसेल तर मीं कर्नाटकांत नवीन प्रांत

जिंकले आहेत तेथें तूं राज्य कर. तुंगभद्रेपलीकडील सर्व देश तुला देतों. तसें नसेल तर तूं मजजवळ रहा. सारांश तुह्मीं दोघांनीं एकमतानें राहून हिंदुधर्माचा उत्कर्ष करावा, व म्लेंछांचा क्षय करावा. माझी इच्छा अशी आहे कीं, माझ्यामागें माझ्या पुत्रांनीं आपल्या जन्मभूमीचें रक्षण करून मराठे लोकांची कीर्ति दिगंत पसरावी.

सं०–( डोळ्यांत अश्रू आणून ) बाबा, मला राज्य नको. राज्य करण्याची माझी योग्यता नाहीं. माझ्या बुद्धींत स्थिरता नाहीं. अंगांत कर्तृत्व नाहीं. शहाणपणा नाहीं. माझा कनिष्ठ बंधूच राज्यास योग्य आहे. त्याच्याच आश्रयानें राहून इतःपर मी राज्यकारभाराविषयीं उदासीन रहाणार.

शि०–बाळा, तूं असें बोलूं नको. आजपर्यंत तुला दुर्जनांच्या संगतीचा रोग जडला होता, त्याला आज चांगली खरमरीत मात्रा मिळाली आहे. आतां तो रोग तुला पुनः जडणार नाहीं. इतःपर तुझे डोळे उघडतील. तूं या व्यवहारांत सावधपणानें राहून चांगल्या लोकांशींच संगत करशील अशी मला आशा लागली आहे. तूं या सन्मार्गानें वागूं लागलास ह्मणजे प्रजाजन तुझे मागचे अन्याय विसरतील. ते तुझ्या आज्ञा शिरसा वंद्य मानून तुला सन्मान देत जातील. असो, आतां या कृष्णरावाची काय स्थिति आहे हें पाहूं या. बन्दिजी, इकडे ये.

ब०–( प्रवेश करून ) जी, सरकार.

शि०–कृष्णरावाच्या प्रकृतीचें मान कसें काय आहे?

ब०–त्यांना ती मुळी हुंगण्यास दिली, तेणेंकरून

ते आतां चांगले सावध झाले आहेत. परंतु रक्तस्राव झाल्यामुळें त्यांस बोलण्याची देखील शक्ति उरली नाहीं. ते अगदीं पडून आहेत.

शि०—हरकत नाहीं. श्रीजगदंबेचे कृपेनें सर्व कांहीं यथास्थित होईल. मी येथें आलों आहें असें त्यास कळवूं नको; कारण कीं, माझें नांव ऐकिल्याबरोबर तो हालचाल करूं लागेल व बोलण्याचा यत्न करील. तें त्यास हितावह नाहीं. त्यास गडावर घेऊन गेलें पाहिजे. त्याबद्दल काय तजवीज करावी? (किल्ल्याच्या दरवाज्याकडे पाहून) वाहवा! आतां कृष्णरावास नेण्याची पंचाईत मुळींच उरली नाहीं! ते पहा गडावरून कित्येक लोक भराभर खालीं उतरून इकडेसच येत आहेत. ते आल्यावर कृष्णरावास सुखानें वर नेतां येईल. ते टेंकडीवर आल्यानें इतके जवळ दिसतात तरी त्यांस येथें येण्यास दोन घटिका अवकाश पाहिजे. (संभाजीस) चला, तेथपर्यंत आपण देवीच्या देवळांत जाऊन बसूं.

शि०-बहिर्जी,

ब०—महाराज—

शि०—(किल्लेदाराकडे बोट करून) गडकरी येतील तोंपर्यंत या मनुष्यास तुझ्या हवालीं केलें आहे. याला नीट संभाळ. (शिवाजी व संभाजी जातात.)

ब०—(किल्लेदारास) चलरे हरामखोरा, चल, देवळांत जाऊन बैस. (धक्के मारीत त्यास घेऊन जातो.)

## प्रवेश दुसरा.

### स्थळः—पन्हाळगडावरील राजवाडा.

[ शिवाजी, मोरोपंत व कांहीं चाकर लोक दृष्टीस पडतात. ]

शि०—मोरोपंत, मी कोण आहें याबद्दल अजूनही जिवाजीपंतास तर्क झाला नाहीं?

मो०—नाहीं. मी काल वडगांवांत मुक्कामास होतों. जिवाजीपंतास आपण येथें आलां आहां हें ऐकून अतिशय हर्ष झाला आहे. आपणांस एक मोठी मेजवानी करण्याचें त्याच्या मनांत आहे. मीं त्यास ह्मटलें, "जिवाजीपंत, महाराज वेषांतर करून प्रजेचें मन पाहण्याकरितां हिंडत असतात. तुमचेकडे येऊन तुह्मांस नकळत ते कित्येकदां येऊन गेले असतील." तो रागावून ह्मणाला, "महाराज कोणच्या वेषानें मजकडे आले तरी त्यांस मी ओळखीनच ओळखीन!"

शि०—धर्म्याचें त्यास कधीं स्मरण होतें काय?

मो०—घटके घटकेस. ते मला ह्मणाले, "मोरोपंत आमच्या धर्माजीची व तुमची मीं गांठ पडूं दिली, परंतु त्यास तुह्मीं फितवून पळवून नेलेंत हें चांगलें नाहीं. त्यानें परवां मोठा पराक्रम केला त्याजबद्दल त्यास पोषाख व एक सोन्याचें कडें देऊन लावून देण्याचा माझा विचार होता. त्या गरिबाचें तुह्मीं व्यर्थ नुकसान केलेंत. असो, आतां जर आमचा धर्म्या तुह्मांस कोठें भेटला तर त्यास वडगांवांत अवश्य पाठवून द्या."

शि०—( हंसून ) वाहवा! आज मला भेटण्याकरितां जिवाजीपंत येणार आहे तेव्हां मोठी गम्मत होईल तो सकाळीं निघाला असेल तर हीच त्याची येण्याची वेळ आहे. [ जिवाजीपंत प्रवेश करितो. ]

जि०-( आपल्याशीं ) काय हा आजचा दिवस! आजच्या आनंदानें मला हर्षवायु होईल अशी भीति पडली आहे. मीं किल्ल्यावर आल्याबरोबर प्रथम जाऊन कृष्णाची प्रकृति पाहिली, तो आतां बरा आहे. त्यास नीट जपण्याबद्दल मुलीस सांगून आलों आहें. तेव्हां आतां त्याबद्दल काळजी करावयास नको. आतां मी महाराजांचें दर्शन घेण्याकरितां निघालों आहें. ( रामराम घेतल्यासारखें करून ) काय? हे गडकरी जातां येतां मला लवून नम्रपणानें मुजरा करितात? पण आठ दिवसांपूर्वी मी थंडींत कुडकुडत रात्रभर या किल्ल्याबाहेर पडलों होतों तरी या लुच्चांनीं मला आंत घेतलें नाहीं! आतां मी राजवाड्याच्या देवडीवर येऊन पोहोंचलों. कोण आहे रे तिकडे पहाऱ्यावर? मी वडगांवचा जिवाजीपंत देशपांड्या महाराजांच्या दर्शनाकरितां आलों आहे अशी आंत वर्दी पोंचवा. (ऐकल्यासारखें करून ) काय ह्मणतां? “ जा, दादा! तुह्मांला वर्दी नको. सरकार थोरल्या दिवाणखान्यांत बसले आहेत तेथें जा. ” असें ह्मणतां काय? बरें, हा मी आंत निघालों. राजदर्शनाचा मला कधीं अनुभव नसल्यानें माझें उर भीतीनें धसधस उडत आहे! ( दिवाणखान्यांत प्रवेश करून शिवाजी राजा पहातो आणि आश्चर्यानें व भयानें स्तब्ध उभा राहून ) अरे हें आहे काय? मी झोंपेंत तर नाहीं? ( अंगास चिमटे काढून ) छे! मी झोंपेंत नाहीं. मी जागा आहें! आणि मी पहातों हें सर्व खरें आहे. तर मग आतां येथून पळ काढावा हें उत्तम! पुढें जाण्याची आपली तर बोवा छाती होत नाहीं!